



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, मंगळवार २३ जून २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ ८




## नको अटी, नको शर्ती; शेतक-यांचा सातबारा कोरा करा

**मुंबई/प्रतिनिधी-**राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी महाविकास आघाडीने शेतकरी कर्जमाफीच्या मुद्यावरून सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली. विधान भवनाच्या पाय-यांवर आंदोलन करत विरोधी पक्षाच्या आमदारांनी नको अटी, नको शर्ती; शेतक-यांना हवी कर्जमुक्ती, शेतक-यांचा सातबारा कोरा करा अशा घोषणा दिल्या. राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला आज सुरूवात झाली. सभागृहाचे कामकाज सुरू होण्यापूर्वी महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधानभवनाच्या पाय-यांवर शेतकरी कर्जमाफीच्या मुद्यावरून आंदोलन करत जोरदार घोषणाबाजी केली. (पान २ वर)

# विधान परिषद निवडणुकीत आघाडीचा धुव्वा; 17 पैकी 16 जागांवर महायुतीचा विजय




**मुंबई /प्रतिनिधी-**राज्यातील नुकत्याच स्वराज्य संस्था मतदारसंघांमधील झालेल्या विधान परिषद निवडणुकीचे निकाल आज जाहीर झाले आहेत. या निवडणुकीत महायुतीने पुन्हा एकदा आपले राजकीय वर्चस्व सिद्ध केले आहे. एकूण १७ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत महायुतीने १६ जागांवर विजय मिळवला आहे. हा विजयामुळे विरोधकांना मोठा धक्का मिळाला आहे.

महत्त्वाची बाब म्हणजे निवडणुकीपूर्वीच ६ जागांवर महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले होते. त्यानंतर उरलेल्या ११ जागांवरही महायुतीने दमदार कामगिरी करत तब्बल १० जागांवर दमदार कामगिरी केली आहे.या निवडणुकीत भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या महायुतीतील पक्षांनी प्रभावी कामगिरी केली. मात्र नाशिक मतदारसंघात महायुतीला अनपेक्षित धक्का बसला. येथे भाजपचे बंडखोर आणि अपक्ष उमेदवार गोकुळ गिते यांनी विजय मिळवत शिवसेनेचे अधिकृत उमेदवार नरेंद्र दराडे यांचा पराभव केला. त्यामुळे राज्यातील एकमेव जागा महायुतीच्या अधिकृत उमेदवारांच्या हाती न जाता अपक्षाकडे गेली.निकालानुसार भाजपने सर्वाधिक ११ जागा जिंकल्या. शिवसेनेच्या खात्यात ३ जागा गेल्या, तर राष्ट्रवादी काँग्रेसने २ जागांवर विजय मिळवला. याशिवाय १ जागेवर अपक्ष उमेदवार विजयी झाला. दुसरीकडे महाविकास आघाडीला या निवडणुकीत अपेक्षित यश मिळवता आले नाही.ठाणे, यवतमाळ, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, पुणे, वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर आणि अहिल्यानगर या ६ मतदारसंघांमध्ये महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले होते. तर नागपूर, जळगाव, अमरावती, नांदेड, सोलापूर, सांगली-सातारा, भंडारा-गोंदिया, धाराशिव-लातूर-बीड, परभणी-हिंगोली आणि छत्रपती संभाजीनगर-जालना या मतदारसंघांतही महायुतीच्या उमेदवारांनी विजय मिळवत राज्यातील राजकीय समीकरणांवर आपली मजबूत पकड कायम असल्याचे दाखवून दिले.

## अमरावतीत प्रवीण पोटे पाटलांची हॅटट्रिक

**अमरावती /प्रतिनिधी-** विधानपरिषदेच्या अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीत भाजपचे उमेदवार प्रवीण पोटे यांनी विजय मिळवत सलग तिस-यांदा विजयाची हॅटट्रिक साधली आहे. एकतर्फी ठरलेल्या या निवडणुकीत त्यांनी वंचित बहुजन आघाडीचे निलेश विश्वकर्मा यांचा ३५९ मतांनी पराभव केला. काँग्रेसचे उमेदवार हर्षजीत देशमुख यांना एकही मत मिळाले नाही. या निवडणुकीत भाजपचे प्रवीण पोटे, काँग्रेसचे हर्षजीत देशमुख आणि वंचित बहुजन आघाडीचे निलेश विश्वकर्मा हे रिंगणात होते. मतदारसंघातील एकूण ४५१ मतदारांपैकी ४२७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. अमरावती येथील नियोजन भवनात सोमवारी



सकाळी ८ वाजता मतमोजणीला सुरुवात झाली. मतदान झालेल्या मतांपैकी ६ मते अवैध ठरल्याने वैध मतांची संख्या ४२१ झाली. त्यामुळे विजयासाठी २११ मतांचा कोटा निश्चित करण्यात आला. मतमोजणी दोन टेबलवर पार पडली. पहिल्या टेबलवर २०० तर दुस-या टेबलवर २२७ मतांची गणना करण्यात आली. पहिल्याच फेरीत भाजपचे प्रवीण पोटे यांनी ३९० मते मिळवत विजयासाठी आवश्यक कोटा सहज पूर्ण केला. अंतिम निकालात प्रवीण पोटे यांना ३९० मते मिळाली, तर वंचित बहुजन आघाडीचे निलेश विश्वकर्मा यांना ३१ मते मिळाली. काँग्रेसचे उमेदवार हर्षजीत देशमुख यांना एकही मत मिळाले नाही. जिल्हा निवडणूक अधिकारी आशिष येरेकर यांनी प्रवीण पोटे यांना विजयी घोषित केले. या विजयासह प्रवीण पोटे यांनी अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात सलग तिस-यांदा विजय मिळवत आपले वर्चस्व कायम राखले आहे. भाजप कार्यकर्त्यांनी निकाल जाहीर होताच जल्लोष करत प्रवीण पोटे यांचे अभिनंदन केले.

## पक्षबांधणीसाठी उद्धव ठाकरे थेट मैदानात; २७ पासून महाराष्ट्र दौरा

**मुंबई / प्रतिनिधी-** शिवसेना (ठाकरे गट) मधून सहा खासदारांनी बंड करत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आता



आक्रमक भूमिका घेण्याच्या तयारीत आहेत. बंडखोरीनंतर प्रथमच उद्धव ठाकरे महाराष्ट्रभर दौरा करत थेट कार्यकर्त्यांशी संवाद साधणार आहेत. या दौ-याकडे ठाकरे गटाच्या राजकीय प्रतिआक्रमणाची सुरुवात म्हणून पाहिले जात आहे. पक्षातून झालेल्या गळतीनंतर संघटना पुन्हा मजबूत करणे, कार्यकर्त्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे आणि जनाधार कायम असल्याचा संदेश देणे हा या दौ-यामागील प्रमुख उद्देश असल्याचे सांगितले जात आहे.उद्धव ठाकरे यांच्या दौ-याची सुरुवात २७ (पान २

## इमारतीला भीषण आग; १४ जण ठार

**लखनउ :** उत्तर प्रदेशची राजधानी लखनउ येथील अलीगंज पोलीस



ठाण्याच्या हद्दीतील उस्मान मेहता मार्गावरील एका तीन मजली व्यावसायिक इमारतीला सोमवारी दुपारी भीषण आग लागली. या दुर्घटनेत किमान १४ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, अनेक विद्यार्थी गंभीर जखमी झाले आहेत. या इमारतीत एक मोठे कोचिंग सेंटर सुरू असल्याने दुर्घटनेच्या वेळी तेथे मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. आगीच्या प्रचंड ज्वाळा आणि दाट धुरामुळे घाबरून गेलेल्या काही विद्यार्थ्यांनी आपला जीव वाचवण्यासाठी इमारतीच्या वरच्या मजल्यांवरून थेट खाली उड्या मारल्या. यामुळे अनेक विद्यार्थी गंभीर जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच बचाव पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेत जखमींना बाहेर काढले आणि उपचारासाठी किंग जार्ज मेडिकल युनिव्हर्सिटी (केजीएमयू)च्या ट्रामा सेंटरमध्ये दाखल केले, जिथे त्यांच्यावर युद्धपातळीवर उपचार सुरू आहेत.उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री ब्रजेश पाठक यांनी तातडीने घटनास्थळी भेट देउन परिस्थितीचा आढावा घेतला आणि १४ जणांच्या मृत्यूची अधिकृत पुष्टी केली आहे. या दुर्घटनेची गंभीरता लक्षात घेउन मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आपला नियोजित अलीगड दौरा तात्काळ रद्द केला (पान २ वर)

## नांदेडमध्ये अमर राजूरकर तिस-यांदा विधान परिषदेत

**नांदेड /प्रतिनिधी-** नांदेड स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत भाजपचे खासदार अशोक चव्हाण यांनी अमर राजुरकर यांच्यासाठी एक हाती विजय खेचून आणला आहे. अमर राजूरकर यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर भाजपच्या निष्ठावंतांमध्ये नाराजी असल्याचा सूर आळवला गेला मात्र अशोक चव्हाण यांनी परफेक्ट प्लॅनिंग करून अमर राजूरकर यांना तिस-यांदा आमदार करण्याची किमया साधली.स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत अशोक चव्हाण यांनी नगरपालिका नगरपंचायत आणि महापालिकेत सर्वाधिक नगरसेवक निवडून आणत वर्चस्व सिद्ध केले होते. ज्या महापालिकेत गेल्या कित्येक वर्षात भाजपाला प्रवेशही करता आला नाही त्या भाजपच्या ताब्यात आज बहुमतासह महापालिकेची सत्ता आहे. हा चमत्कार



अशोक चव्हाण यांच्या भाजपा प्रवेशानंतर घडला. त्यामुळे नांदेडमध्ये अशोक चव्हाण सांगतील तोच अंतिम शब्द काँग्रेस प्रमाणे भाजपमध्ये ठरू लागला. राज्यातील विधान परिषदेच्या १७ जागांसाठी निवडणूक जाहीर झाली तेव्हा नांदेड मधून अमर राजूरकर यांचे एकमेव नाव अशोक चव्हाण यांच्याकडून पुढे केले गेले. पक्षश्रेष्ठींनीही त्यावर शिक्कामोर्तब करत अशोक चव्हाण यांच्यावर विश्वास दाखवला. महाविकास आघाडीने भाजपमधूनच पक्षात आलेल्या रामदास सुमठाणकर यांना उमेदवारी देत महायुतीला आव्हान दिले होते. मात्र हिंगोली चे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी ऐनवेळी सूत्रे हलवत आपले पुत्र कृष्णा पाटील आष्टीकर यांना महाविकास आघाडीचे पुरस्कृत उमेदवार म्हणून जाहीर करण्यास काँग्रेसच्या नेत्यांना भाग पाडले. नागेश पाटील आष्टीकर यांनी आमच्याकडे मॅजिक फिगर आहे आमचा विजय शंभर टक्के होणार, नांदेडच्या शेअर बाजारात (पान २ वर)

## सोलापुरात भाजपचे राजेंद्र राऊत विजयी

**सोलापूर /प्रतिनिधी-**सोलापूर विधान परिषदेच्या निवडणुकीत अपेक्षेप्रमाणे भारतीय जतना पक्षाचे राजेंद्र राउत यांनी बाजी मारली आहे.



राउत यांना ४८३ मते पडली असून त्यांना आव्हान देणारे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे वसंतराव देशमुख यांना ११८ मते मिळाली आहेत. राउत यांनी ३६५ मतांनी विजय मिळविला आहे.सोलापूर विधान परिषदेसाठी गुरुवारी (१८ जून) एकूण ६१६ मतदारांपैकी ६१४ जणांनी मतदानाचा हक्क बजावला होता. म्हणजेच ९९. ६८ टक्के मतदान झाले होते. भाजपच्या दोघांचे मतदान होउ शकले नव्हते. त्यामुळे निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले होते.जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या उपस्थितीत सुरुवातील मतांच्या स्लीपांचे गठ्ठे बांधण्यात आले. त्यानंतर चार टेबलावर ही मतमोजणीला सुरुवात झाली आहे. त्या मतमोजणीच्या पहिल्या फेरीत राजेंद्र राउत हे पहिल्या फेरीपासून आघाडीवर आहेत.महाविकास (पान २ वर)

## नाशिक विधान परिषद निवडणूक
### अपक्ष गोकुळ गीतेंचा ऐतिहासिक विजय

**नाशिक:** राज्यभरात कमालीची उत्सुकता निर्माण केलेल्या नाशिक स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत अखेर अत्यंत धक्कादायक



उलटफेर झाला आहे. निवडणुकीतून माघार घेतल्याची केवळ चर्चा असलेल्या आणि भाजपमधून बंडखोरी केलेल्या अपक्ष उमेदवार गोकुळ गीते यांनी महायुतीचे अधिकृत उमेदवार नरेंद्र दराडे यांचा धुव्वा उडवला आहे. पहिल्याच फेरीत विजयासाठी आवश्यक असलेला कोटा पूर्ण करत गोकुळ गीते यांनी नाशिकच्या गडात ऐतिहासिक विजय संपादित केला आहे. या पराभवामुळे नाशिकच्या राजकीय वर्तुळात महायुतीला मोठा धक्का बसला आहे.आज सकाळी मतमोजणीला सुरुवात झाल्यानंतर पहिल्याच फेरीत गोकुळ गीते यांनी मोठी आघाडी घेतली. पहिल्या फेरीतील १५० मतांपैकी त्यांनी १०० हून अधिक मतांचा कोटा सहज पूर्ण केला. (पान २ वर)

## परभणी-हिंगोली महायुतीचे सईद खान विजय

**परभणी (प्रतिनिधी) :** परभणी-हिंगोली स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीत महायुतीने आपला झेंडा रोवत मोठे यश संपादन केले आहे. महायुतीचे उमेदवार सईद खान यांनी पहिल्या पसंतीची सर्वाधिक मते मिळवत प्रतिस्पर्ध्यांवर निर्णायक आघाडी घेत दणदणीत विजय मिळवला आहे.सोमवारी (२२ जून) जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळपासून कडेकोट पोलीस बंदोबस्तात मतमोजणी प्रक्रिया पार पडली. जिल्हाधिकारी



संजयसिंह चव्हाण तसेच निवडणूक निरीक्षकांच्या उपस्थितीत मतमोजणी करण्यात आली. निकाल जाहीर होताच महायुतीच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष करत विजयाचा आनंद साजरा केला. अधिकृत निकालानुसार, महायुतीचे उमेदवार सईद खान यांना २४२ मते मिळाली. तर महाविकास आघाडीचे उमेदवार ड?. विवेक नांदर यांना १५९ मते मिळाली. अपक्ष उमेदवार सुशीलकुमार देशमुख यांना ५६ मतांवर समाधान (पान २ वर)

## जळगावात गिरीश महाजनांचे शिलेदार नंदकिशोर महाजन यांचा मोठा विजय

**जळगाव/प्रतिनिधी-** जळगाव विधान परिषद स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ निवडणुकीत मंत्री गिरीश महाजन यांचे शिलेदार भाजप-महायुतीचो अधिकृत उमेदवार नंदकिशोर महाजन यांचा मोठा विजय झाला आहे.



मतमोजणीला सोमवारी (दि. २२ ) सकाळी जळगावच्या जिल्हाधिकारी कार्यालयात सुरुवात झाली. यावेळी कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. महायुतीचे उमेदवार नंदकिशोर महाजन आणि महाविकास आघाडीचे उमेदवार शरद तायडे यांच्यात थेट लढत झाली. नंदकिशोर महाजन यांना ५२८ मते मिळाली तर विरोधी उमेदवार शरद तायडे यांना केवळ १७ मते मिळाली. ५११ मतांनी नंदकिशोर महाजन यांचा विजय झाला.या निवडणुकीच्या निकालाकडे संपूर्ण जळगाव जिल्ह्याचे लक्ष लागले होते. दोन्ही गटाकडून (पान २ वर)

## पाणी रोखल्यास भारताविरूद्ध युद्ध छेडू
### पाकच्या संरक्षणमत्र्यांची धमकी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध गेल्या अनेक वर्षांपासून कमालीचे ताणलेले आहेत. अशातच आता पाकिस्तानचे



संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ यांनी भारताला थेट युद्धाची पोकळ धमकी दिली आहे. जर पाकिस्तानच्या पाणी सुरक्षेला धोका निर्माण झाला, तर आम्ही भारताविरुद्ध लष्करी कारवाई किंवा युद्ध छेडण्याचा विचार करू शकतो, असे चिथावणीखोर वक्तव्य आसिफ यांनी केले आहे. पाकिस्तान सध्या भीषण जलसंकटाचा सामना करत असतानाच संरक्षणमंत्र्यांनी हे वक्तव्य केल्यामुळे आता भारत यावर काय प्रत्युत्तर देणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. एआरवाय न्यूजला दिलेल्या एका विशेष मुलाखतीत ख्वाजा आसिफ यांनी भारतावर गंभीर आरोप केले. ज्या क्षणी आम्हाला वाटेल की पाणी हा आमच्या राष्ट्रीय सुरक्षेचा भाग असून त्याला धोका निर्माण झाला आहे, त्या क्षणी आम्ही (पान २ वर)






## पान १ व १० वरून

### इमारतीला भीषण आग;

आहे. मुख्यमंत्री स्वतःलखनउमध्ये परतले असून, संपूर्ण मदत आणि बचावकार्यावर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. मुख्यमंत्र्यांनी या दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबीयांप्रती तीव्र शोकसंवेदना व्यक्तकेल्या आहेत. तसेच, जखमी विद्यार्थ्यांना तात्काळ सर्वोत्तम वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत. उपमुख्यमंत्र्यांसह राज्याचे पोलीस महासंचालक (डीजीपी) आणि गृह विभागाचे वरिष्ठ अधिकारीही घटनास्थळी उपस्थित राहून बचाव मोहिमेवर स्वतः देखरेख ठेवत आहेत. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या १४ गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. आग पूर्णपणे आटोक्यात आणण्यासाठी आणि इमारतीमध्ये अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून परिसरातील विद्युत पुरवठा तात्पुरता खंडित करण्यात आला आहे. दरम्यान, मदत आणि बचावकार्य अद्यापही सुरू असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता प्रशासनाकडून वर्तवली जात आहे. आग नेमकी कशामुळे लागली याचे कारण अद्याप स्पष्ट होउ शकले नाही, असून पोलीस व अग्निशमन दल याविषयी सखोल चौकशी करत आहे.

### पाणी रोखल्यास भारताविरूद्ध

भारताविरुद्ध युद्ध छेडण्याचा विचार करू, असे ते म्हणाले. भारत पाण्याचा पुरवठा रोखण्याच्या दिशेने वेगाने पावले उचलत असल्याचे ठोस पुरावे मिळाल्यास युद्धाचा पर्याय विचारात घेतला जाउ शकतो, असेही त्यांनी पुढे नमूद केले. आसिफ यांनी भारतावर पाण्याचा राजकीय आणि धोरणात्मक दबावासाठी हत्यार म्हणून वापर केल्याचा आरोपही केला. भारत चिनाब नदीच्या प्रवाहात फेरफार करत असून महत्त्वाची जलसंबंधित माहिती पाकिस्तानला देत नसल्याचा दावाही त्यांनी केला.

यापूर्वी सिंधू जल करारांतर्गत पाकिस्तानी पथकांनी भारतीय प्रकल्पांची सुमारे ११५ वेळा प्रत्यक्ष पाहणी केली होती, मात्र गेल्या वर्षभरातील घडामोडींची कोणतीही माहिती आमच्याकडे नाही, अशी कबुलीही त्यांनी दिली.ख्वाजा आसिफ यांची ही संतप्त प्रतिक्रिया भारताचे केंद्रीय जलशक्ती मंत्री सी.आर. पाटील यांच्या एका महत्त्वाच्या वक्तव्यानंतर आली आहे. मंत्री पाटील यांनी जून २०२८ पर्यंत पाकिस्तानकडे जाणारे सिंधू नदीचे पाणी पूर्णपणे रोखण्याची शक्यता व्यक्तकेली होती. भारताच्या या पवित्र्यामुळे पाकिस्तानची संपूर्ण कृषी अर्थव्यवस्था धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे, ज्यामुळे पाकिस्तान सरकार धास्तावले आहे.जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर भारताने अत्यंत आक्रमक पाउल उचलत दीर्घकाळापासून अस्तित्वात असलेला १९६० चा सिंधू जल करार स्थगित करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. पाकिस्तानने सीमापार दहशतवादाला पाठिंबा देणे पूर्णपणे थांबवले नाही, तोपर्यंत हा करार स्थगितच राहील, असे भारताने स्पष्ट केले आहे. जागतिक बँकेच्या मध्यस्थीने झालेल्या या मूळ करारानुसार, सिंधू नदी खो-यातील सुमारे ८० टक्के पाणी पाकिस्तानला मिळत होते आणि पाकिस्तानची जवळपास ८० टक्के शेती याच पाण्यावर अवलंबून आहे. भारताने घेतलेल्या या कठोर भूमिकेमुळे पाकिस्तानला होणा-या पाणी पुरवठ्यावर कडक मर्यादा आल्या आहेत आणि तेथे तीव्र जलसंकट निर्माण झाले आहे. आता पाकिस्तानच्या या नव्या धमकीला भारतीय परराष्ट्र मंत्रालय कशा प्रकारे चोख उत्तर देते, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

### नांदेडमध्ये अमर राजूरकर

आम्ही बूम करण्यासाठी आलो आहोत असा दावाही केला. यावर अशोक चव्हाण यांनी फारसे भाष्य न करता अत्यंत शांतपणे महायुतीची मतं फुटणार नाहीत ती एकत्र राहतील याची पुरेपूर काळजी घेतली. निवडणूक प्रचार यंत्रणा राबवण्यात अशोक चव्हाण, अमर राजूरकर यांचा हातखंडा आणि प्रदीर्घ अनुभव असल्याने महायुतीचे अनेक नगरसेवक सुरक्षित स्थळी पाठवण्यात आले होते.

दुसरीकडे राज्यात झालेल्या ऑपरेशन टायगरमध्ये हिंगोली चे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांचे नाव समोर आल्याने महाविकास आघाडीत बिघाडी झाली. रामदास सुमठाणकर यांना ऐनवेळी माघार घ्यायला लावल्यामुळे काँग्रेसमध्ये काहीसे नाराजीचे वातावरण होते. नागेश पाटील आष्टीकर यांचा ऑपरेशन टायगर मधील सहभाग आणि काँग्रेसच्या नाराजीचा फटका नागेश पाटील आष्टीकर यांना बसल्याचे दिसते कारण महाविकास आघाडीकडे असलेल्या मतांपेक्षाही कमी मते त्यांना मिळाली. एकट्या काँग्रेसकडे ९२ मते होती मात्र कृष्णा पाटील आष्टीकर यांना केवळ ८४ पहिल्या पसंतीची मते मिळाली. यावरून महाविकास आघाडीचे मते फुटल्याचे स्पष्ट होते. अमरनाथ राजूरकर यांना पहिल्या पसंतीची ३३९ मते मिळाली तर महाविकास आघाडीच्या कृष्णा पाटील आष्टीकर यांना केवळ ८४ मते मिळाली.

### जळगावात गिरीश महाजनांचे

विजयाचे दावे केले जात होते. मात्र, प्रत्यक्षात नंदकिशोर महाजन यांनी पूर्णपणे एकतर्फी ही निवडणुक जिंकली. मतमोजणी प्रक्रियेत अगदी प्रारंभीपासूनच महायुतीचे उमेदवार नंदकिशोर महाजन यांनी आघाडी घेतली होती. त्यांना पहिल्याच फेरीत तब्बल ५७७ मतांचा आकडा गाठता आल्याने दुस-या पसंतीक्रमाची मते न मोजताच विजयी घोषीत करण्यात आले. विधान परिषदेच्या निवडणुकीत नंदकिशोर महाजन यांनी एकतर्फी विजय संपादन केल्याने त्यांच्या समर्थकांनी जल्लोष केला.

### नको अटी, नको शर्ती;

विधानभवनातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन केल्यानंतर पाय-यांवर आंदोलन करण्यात आले. हातात बॅनर्स, पोस्टर्स आणि घोषणाबाजीने विधिमंडळाचा परिसर दणाणून सोडला. शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे, भास्कर जाधव, अंबादास दानवे, काँग्रेस विधीमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार, सतेज पाटील यांच्यासह महाविकास आघाडीचे अनेक आमदार उपस्थित होते.

महायुतीने सत्तेत येताना शेतक-यांचा सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र प्रत्यक्षात सत्तेवर आल्यानंतर कर्जमाफीसाठी अनेक अटी व शर्ती लादून शेतक-यांची फसवणूक करण्यात आली. त्यामुळे कोणत्याही अटींशिवाय सर्वसमावेशक कर्जमाफी जाहीर करून शेतक-यांना दिलासा द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

**लबाड लांडगं काय करतंय,कर्जमाफीचं सोंग करतंय!**

दरम्यान, महायुतीचे आमदार सभागृहाच्या दिशेने जात असताना आघाडीच्या आमदारांनी पुन्हा घोषणाबाजी करत त्यांना डिवचण्याचा प्रयत्ना केला. लबाड लांडगं ढोंग करतंय कर्जमाफीचं सोंग करतंय, शेतक-यांचा सातबारा कोरा झालाच पाहिजे, कोण म्हणतो देणार नाय घेतल्याशिवाय राहणार नाय अशा घोषणाबाजी आघाडीच्या आमदारांनी दिल्या. पाय-यावर आंदोलन सुरू असताना दुस-या बाजूने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार व काही मंत्री व सत्ताधारी आमदार छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी जात असताना विरोधकांच्या घोषणा टिपेला गेल्या होत्या.

**टंचाईवर चर्चा करा : नाना पटोले**

विधानसभेच्या कामकाजादरम्यान काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी राज्यातील दुष्काळ आणि पाणीटंचाईचा प्रश्न उपस्थित केला. अल निनो च्या प्रभावामुळे राज्यातील नद्या, नाले, धरणे आणि तलाव कोरडे पडले असून भूजल पातळीही मोठ्या प्रमाणात खालावली आहे. अनेक गावांमध्ये व शहरांमध्ये पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असल्याने या विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा घडवून आणावी, अशी मागणी त्यांनी केली. यावर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दुष्काळ आणि पाणीटंचाईच्या प्रश्नावर सभागृहात सकारात्मक चर्चा घडवून आणली जाईल, असे आश्वासन दिले.

### पक्षबांधणीसाठी उद्धव ठाकरे थेट

जूनपासून होणार आहे. पहिली सभा सकाळी १० वाजता यवतमाळ येथे होईल. हा मतदारसंघ बंडखोर खासदार संजय देशमुख यांचा मानला जातो.यानंतर दुपारी २ वाजता वाशीम येथे कार्यकर्ता मेळावा आणि जाहीर सभा होणार आहे. वाशीम जिल्ह्यातही संजय देशमुख यांचा प्रभाव असल्याने या सभेकडे विशेष लक्ष लागले आहे.सायंकाळी ४ वाजता उद्धव ठाकरे हिंगोली येथे पोहोचतील. हिंगोली हा बंडखोर खासदार नागेश पाटील आष्टीकर यांचा मतदारसंघ आहे. त्यामुळे या सभेत ठाकरे बंडखोरीवर थेट भाष्य करण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दौ-याच्या दुस-या दिवशी म्हणजे २८ जून रोजी सकाळी ११ वाजता परभणी येथे सभा आयोजित करण्यात आली आहे. परभणीचे खासदार संजय (बंडू) जाधव यांनी अलीकडेच ठाकरे गटाची साथ सोडल्याने या सभेला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. यानंतर दुपारी ३.३० वाजता धाराशिव येथे उद्धव ठाकरे कार्यकर्त्यांना संबोधित करणार आहेत. धाराशिव हा खासदार ओमराजे निंबाळकर यांचा मतदारसंघ आहे. अलीकडील राजकीय घडामोडींमध्ये ओमराजे निंबाळकर यांचे नाव विशेष चर्चेत राहिले असल्याने या सभेकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

**२९ जूनला शिर्डीत सभा-** दौ-याच्या तिस-या आणि अंतिम टप्प्यात २९ जून रोजी उद्धव ठाकरे शिर्डी येथे जाहीर सभा घेणार आहेत. शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणारे खासदार भाउसाहेब वाकचौरे यांनीही बंडखोर गटाची साथ दिली आहे. त्यामुळे शिर्डीतील सभा ही या दौ-यातील आणखी एक महत्त्वाची राजकीय लढाई मानली जात आहे.

**मुंबईत आमदारांसोबत टी मीटिंग-** राज्यव्यापी दौ-यापूर्वी उद्धव ठाकरे २२ जून रोजी मुंबईत ठाकरे गटाच्या आमदारांसोबत विशेष टी मीटिंग घेणार आहेत. या बैठकीत सध्याच्या राजकीय परिस्थितीचा आढावा घेतला जाणार असून, पक्षाच्या पुढील रणनीतीवर चर्चा होणार आहे.

बंडखोर खासदारांविरोधातील कारवाई, संघटनात्मक पुनर्बांधणी, आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका आणि राज्यातील बदललेले राजकीय समीकरण या मुद्द्यांवर या बैठकीत सविस्तर चर्चा होण्याची शक्यता आहे.

**बंडखोरीनंतरचा पहिला मोठा राजकीय हल्ला-** अलीकडेच ठाकरे गटातील सहा खासदारांनी पक्षाला धक्का देत वेगळी भूमिका घेतली. त्यानंतर राज्यभरात कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली होती. अशा परिस्थितीत उद्धव ठाकरे स्वतः मैदानात उतरून कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधणार आहेत.

### नाशिक विधान परिषद निवडणूक

गोकुळ गीते यांना एकूण ३८९ मते मिळाल्याचा दावा त्यांच्या समर्थकांकडून केला जात आहे. गीते समर्थकांकडून मतमोजणी केंद्राबाहेर जोरदार जल्लोष केला जात आहे. तर दुसरीकडे, आपले प्रतिस्पर्धी नरेंद्र दराडे हे पराभव स्वीकारून मतमोजणी केंद्रावरून निघून गेले आहेत. यामुळे महायुतीच्या गोटात शांतता पसरली असून मोठा धक्का बसला आहे. मात्र, अजून विजयाची औपचारिक घोषणा बाकी आहे.प्रत्यक्ष निकालापूर्वी आज मतमोजणी केंद्रावर कमालीचा तणाव पाहायला मिळाला होता. गोकुळ गीते यांनी मतमोजणी कक्षात पोहोचताच नरेंद्र दराडे यांचे बंधू आणि नाशिक शिक्षक मतदारसंघाचे विद्यमान आमदार किशोर दराडे यांच्या उपस्थितीवर तीव्र आक्षेप घेतला होता. निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार कोणत्याही विद्यमान लोकप्रतिनिधीला मतमोजणी कक्षात प्रतिनिधी म्हणून बसता येत नाही, असा कानुनी मुद्दा मांडत गीतेंनी थेट वकिलांना पाचारण केले होते.या मुद्द्यावरून मतमोजणी कक्षातच गीते आणि दराडे यांचे समर्थक आमनेसामने आले होते आणि त्यांच्यात जोरदार बाचाबाची झाली. या गोंधळानंतर निवडणूक निर्णय अधिका-यांनी सुनावणी घेउन शंका निरसन केले आणि पोलिसांच्या चोख बंदोबस्तात मतमोजणी प्रक्रिया पुन्हा सुरळीत सुरू ठेवली.

**छुप्या मतदानाचा संशय खरा ठरला!**

महायुतीच्या नेत्यांना पहिल्या दिवसापासून ज्या छुप्या मतदानाचा (क्रास व्होटिंग) संशय होता, तो आज निकालातून पूर्णपणे खरा ठरल्याचे दिसत आहे. नाशिक जिल्ह्यातील संख्याबळानुसार भाजप आणि महायुतीचे पारडे जड असतानाही, बंडखोर गोकुळ गीते यांना एवढ्या मोठ्या प्रमाणावर मतदान झाले. ग्रामीण आणि शहरी भागातील महायुतीची मते मोठ्या प्रमाणावर फुटल्यामुळेच गोकुळ गीते यांचा हा एकतर्फी विजय सुकर झाला. मी मतदारांचा उद्रेक पाहिला होता, त्यामुळे मीच जिंकणार, हा गोकुळ गीतेंचा दावा अखेर निकालाच्या दिवशी खरा ठरला आहे. या विजयामुळे नाशिकच्या स्थानिक राजकारणाला आता एक वेगळे वळण मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### परभणी-हिंगोली महायुतीचे

मानावे लागले. याशिवाय ८ मते बाद ठरली. एकूण ४६५ मतांची मोजणी करण्यात आली.सईद खान यांनी पहिल्या पसंतीच्या मतांमध्ये स्पष्ट आघाडी घेत विजय निश्चित केला. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रतिनिधींचा पाठिंबा महायुतीच्या बाजूने गेल्याचे या निकालातून स्पष्ट झाल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे.या विजयामुळे परभणी आणि हिंगोली जिल्ह्यांतील महायुतीच्या संघटनात्मक ताकदीला बळ मिळाले असून आगामी स्थानिक आणि विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा निकाल महत्त्वाचा मानला जात आहे. दुसरीकडे, महाविकास आघाडीसाठी हा निकाल आत्मपरीक्षणाची संधी ठरणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील राजकीय समीकरणे बदलण्याची क्षमता असलेल्या या निकालामुळे मराठवाड्यातील आगामी राजकीय घडामोडींना वेग येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विजय मिळताच सईद खान यांनी मतदारांचे आभार मानत विकासकामांना प्राधान्य देण्याची ग्वाही दिली.

### सोलापुरात भाजपचे राजेंद्र

आघाडीकडे असलेले संख्याबळ पाहता विधान परिषदेची निवडणूक बिनविरोध व्हावी, अशी अपेक्षा पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यासह भाजपची होती. मात्र, काँग्रेसचा अर्ज बाद झाल्यानंतर खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी सूत्रे हाती घेत भाजपला आव्हान दिले होते. मात्र भाजपने विजय मिळवत बाजी मारली आहे.सोलापुरात राजेंद्र राउत आणि वसंत देशमुख अशी लढत असली तरी खरी प्रतिष्ठा पालकमंत्री गोरे आणि मोहिते पाटील यांची पणाला लागली होती. या निवडणुकीत मोहिते पाटील यांनी जयकुमार गोरे यांच्यासह भाजप नेत्याला संपूर्ण जिल्ह्यात दौरे काढायला भाग पाडले. बिनविरोधची अपेक्षा असलेल्या भाजपला पळायला लावले होते. या निवडणुकीत अदृश्य शक्ती आमच्या सोबत असल्याचा दावा धैर्यशील मोहिते पाटील प्रत्येक पत्रकार परिषदेत करत होते. मात्र, ती अदृश्य शक्ती कामाला आली नसल्याचे दिसून येते.

### विधान परिषद निवडणुकीत

न करण्याचा निर्णय घेतला होता. पण, बहुतांश सदस्यांनी पक्षादेश झुगारून मतदान केल्याचे दिसले. ही मते भाजपकडे वळती झाल्याचे निकालाने स्पष्ट केले आहे.

**४२७ पैकी ४२१ मतांची मोजणी-**

या निवडणुकीत एकूण ४२७ मतं पडली होती. त्यापैकी सहा मतं अवैध ठरले. वैध ठरलेला ४२१ मतांच्या आधारे विजयाचा कोटा २११ मतांचा निश्चित करण्यात आला. मतमोजणीत भाजपाचे प्रवीण पोटे यांना तब्बल ३९० मते मिळाली. वंचित आघाडीचे निलेश विश्वकर्मा यांना ३१ मतं मिळाली, तर काँग्रेसचे उमेदवार हर्षजीत देशमुख यांना एकही मत मिळालं नाही.

**हा माझा नव्हे, नगरसेवकांचा विजय-**

विजयानंतर प्रतिक्रिया देताना प्रवीण पोटे यांनी हा विजय स्वतःचा नसून स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नगरसेवकांचा असल्याचं सांगितलं.ही निवडणूक माझी नव्हतीच. नगरसेवकांनी माझ्यासाठी लढवलेली ही निवडणूक होती. मला मिळालेली ३९० मतं ही त्यांच्या विश्वासाची पावती आहे. सर्व मतदारांचे मी मनःपूर्वक आभार मानतो,असं प्रवीण पोटे म्हणाले.

**विरोधकांवर पोटेचा टोला-**

वंचित बहुजन आघाडीला मिळालेला ३१ मतांबाबत बोलताना प्रवीण पोटे यांनी आपल्या राजकीय विरोधकांवर अप्रत्यक्ष टोला लगावला. 'युवा स्वाभिमान संघटनेचं नाव न घेता त्यांनी ही ३१ मतं कुणाची आहेत? त्यापैकी २७ मतं कुठून आली? हे संपूर्ण राजकीय वर्तुळाला माहित आहे. त्याबाबत अधिक काही सांगण्याची गरज नाही,' असं देखील प्रवीण पोटे म्हणाले.

**काँग्रेसला आत्मपरीक्षण करण्याची गरज-**

काँग्रेसचे उमेदवार हर्षजीत देशमुख यांना एकही मत न मिळाल्याबद्दल पोटे यांनी काँग्रेसवर टीका केली. 'काँग्रेसनं आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. त्यांचा उमेदवार पक्ष सोडून गेला नव्हता, तरी त्यालाच स्वतःच्या मतदारांचं समर्थन मिळू शकलं नाही. येथे पक्षात असणारे माजी कॅबिनेट मंत्री, माजी मंत्री यांनी यावर गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे,' असं देखील प्रवीण पोटे म्हणाले.

**५ मतपत्रिका आढळल्या कोऱ्या-**

स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीत महायुतीचे उमेदवार प्रवीण पोटे-पाटील यांनी ३९० मते घेत एकतर्फी 'हॅट्रिक' साधली असली, तरी आता या निवडणुकीतील अवैध मतांच्या गणिताने अमरावतीच्या राजकीय वर्तुळात नवा सस्पेन्स निर्माण केला आहे. या निवडणुकीत एकूण ६ मते अवैध ठरली असून, धक्कादायक बाब म्हणजे यातील तब्बल ५ मतपत्रिका पूर्णपणे कोऱ्या आढळल्या आहेत. निवडणुकीच्या आदल्याच दिवशी काँग्रेसने आपल्या सदस्यांना तटस्थ राहण्याचा 'व्हीप' जारी केला असतानाही हा प्रकार घडल्याने, या कोऱ्या मतपत्रिका नेमक्या कुणाच्या? यावरून आता तर्कवितर्कांना उधाण आले आहे मोजणीत थेट ५ मतपत्रिका कोऱ्या निघाल्याने संशयाची सुई काँग्रेस सदस्यांकडेच फिरत आहे. यामुळे चर्चा जोरावर आहे.

**नियोजन भवनात कार्यकर्त्यांचा जल्लोष-**

विधान परिषद निवडणुकीमध्ये भाजपाचा एकतर्फी विजय झालेला आहे. प्रवीण पोटे यांच्या विजयी झाल्यानंतर भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी नियोजन भवन परिसरात जल्लोष साजरा केला. ढोल ताशे वाजवत गुलाल उधळण्यात आला. आतिषबाजी करण्यात आली. पदाधिकाऱ्यांनी भव्य पुष्पमाला घालून प्रवीण पोटे यांचे स्वागत केले आणि त्यांना शुभेच्छा दिल्या.

**अरूण अडसड यांचा घेतला आशीर्वाद-**

विधान परिषद निवडणुकीत तिसऱ्यांदा विजयी झाल्यानंतर आमदार प्रवीण पोटे भाजपाचे वरिष्ठ नेता आणि माजी मंत्री अरुण अडसड यांच्या निवासस्थानी पोहोचले. त्यांनी अरुण अडसड यांचा आशीर्वाद घेतला. अडसड यांनी त्यांना भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# स्मार्ट मीटरविरोधात महावितरण कार्यालयावर कम्युनिस्ट पक्षाचा मोर्चा



**चांदूर रेल्वे/प्रतिनिधी-**स्मार्ट मीटर योजनेच्या विरोधात तसेच विविध वीज ग्राहकांच्या मागण्यांसाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने सोमवारी (दि. २२ जून) चांदूर रेल्वे येथील महावितरणच्या सहाय्यक अभियंता कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. यावेळी केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. आंदोलनानंतर महावितरण अधिका-यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

आंदोलनकर्त्यांनी स्मार्ट मीटर ग्राहकांच्या संमतीशिवाय बसवू नयेत, घरगुती ग्राहकांना वीजदरात कपात करावी, एप्रिल २०२४ मधील वीजदरवाढ रद्द करावी, शेतक-यांना शेतीसाठी २४ तास वीजपुरवठा करावा, तसेच ज्या ठिकाणी स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत ते काढून पुन्हा जुने मीटर बसवावेत, अशा प्रमुख मागण्या केल्या. याशिवाय महाराष्ट्रातील सर्व वीज ग्राहकांना २०० युनिट मोफत वीज द्यावी, स्मार्ट मीटर बसविण्यापूर्वी ग्राहकांना लेखी माहिती व अटी-शर्ती द्याव्यात आणि कोणत्याही ग्राहकावर स्मार्ट मीटर स्वीकारण्यासाठी दबाव टाकू नये, अशीही मागणी करण्यात आली.

सभेदरम्यान आंदोलनकर्त्यांनी आरोप केला की, स्मार्ट मीटर धोरणामुळे सर्वसामान्य वीज ग्राहकांवर आर्थिक भार पडत असून हे धोरण मोठ्या उद्योगसमूहांच्या हिताचे आहे. तसेच तामिळनाडूमध्ये स्मार्ट मीटर योजना बंद करण्यात आल्याचा उल्लेख करत महाराष्ट्र सरकारनेही ही योजना मागे घ्यावी, अशी मागणी करण्यात आली.

मोर्चाचे नेतृत्व भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे कॉ. विनोद जोशी, कॉ. प्रसेनजित तेलंग, कॉ. किसन चौधरी, कॉ. वासुदेव चौधरी, कॉ. संदीप सोनोने, कॉ. रफिकभाई, कॉ. गुलाब, कॉ. गजानन पेठे, कॉ.. गणेश होले, कॉ.जुमडे, कॉ. प्रणय दुर्योधन, कॉ. सागर दुर्योधन, कॉ. रवींद्र सवाई, कॉ. विजय कोल्हे, कॉ. चंपतराव फुंडे, कॉ. नारायण मेश्राम, कॉ. मेहबूब इक्बाल, कॉ. मधुकर कापसीकर, कॉ. रमाबाई शंभरकर, कॉ. किसन शंभरकर, कॉ. वैशाली जोशी, कॉ. निळकंठ दिघडे, कॉ. बबन शेलोकर, कॉ.. नंदा देशमुख, कॉ.. नूरबी शेख शकील, कॉ.. अफसाना सय्यद परवीन कासम, कॉ.. संजय ठाकूर आदींनी केले.

मोर्चामध्ये मोठ्या संख्येने शेतकरी, युवक, महिला व नागरिक सहभागी झाले होते. आंदोलनानंतर झालेल्या जाहीर सभेत जनतेच्या प्रश्नांसाठी पुढील काळातही आंदोलनाची तीव्रता वाढविण्यात येईल, असा इशारा देण्यात आला.

# NEETपेपरफुटी, बेरोजगारी आणि शेतक-यांच्या प्रश्नांवर काँग्रेस आक्रमक

- **अमरावती जिल्ह्यात व्यापक जनआंदोलन**
- **काँग्रेस जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांची माहिती**



**अमरावती/प्रतिनिधी-**देशातील शिक्षण व्यवस्था, परीक्षा प्रक्रिया आणि रोजगार निर्मितीच्या बाबतीत केंद्र व राज्य सरकार पूर्णपणे अपयशी ठरल्याचा आरोप करत काँग्रेस पक्षाने विद्यार्थी, युवक आणि शेतक-यांच्या प्रश्नांवर राज्यव्यापी जनजागृती व संघर्ष अभियान छेडण्याचा निर्णय घेतला आहे. या अभियानाचा भाग म्हणून अमरावती जिल्ह्यात व्यापक जनआंदोलन उभारण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष बबलू देशमुख यांनी दिली.देशातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य आज धोक्यात आले आहे.याकरिता कॉंग्रेस चे नेते खा. राहुल गांधी स्वत मैदानात उतरले आहेत. त्यामुळे देशव्यापी आंदोलन उभारले जात आहे. नीट परीक्षेतील कथित पेपरफुटी, विविध स्पर्धा परीक्षांमधील गैरव्यवहार, वारंवार परीक्षा रद्द होण्याच्या घटना, रखडलेल्या नोकरभरती प्रक्रिया आणि वाढती बेरोजगारी यामुळे युवकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. शिक्षण आणि रोजगार या दोन मूलभूत क्षेत्रांमध्ये सरकारला अपयश आले असून त्याची किंमत देशातील तरुण पिढीला मोजावी लागत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.बबलू देशमुख म्हणाले की, 'विद्यार्थी दिवस-रात्र मेहनत करून स्पर्धा परीक्षांची तयारी करतात. अनेक पालक आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी मोठा आर्थिक त्याग करतात. मात्र पेपरफुटी, परीक्षा घोटाळे आणि भरती प्रक्रियेतील विलंब यामुळे विद्यार्थ्यांच्या स्वप्नांचा चक्काचूर होत आहे. शिक्षण क्षेत्रातील ही परिस्थिती अत्यंत गंभीर असून सरकारने याबाबत मौन बाळगले आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी होणारा हा खेळ काँग्रेस कदापिही सहन करणार नाही.'काँग्रेसच्या या अभियानाअंतर्गत अमरावती जिल्ह्यातील विविध तालुके आणि प्रमुख शहरांमध्ये पत्रकार परिषदा, जनजागृती सभा, विद्यार्थी संवाद कार्यक्रम, निवेदन मोहीम आणि विविध आंदोलनात्मक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या मोहिमेत विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा उमेदवार, शिक्षणतज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, युवक संघटना, महिला काँग्रेस, युवक काँग्रेस, एनएसयूआय तसेच पक्षाचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी होणार आहेत.यावेळी देशमुख यांनी शेतकरी प्रश्नांवरही सरकारवर जोरदार टीका केली. राज्यातील शेतकरी आज आर्थिक संकटात सापडला असून उत्पादन खर्च वाढत असताना शेतीमालाला योग्य भाव मिळत नाही. कापूस, सोयाबीन आणि संत्रा उत्पादक शेतकरी अडचणीत आहेत. पीकविम्याची रक्कम वेळेवर मिळत नाही, नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान होउनही मदत मिळत नाही आणि कर्जाच्या ओझ्याखाली शेतकरी दबला जात आहे, असे त्यांनी सांगितले.शासनाने जाहीर केलेली कर्जमाफी ही प्रत्यक्षात शेतक?यांसाठी दिलासा नसून निव्वळ राजकीय स्टंटबाजी असल्याचा आरोप त्यांनी केला. अनेक शेतकरी कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहिले असून जाचक अटींमुळे योजना निष्प्रभ ठरल्याचे त्यांनी नमूद केले. कर्जमाफीची प्रभावी अंमलबजावणी, पीकविम्याचे तातडीने वितरण, शेतीमालाला हमीभाव आणि शेतक-यांच्या प्रश्नांवर ठोस निर्णय घेण्याची मागणी काँग्रेसकडून करण्यात आली.काँग्रेस पक्ष विद्यार्थ्यांचे हक्क, युवकांना रोजगार आणि शेतक-यांना न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष करणार असल्याचे स्पष्ट करताना बबलू देशमुख म्हणाले की, 'हे सरकार केवळ घोषणा करणारे सरकार ठरले आहे. प्रत्यक्षात सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडविण्यात ते पूर्णपणे अपयशी ठरले आहे. त्यामुळे शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचार, बेरोजगारी आणि शेतकरी प्रश्नांविरोधात जनतेचा आवाज बुलंद करण्यासाठी जिल्ह्यातील युवक, विद्यार्थी, शेतकरी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने या जनआंदोलनात सहभागी व्हावे.' या अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थी आणि शेतकरी प्रश्न राज्य व केंद्र सरकारपुढे प्रभावीपणे मांडले जाणार असून, आगामी काळात जिल्हाभर तीव्र लोकआंदोलन उभारण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# घरकुलच्या ५ हजारांसाठी पंचायत समितीच्या अभियंत्यावर हल्याचा प्रयत्न

**खल्लार/प्रतिनिधी-**प्रधानमंत्री आवास योजना म्हणजेच घरकुलच्या थकीत ५ हजार रुपयांच्या मागणीसाठी दर्यापूर पंचायत समितीतील घरकुल अभियंत्यावर चाकूने हल्ला करण्याचा प्रयत्न झाला. ही धक्कादायक घटना आज (दि.२२) दुपारच्या सुमारास दर्यापूर पंचायत समितीत घडली असून या घटनेने पंचायत समिती कार्यालयात खळबळ उडाली. कर्मचा-यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. माहितीनुसार दर्यापूर तालुक्यातील नांदेड बु येथिल गब्बर नावाच्या व्यक्तीचा घरकुलचा थकीत ५००० हप्ता मिळण्यासाठी वारंवार चकरा मारून ही पैसे न मिळाल्याने संताप अनावर झाला. संबंधित व्यक्तीने अभियंत्याकडे मागणी केल्यानंतर पैशास नकार दिल्यानंतर त्याने कार्यालयातच चाकू काढून अभियंत्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. यामुळे एकच खळबळ उडाली. शोएब शेख असे अभियंत्याचे नाव आहे. हल्ल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून फरार झाला. पंचायत समितीतील कर्मचा-यांनी तातडीने पोलिसांना माहिती दिली. घटनेची नोंद दर्यापूर पोलीस ठाण्यात झाली असून पोलीस आरोपीचा शोध घेत आहेत. या हल्ल्यामुळे पंचायत समितीतील कर्मचारी वर्गात दहशत निर्माण झाली आहे. योजनेच्या नावाखाली अशा धमक्या आणि हल्ले वाढले आहेत. आम्हाला सुरक्षेची गरज आहे, अशी मागणी कर्मचा-यांनी केली आहे.पोलिसांकडून सीसीटीव्ही फुटेज तपासले जात असून आरोपीला लवकरच अटक केली जाईल, असे पोलीस निरीक्षकांनी सांगितले.

### राजापेठ परिसरातील कचरा

यामुळे संतापलेल्या परिसरातील महिलांनी आरोग्य अधिकारी डॉक्टर अजय जाधव यांना घटनास्थळी बोलविले. तसेच अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईकही पोहचल्या. नागरिकांनी अतिक्रमण विभाग आणि कंपनीच्या कार्यालयाला घेराव केला. यामुळे मोठा गोंधळ येथे निर्माण झाला होता. मनपाचे अधिकारीही येथे पोहोचले होते. त्यांनी नागरिकांची समजूत काढली आणि लवकरात लवकर कचरा डेपो हटविण्याचे निर्देश दिले. अतिरिक्त आयुक्तांनी येथून कचरा संकलन बंद करण्याचे सांगीतले. यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला. नगरसेवक मिलिंद बांबल आणि लवीना हर्षे यांची महत्त्वपूर्ण भूमिका होती. प्रशासनाने जर आश्वासना नंतरही कचरा डेपो नाही हटविला तर तीव्र आंदोलनाचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

### हरवलेले सोने व मोबाईल

घेण्यात आला. पोलिसांच्या अथक प्रयत्नांमुळे तक्रारीत नमूद केलेल्या सर्व वस्तू हस्तगत करण्यात यश आले. यामध्ये ५ ग्रॅम सोन्याची पोत (किंमत ७० हजार रुपये), दोन विवो मोबाईल (किंमत ४० हजार रुपये), एक हजार रुपये रोख रक्कम तसेच इतर महत्त्वाची कागदपत्रे असा एकूण १ लाख ११ हजार रुपयांचा ऐवज समाविष्ट होता.हस्तगत करण्यात आलेला सर्व मुद्देमाल संबंधित महिला तक्रारदाराला परत करण्यात आला. त्यामुळे तक्रारदाराने राजापेठ पोलिसांचे आभार मानले. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त श्याम घुगे तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीश शिंदे व त्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

### देशी कट्टा व सहा

शस्त्रसाठा जप्त केला. चौकशीदरम्यान आरोपीने हे शस्त्र ढग्या चव्हाण (रा. निमखेडी, ता. जळगाव जामोद, जि. बुलढाणा) याच्याकडून घेतल्याची माहिती दिली. संबंधित आरोपी सध्या फरार असून त्याचा शोध सुरू आहे. या प्रकरणी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध आर्म अ‍ॅक्ट कलम ३/२५ तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.कारवाईदरम्यान एक देशी कट्टा (किंमत ३५ हजार रुपये), सहा जिवंत काडतुसे (६ हजार रुपये), विवो कंपनीचा मोबाईल (१५ हजार रुपये) आणि एक मोपेड (१ लाख रुपये) असा एकूण १ लाख ५६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, श्याम घुगे, रमेश धुमाळ तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे व अतुल वर यांच्या नेतृत्वात पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

### अचलपूर - परतवाडा जुळया

विनंती केली.यावेळी अचलपूर नाका,विदर्भ मील,बस स्थानक परिसर आदी भागात ही मोहीम राबविण्यात आली.या वेळी वाहतूक पोलिसांनी वाहनचालकांना हेल्मेटमुळे जीवितहानी टाळता येते तसेच अपघातात डोक्याचे संरक्षण होते, याबाबत माहिती दिली. जनजागृती मोहिमेत पोलीसअधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी रस्त्यावरून जाणाऱ्या सर्व दुचाकी चालकांना हेल्मेट वापरण्याचे आवाहन केले.

### राजापेठ पोलिसांचे अवैध

मुद्देमाल जप्त करण्यात आला. शहरात अवैध दारुविक्री आणि गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी पोलीस आयुक्तालयाच्या निर्देशानुसार सातत्याने विशेष मोहिमा राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून राजापेठ पोलिसांनी ही कारवाई केली. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त श्याम घुगे तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. राजापेठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीश शिंदे तसेच पोलीस कर्मचारी मनीष करपे, पवन तिवारी, पंकज खटे, रवी लिखीतकर, अकुंश काळे, प्रशांत बेलोकर, आकाश यादव, अमोल खंडेझोड आणि अर्जुन कदम यांनी ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ मंगळवार, २३ जून २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## शाळांकडून वह्या-पुस्तके व गणवेशासाठी सक्ती नको ; पालकांची लूट थांबवा - शिवसेना

### गटशिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन सादर ; अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा

■ प्रतिनिधी | कारंजा ■

राज्यातील शाळा ३० जूनपासून सुरू होत असल्याने विद्यार्थ्यांच्या वह्या, पुस्तके व गणवेश खरेदीची लगबग सुरू झाली आहे. मात्र शहरातील काही शाळांकडून विद्यार्थी व पालकांना ठराविक दुकानातूनच वह्या, पुस्तके आणि गणवेश खरेदी करण्यासाठी दबाव टाकला जात असल्याच्या तक्रारी समोर आल्याने शिवसेना (शिंदे गट) आक्रमक झाली आहे. या प्रकरणी पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी श्रीकांत माने यांना सोमवारी निवेदन सादर करून तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी करण्यात आली.



शिवसेनेला काही पालकांनी दिलेल्या माहितीनुसार, शहरातील काही शाळा विद्यार्थ्यांना शाळेतूनच किंवा शाळेने सुचविलेल्या विशिष्ट दुकानातून वह्या, पुस्तके व गणवेश खरेदी करण्यास भाग पाडत आहेत. तसेच काही दुकानांमध्ये वह्या व पुस्तकांवर मूळ किंमतीपेक्षा जास्त दराचे स्टिकर्स लावून विक्री होत असल्याचेही पालकांच्या निदर्शनास आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाने यासंदर्भात कोणताही नवीन शासन निर्णय अथवा आदेश जारी केलेला नसताना शाळांकडून अशा प्रकारची सक्ती करणे योग्य नसल्याचे शिवसेनेने म्हटले आहे. पालकांना त्यांच्या आर्थिक क्षमतेनुसार व पसंतीनुसार शैक्षणिक साहित्य खरेदी करण्याचे स्वातंत्र्य असताना त्यांच्यावर अनावश्यक बंधने घालण्यात येत असल्याचा आरोपही करण्यात आला.

या प्रकारामुळे पालकांची आर्थिक पिळवणूक होत असून संबंधित शाळांनी आपल्या भूमिकेचा फेरविचार करावा तसेच कोणत्याही विद्यार्थ्यावर अथवा पालकावर विशिष्ट दुकानातून खरेदीची सक्ती करू नये, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. गटशिक्षणाधिकारी यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन शहरातील सर्व शाळांना याबाबत स्पष्ट लेखी निर्देश जारी करावेत, अशी मागणीही शिवसेनेने केली आहे.

विद्यार्थी व पालकांवर अन्याय होणार नाही याची प्रशासनाने खबरदारी घ्यावी. भविष्यात अशा प्रकारचे प्रकार सुरू राहिल्यास शिवसेना तीव्र आंदोलन छेडेल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

निवेदन सादर करताना शिवसेना शहरप्रमुख अरुण बिकड, शहर संघटक संदेश जिंतुरकर, सरपंच अरुण चव्हाण, संतोष परसवार, अतुल गायकवाड, एजाज भाई, विलास डोंगरे, महेश राऊत, जितू टुले, भास्कर डुकरे, सागर मुंदे, नंदू तोरसे, प्रतिक भलावी व रामदास अवताडे उपस्थित होते.

## नियमित योगाभ्यासातून निरोगी व संतुलित जीवनशैली घडते - जिल्हाधिकारी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक स्थैर्य आणि सकारात्मक जीवनदृष्टी विकसित होते. निरोगी व संतुलित जीवनासाठी प्रत्येकाने योगाला आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवावे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.



जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, व जिल्हा क्रीडा परिषद वाशिम यांच्या संयुक्त वतीने आयोजित जिल्हा क्रीडा संकुल येथे १२ व्या आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमास तहसीलदार पळसकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी किशोर बोंडे, महाराष्ट्र सायकलिंग संघटनेचे अध्यक्ष धनंजय वानखेडे, प्राचार्य संजय शिंदे, स्काऊट अँड गाईडचे पवार सर, महाराष्ट्र ?थलेटिक्स संघटनेचे उपाध्यक्ष प्रा. अनिल बोंडे, तालुका क्रीडा अधिकारी मंगला शेंडे, होमगार्ड इन्चार्ज इंगोले , योग मार्गदर्शक कुलदीप बदर, क्रीडा मार्गदर्शक अक्षय टेंभुर्णीकर, बोदडे , मोरे , तिडके , वैद्य, कलीम, राष्ट्रीय खेळाडू अब्दुल यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.योगाचार्य कुलदीप बदर यांनी विविध योगासने व प्राणायामाचे मार्गदर्शन केले. त्यांनी स्वतः योगासनांचे प्रात्यक्षिक सादर करत उपस्थितांकडूनही योगाभ्यास करून घेतला. विशेष म्हणजे मंचावरील मान्यवरांनीदेखील योगसाधनेत सक्रिय सहभाग नोंदविला. प्रा. अनिल बोंडे, प्राचार्य संजय शिंदे, धनंजय वानखेडे आणि तालुका क्रीडा अधिकारी मंगला शेंडे यांनी मंचावर योगासने व प्राणायामाचे प्रात्यक्षिक करून उपस्थितांना प्रेरित केले. कार्यक्रमात योगप्रेमी, होमगार्ड जवान, क्रिकेट, कराटे, तायक्वांदो, बॉक्सिंग, ॲथलेटिक्स तसेच विविध खेळांचे खेळाडू, प्रशिक्षक, माता-भगिनी, विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि क्रीडा संघटनांचे पदाधिकारी व प्रशिक्षक मोठ्या संख्येने सहभागी झाले. आरोग्य, तंदुरुस्ती आणि मानसिक शांततेचा संदेश देणारा हा योग दिन कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. सहभागींच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत प्राप्त झाली.

## १० मिनिटांच्या पावसानेच मालेगावची पोलखोल





■ प्रतिनिधी | मालेगाव ■

शहरात आज अवघ्या दहा मिनिटांच्या पावसानेच नगरपंचायत प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण केले. अल्प काळ पडलेल्या पावसामुळे शहरातील अनेक भागांमध्ये रस्त्यांवर पाणी साचले तर नाल्यांमधील पाण्याचा निचरा होत नसल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागला.

पावसाळा सुरू होण्यापूर्वी नाल्यांची स्वच्छता गाळ काढणे व पाणी निचऱ्याची व्यवस्था सुरळीत करण्याच्या घोषणा प्रशासनाकडून करण्यात येतात. मात्र प्रत्यक्षात केवळ दहा मिनिटांच्या पावसातच शहरातील परिस्थिती बिघडल्याने या कामांबाबत नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. रस्त्यांवर पाणी साचल्याने वाहनचालक व पादचाऱ्यांची मोठी कसरत झाली. काही ठिकाणी नाल्यांचे पाणी रस्त्यावर आल्याचेही चित्र दिसून आले. यामुळे नागरिकांच्या आरोग्याचाही प्रश्न निर्माण झाला असून डासांची उत्पत्ती व साथीच्या आजारांचा धोका वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. शहरातील नाली व गटारींची नियमित स्वच्छता करण्यात येत नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. पावसाळ्यापूर्वी करण्यात आलेल्या कामांचा दर्जा आणि त्यावर झालेला खर्च याचीही चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. दरम्यान पावसाळ्याचा प्रारंभ असतानाच अशी परिस्थिती निर्माण होत असेल तर पुढील काळात मुसळधार पाऊस झाल्यास शहराची अवस्था काय होईल असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

नगरपंचायत प्रशासनाने तातडीने नाल्यांची स्वच्छता करून पाणी निचऱ्याची प्रभावी व्यवस्था करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे



## छत्रपती फिटनेस क्लबतर्फे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

■ प्रतिनिधी | कारंजा ■

निरोगी जीवनशैलीचा संदेश देत स्वर्गीय प्रकाश दादा डहाके निसर्ग पर्यटन केंद्र तथा छत्रपती फिटनेस क्लब, कारंजा यांच्या संयुक्त विद्यमाने बाराव्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त विशेष योगसाधना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. निसर्गरम्य वातावरणात पार पडलेल्या या उपक्रमाला महिला व पुरुष नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

निसर्ग पर्यटन केंद्राच्या शांत आणि प्रसन्न परिसरात पहाटेपासूनच योगप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली. 'योगा फॉर वन अर्थ, वन हेल्थ' या संकल्पनेला अनुसरून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक स्वास्थ्य आणि सकारात्मक जीवनशैली याविषयी जनजागृती करण्यात आली. योग प्रशिक्षक दिगंबर मसराम आणि राजू पवार यांनी उपस्थितांना विविध योगासने, प्राणायाम तसेच ध्यानधारणेचे प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. नियमित योगाभ्यासामुळे शरीर सुदृढ राहते, मन शांत राहते आणि दैनंदिन जीवनातील तणाव कमी होण्यास मदत मिळते, असे त्यांनी यावेळी सांगितले. सहभागी नागरिकांनी प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विविध योगासनांचा सराव करून नियमित योग करण्याचा संकल्प व्यक्त केला.

## तक्षशिला आयुर्वेद कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा



■ प्रतिनिधी | कारंजा ■


दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावती द्वारा संचालित तक्षशिला आयुर्वेद कॉलेज, हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, खेर्डा येथे रविवार, दि. २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थी, प्राध्यापक, वैद्यकीय अधिकारी आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत योगाच्या माध्यमातून निरोगी जीवनाचा संदेश दिला.

कार्यक्रमाची सुरुवात सामूहिक योगाभ्यासाने झाली. योग प्रशिक्षक विशाल राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित विशेष योग सत्रात ताडासन, भुजंगासन, वज्रासन, प्राणायाम, अनुलोम-विलोम यासह विविध योगासने आणि श्वसन क्रियांचा सराव करण्यात आला. योगाभ्यास करताना शरीर आणि मन यांच्यातील संतुलन, मानसिक एकाग्रता आणि सकारात्मक विचारसरणी विकसित करण्यावर विशेष भर देण्यात आला.

योग सत्रादरम्यान प्रशिक्षक विशाल राऊत यांनी प्रत्येक योगासनाचे शास्त्रीय महत्त्व, त्यामागील आरोग्यविषयक तत्त्वे तसेच नियमित योगाभ्यासामुळे शरीरावर आणि मनावर होणारे सकारात्मक परिणाम याबाबत सविस्तर माहिती दिली. यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रदीप पांडव यांनी उपस्थितांना संबोधित केले. कार्यक्रमात महाविद्यालयातील सर्व वैद्यकीय अधिकारी, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांची उपस्थिती लक्षणीय होती. योगाच्या माध्यमातून आरोग्य, शिस्त आणि सकारात्मक जीवनमूल्यांचा संदेश देणारा हा उपक्रम सर्वांच्या सहभागामुळे यशस्वी ठरला.

## पाण्यात योगासने करत आरोग्याचा संदेश

### वाशिममध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा



■ प्रतिनिधी | वाशिम ■

१२ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग तथा जलतरण प्रेमी मयुर गणेशराव राऊत व डॉ. प्रशांत गजानन वानखेडे यांच्या पुढाकाराने वाशिम येथे जलयोग (पाण्यात योगासने) या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात विविध वयोगटातील योगप्रेमींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत योगाचे महत्त्व अधोरेखित केले.

सहभागी योगप्रेमींनी पाण्यात ताडासन, वृक्षासन, त्रिकोणासन, अर्धचक्रासन, भुजंगासन यांसारख्या सोप्या योगासनांसह विविध प्राणायाम प्रकारांचे प्रात्यक्षिक सादर केले. यावेळी योगाचे महत्त्व विषद करताना योग तथा जलतरण प्रेमी मयुर गणेशराव राऊत यांनी सांगितले की, यंदाच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची 'र्भ्दु दै र्पेंत्र्ग्रेगु' (निरोगी वृद्धत्वासाठी योग) ही संकल्पना जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर आरोग्य, तंदुरुस्ती आणि मानसिक संतुलन राखण्याचा संदेश देते. जलयोगामुळे शरीराचा समतोल राखण्यास, लवचिकता वाढविण्यास तसेच मानसिक एकाग्रता वृद्धिंगत करण्यास मदत होते. नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक तंदुरुस्ती टिकून राहते, तणाव कमी होतो आणि मन प्रसन्न राहते. तसेच हृदयविकार, मधुमेह, उच्च रक्तदाब यांसारख्या जीवनशैलीजन्य आजारांपासून बचाव करण्यास योग उपयुक्त ठरतो. योग हा केवळ व्यायामाचा प्रकार नसून शरीर, मन आणि आत्मा यांचा समतोल साधणारी एक परिपूर्ण जीवनपद्धती असल्याचेही त्यांनी नमूद केले.

> 'निरोगी वृद्धत्वासाठी योग' या यंदाच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या संकल्पनेला अनुसरून जलयोगाचा हा उपक्रम राबविण्यात आला. आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने आयोजित या उपक्रमातून नागरिकांमध्ये योगाविषयी जागरूकता निर्माण व्हावी, अधिकाधिक लोकांनी नियमित योगाचा अंगीकार करावा तसेच निरोगी आणि संतुलित जीवनशैलीचा स्वीकार करावा, हा आमचा प्रयत्न आहे.'
>
> **- मयुर गणेशराव राऊत**
> (योग तथा जलतरण प्रेमी)

## नागपुरात महसूल मंत्र्यांच्या घरावर धडक मोर्चाचे आयोजन

**अकोला :** मुंबईतील ऐतिहासिक आझाद मैदान येथे आपल्या न्याय्य हक्कांसाठी लढणाऱ्या आंदोलकांवर सरकारकडून अत्यंत क्रूर आणि अमानुष धोरण लादले जात आहे. आझाद मैदानात आंदोलनासाठी केवळ सकाळी ११ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंतचीच परवानगी दिली जात असून, संध्याकाळी ५ वाजताच आंदोलकांना जनावरासारखे मैदानाबाहेर हाकलून दिले जाते. सध्या पावसाळ्याचे दिवस असतानाही रात्रीच्या वेळी या गरीब आंदोलक महिला आणि पुरुषांनी कुठे राहायचे? त्यांच्या सुरक्षेची सरकारकडे कोणतीही सोय नाही. सरकारच्या या अत्यंत आडमुठ्या धोरणामुळे मैदान आता छळछावणी बनले आहे.

## खा. संजय देशमुख यांच्या कार्यालयाला देणार संरक्षण - रवि भांदुर्गे

■ प्रतिनिधी | वाशिम ■

आताच झालेल्या ऑपरेशन टायगर अंतर्गत राज्यातील सात खासदार उद्धव ठाकरे यांची शिवसेना सोडून शिंदेसेनेत प्रवेश केला आहे.

मतदान संघातील जनतेचा विकास करण्यासाठी व मतदान संघात विकासकामे खेचून आणण्यासाठी सत्ताधारी पक्ष अतिशय महत्त्वाचा असतो त्याचाच धागा पकडून या सहा खासदारांनी सत्ताधारी पक्षात प्रवेश केला आहे त्या पार्श्वभूमीवर वाशिम जिल्ह्यातील काही उद्धव सेनेतील कार्यकर्त्यांनी समाजमाध्यमावर खासदार यांना



धमक्या दिल्याचे आपण पाहत आहे.

त्यांच्या विरोधात आंदोलन करून आपला राग व्यक्त करत आहेत काहींनी तर त्यांचे कार्यालय फोडून टाकणे त्यांना वाशिम शहरात प्रवेश करू न देणे अशा प्रकारच्या धमक्या दिल्या आहेत त्या पार्श्वभूमीवर युवासेनेचे जिल्हाप्रमुख रवी भांदुर्गे, गजानन ठेंगडे, चेतन इंगोले, श्याम तिवारी, संतोष व्यास, रामेश्वर राऊत आणि त्यांचे सर्व युवा सैनिक खासदार संजय भाऊ देशमुख यांना व त्यांच्या कार्यालयाला संरक्षण देणार आहेत त्यांनी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत प्रवेश केला म्हणजे ते आपले खासदार आहेत आणि खासदार श्रीकांत शिंदे व पूर्वेश सरनाईक यांचे निर्देश शिरसावंद्य म्हणून त्यांचे वाशिम जिल्ह्यात आल्यावर त्यांचे पुर्ण संरक्षण करण्याची जबाबदारी युवासेना प्रमुख रवी भांदुर्गे आणि त्यांच्या सर्व युवासैनिकांनी घेतली आहे

## अकोल्यात शिंदे सेनेचा 'सहा दिवसांचा आनंदोत्सव' ; नियुक्त्यांवर अचानक ब्रेक

### मुंबईतून नियुक्त्या, मुंबईतूनच स्थगिती ; जिल्ह्यातील संघटनात्मक वास्तव पुन्हा चर्चेत



■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्ह्यात नव्या दमाने संघटन उभारणीचा दावा करणाऱ्या शिवसेना (शिंदे गट)ला अकोल्यात मोठा राजकीय धक्का बसल्याची चर्चा रंगली आहे. अवघ्या सहा दिवसांपूर्वी मोठ्या दिमाखात जाहीर करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय सहा प्रभारी नियुक्त्यांना सोमवारी मुंबईतून पुढील आदेशापर्यंत स्थगिती देण्यात आल्याने पक्षातील कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे नियुक्त्यांच्या स्वागतासाठी शहरभर बॅनरबाजी सुरू असतानाच आलेल्या या आदेशाने शिंदे सेनेच्या संघटनात्मक धोरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

काही दिवसांपूर्वीच जिल्हा कार्यकारिणी बरखास्त केल्यानंतर पक्षश्रेष्ठींनी अकोल्यातील संघटन पुनर्बांधणीची जबाबदारी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते राजन साळवी यांच्याकडे सोपविली होती. गेल्या महिनाभरात साळवी यांनी जिल्हाभर दौरे करून कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी घेतल्या, नाराजांना समजावले आणि अनेकांना पक्षात आणण्याचे प्रयत्न केले. काही नगरसेवकांचा प्रवेश घडवून आणत संघटना विस्ताराचा संदेश देण्यात आला.

या पार्श्वभूमीवर १६ जून रोजी मुंबईहून अश्विन नवले यांची सहसंपर्क प्रमुख, चंद्रशेखर पांडे गुरुजी, नारायण गव्हाणकर आणि मंगेश काळे यांची प्रभारी जिल्हाप्रमुख, उषा वीरक यांची महिला जिल्हाप्रमुख तर राजेश मिश्रा यांची शहरप्रमुख म्हणून नियुक्ती जाहीर करण्यात आली होती. या नियुक्त्यांनंतर पक्ष कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला होता.

पदग्रहण सोहळ्यांची तयारी, अभिनंदनाचे फलक आणि सोशल मीडियावरील प्रचार यामुळे वातावरण रंगत आले होते. मात्र हा उत्साह फार काळ टिकला नाही. सोमवारी अचानक या सर्व नियुक्त्यांवर स्थगिती देण्यात आल्याने कार्यकर्त्यांच्या आनंदावर अक्षरशः विरजण पडले.

दरम्यान, स्थगितीचा आदेश हा तात्पुरता आहे की नियुक्त्याच रद्द होणार आहेत, याबाबत अद्याप पक्षाकडून अधिकृत भूमिका स्पष्ट करण्यात आलेली नाही. मात्र अकोल्यातील राजकीय वर्तुळात एक प्रश्न जोर धरत आहे की, ही स्थगिती निवडणुकीतील अपयशाची शिक्षा आहे की पक्षातील अंतर्गत शक्तीसंघर्षाचा नवा अध्याय?

पुढील काही दिवसांत मुंबईतील पक्षश्रेष्ठी कोणता निर्णय घेतात, याकडे आता शिंदे सेनेच्या कार्यकर्त्यांसह संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

#### पराभवाचा 'पोस्टमार्टम' सुरू?

राजकीय वर्तुळात या निर्णयामागील कारणांची जोरदार चर्चा सुरू आहे. नुकत्याच झालेल्या पातूर आणि अकोट नगरपरिषद निवडणुकांमध्ये शिंदे सेनेला अपेक्षित यश मिळाले नाही. काही ठिकाणी उमेदवारांची अनामत रक्कमही जप्त झाल्याने पक्षाच्या स्थानिक नेतृत्वाच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित झाले. निवडणूक निकालांनंतर संघटनात्मक फेरआढावा घेण्यात आल्याची चर्चा असून, त्यानंतरच नियुक्त्यांना स्थगिती देण्यात आल्याचे बोलले जात आहे.

#### 'दिल्ली-मुंबई' खुश, पण जिल्हा नेतृत्व नाराज?

पक्षांतर्गत सूत्रांच्या चर्चेनुसार, नियुक्त्यांबाबत काही स्थानिक पदाधिकाऱ्यांनी नाराजी व्यक्त केल्याचीही चर्चा आहे. काही नेत्यांना विश्वासात न घेता निर्णय झाल्याची कुजबुज पक्षात सुरू होती. त्यामुळे स्थगिती हा केवळ प्रशासकीय निर्णय नसून अंतर्गत असंतोष शांत करण्याचा प्रयत्न असल्याची शक्यता राजकीय निरीक्षक व्यक्त करीत आहेत.

#### संघटन उभारणी की संघटन गोंधळ?

जिल्हा कार्यकारिणी बरखास्त करणे, नव्या नियुक्त्या जाहीर करणे आणि त्यानंतर काही दिवसांतच त्या स्थगित करणे या घटनाक्रमामुळे शिंदे सेनेच्या जिल्ह्यातील संघटनात्मक नियोजनावर प्रश्न उपस्थित होत आहेत. कार्यकर्त्यांना दिशा देण्याऐवजी संभ्रम निर्माण होत असल्याची भावना अनेक स्तरांतून व्यक्त होत आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २०६ ■ मंगळवार, २३ जून २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# मतदार यादी शुद्धीकरणाचा महाअभियान; १३४२ बीएलओ मैदानात

### ३० जूनपासून घराघरांत पडताळणी; ७ ऑक्टोबरला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार

**वर्धा जनमाध्यम :** आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक आणि त्रुटीमुक्त करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने कंबर कसली आहे. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्ह्यात विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार असून तब्बल १३४२ बूथ लेव्हल अधकिारी (बीएलओ) घराघरांत जाऊन मतदारांची प्रत्यक्ष पडताळणी करणार आहेत. सन २००२ नंतर प्रथमच इतक्या व्यापक स्वरूपात ही गृहभेट मोहीम राबविण्यात येत असल्याची माहिती जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी सोमवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

जिल्ह्यातील प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत समाविष्ट व्हावे आणि अपात्र, दुबार किंवा चुकीच्या नोंदी हटवून यादी अधिक विश्वासार्ह बनवावी, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. यासाठी ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत बीएलओ नागरिकांच्या घरी भेट देऊन माहितीची पडताळणी करणार आहेत. यावेळी मतदार केंद्रांचेही सुसूत्रीकरण करण्यात येणार आहे.



जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी सांगितले की, १ जानेवारी २००२ रोजी अस्तित्वात असलेली मतदार यादी आधारभूत मानून पुनरीक्षणाचे काम केले जाणार आहे. प्रत्येक बीएलओला २००२ च्या मतदार यादीची प्रत उपलब्ध करून देण्यात आली आहे. या मोहिमेदरम्यान दुबार नावे, मृत व्यक्तींची नोंद, स्थलांतरित मतदार तसेच चुकीच्या तपशीलांची दुरुस्ती केली जाणार आहे.

वर्धा जिल्ह्यातील चार विधानसभा मतदारसंघांमध्ये सध्या ११ लाख ३७ हजार २४२ मतदार आहेत. त्यापैकी ९ लाख ८३ हजार ३४० मतदारांचे मॅपिंग पूर्ण झाले असून १ लाख ५३ हजार ९०२ मतदारांचे मॅपिंग अद्याप बाकी आहे. या सर्व प्रक्रियेमुळे कोणताही पात्र मतदार मतदानाच्या हक्कापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेतली जाणार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

पुनरीक्षणानंतर ५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल. त्यावर नागरिकांना ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत आक्षेप व सूचना नोंदविता येणार आहेत. प्राप्त हरकतींचा निपटारा ३ ऑक्टोबरपर्यंत करण्यात येईल आणि ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. पत्रकार परिषदेला अपर जिल्हाधिकारी संजय तेली व उपजिल्हाधिकारी प्रताप वाघमारे उपस्थित होते.

### राजकीय पक्षांचाही सक्रिय सहभाग

मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेत विविध राजकीय पक्षांच्या बूथ लेव्हल एजंट्सचा (बीएलए) सहभाग राहणार असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी प्रताप वाघमारे यांनी दिली. भाजपने १३४२, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) १००, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) २४७ तर शिवसेना (शिंदे गट) ११७० बीएलए नियुक्त केले आहेत. प्रत्येक दहा बीएलओंवर एका पर्यवेक्षकाची नियुक्ती करण्यात आली असून बीएलओ किमान तीन वेळा गृहभेटी देणार आहेत. घर बंद आढळल्यास संपर्क क्रमांकासह माहितीपत्रक ठेवण्यात येणार असल्याने नागरिकांना थेट संपर्क साधता येणार आहे.

### अखेर आद्रा धावून आली

# आकाशातून बरसल्या आशेच्या सरी; उकाड्याने हैराण वर्धेकरांना दिलासा



**वर्धा जनमाध्यम :** रोहिणीने पाठ फिरवली, मृगही कोरडाच निघून गेला आणि पावसाच्या प्रतीक्षेत डोळे लावून बसलेल्या वर्धेकरांना अखेर आद्रा नक्षत्राने दिलासा दिला. सोमवारी दुपारी सुमारे चारच्या सुमारास वातावरणात अचानक बदल झाला आणि वर्धा शहरासह परिसरात पावसाच्या हलक्या सरी बरसल्या. या सरींमुळे उकाड्याने त्रस्त झालेल्या नागरिकांना काहीसा गारवा मिळाला, तर चिंतेत सापडलेल्या शेतकऱ्यांच्या आशाही पुन्हा पल्लवित झाल्या.

यंदा रोहिणी आणि मृग नक्षत्राने अपेक्षाभंग केल्याने जिल्ह्यात पेरणीची कामे मोठ्या प्रमाणात खोळंबली आहेत. सिंचनाची सुविधा असलेल्या काही शेतकऱ्यांनी धाडस करून कपाशीची धूळपेरणी केली असली तरी पावसाअभावी अंकुरलेले पीक वाचविण्यासाठी त्यांची अक्षरशः तारेवरची कसरत सुरू आहे. अशा परिस्थितीत 'आद्रा'च्या आगमनदिनी झालेल्या पावसाच्या सरी या अंकुरलेल्या पिकांसाठी जीवदान देणाऱ्या ठरल्या.

मात्र, जिल्ह्यात अद्यापही सर्वदूर समाधानकारक आणि पेरणीयोग्य पाऊस झालेला नाही. अनेक तलाव, विहिरी आणि जलाशयांची पाणीपातळी झपाट्याने खालावत असून भूगर्भातील जलसाठाही कमी होत आहे. त्यामुळे शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या नजरा अजूनही आकाशाकडेच लागून आहेत.

आता येत्या काही दिवसांत दमदार पावसाची नितांत गरज आहे. अन्यथा पेरण्या रखडण्याबरोबरच जिल्ह्यावर भीषण पाणीटंचाईचे संकट आणखी गडद होण्याची भीती व्यक्त होत आहे. आद्रा'च्या या सरींनी आशेचा किरण दाखविला असला तरी वर्धेकरांना अजूनही मुसळधार पावसाची प्रतीक्षा कायम आहे.

# देहव्यापार प्रकरणात मुस्कान बेपत्ता; अटकेतील आरोपीला ३ दिवसांचा पीसीआर

### पोलिसांची शोधमोहीम वेगात

**वर्धा जनमाध्यम :** सावंगी (मेघे) परिसरातील एका आलिशान सदनिकेत सुरू असलेल्या देहव्यापार रॅकेटचा भंडाफोड झाल्यानंतर मुख्य सूत्रधार मुस्कान उर्फ शबनम हिने पोलिसांनाच चकवा दिल्याचे समोर आले आहे. कारवाईनंतर ती फरार झाली असून तिचा शोध घेण्यासाठी पोलिसांची विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत. दरम्यान, अटकेतील आरोपी राजू उर्फ नीलेश प्रदीप आदेवार याला न्यायालयाने तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या चमूने २० जून रोजी गोपनीय माहितीच्या आधारे सावंगी (मेघे) येथील 'कृष्णाई' इमारतीतील तिसऱ्या मजल्यावरील सदनिकेवर छापा टाकला होता. बनावट ग्राहकाच्या माध्यमातून सापळा रचत पोलिसांनी सुरू असलेल्या देहव्यापाराचा पर्दाफाश केला. या कारवाईत छत्तीसगडमधील एका पीडित महिलेची सुटका करण्यात आली. तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, मुस्कान उर्फ शबनम ही आर्थिक फायद्यासाठी राज्याबाहेरील तसेच राज्यातील महिलांना पैशांचे आमिष दाखवून देहव्यापारात ढकलत होती. त्यांना सावंगी येथील सदनिकेत ठेवून त्यांच्याकडून हा अवैध व्यवसाय चालविला जात असल्याचा आरोप आहे.

या प्रकरणात अटक करण्यात आलेला राजू उर्फ नीलेश आदेवार हा सदनिकेची देखभाल, स्वच्छता तसेच इतर किरकोळ कामे करीत असल्याची माहिती तपासातून समोर आली आहे. छाप्याची खबर लागताच मुख्य सूत्रधार मुस्कान उर्फ शबनम पसार झाली. त्यामुळे या रॅकेटमागील संपूर्ण जाळे उघड करण्यासाठी पोलिसांकडून तिचा कसून शोध घेतला जात आहे.

रविवारी आरोपीला न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने तीन दिवसांची पोलिस कोठडी मंजूर केली. फरार आरोपी महिलेचा शोध सुरू असून लवकरच तिला अटक करण्यात येईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे. सध्या या प्रकरणाचा तपास वेगाने सुरू आहे.

# रेती माफियांना पोलिसांचा दणका; ८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**देवळी जनमाध्यम :** अवैध रेती वाहतुकीविरुद्ध देवळी पोलिसांनी पहाटेच्या सुमारास धडक कारवाई करत रेती माफियांना जबर दणका दिला. वायगाव शिवारात टाकलेल्या सापळ्यात अवैधरित्या रेतीची वाहतूक करणाऱ्या दोघांना अटक करण्यात आली असून ८ लाख ७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अप्पर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे व उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. वंदना कारखेले यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

ठाणेदार संदीप कापडे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे वायगाव ते सोनेगाव बाई मार्गावर नाकाबंदी केली. यावेळी गौरव अशोकराव गोडे (रा. शिरसगाव) व प्रज्वल कवडुजी कोहळे (रा. सोनेगाव बाई) हे शासनाची परवानगी नसताना रेतीची वाहतूक करताना आढळून आले. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेत वाहनासह अवैध रेती जप्त केली.

आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता व महाराष्ट्र जमीन महसूल संहितेअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोहवा गणेश बावणे करीत आहेत. या कारवाईमुळे परिसरातील रेती तस्करांचे धाबे दणाणले आहेत.

### बसचक्र थांबले; विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला ब्रेक

# वर्धा-येळाकेळी-सुरगाव व्हाया सेलू बस सेवा तातडीने सुरू करण्याची जोरदार मागणी

**सेलू जनमाध्यम :** वर्धा-येळाकेळी-सुरगाव व्हाया सेलू या मार्गावरील एसटी बस सेवा गेल्या अनेक महिन्यांपासून बंद असल्याने ग्रामीण भागातील नागरिकांसह विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. आगामी काही दिवसांत शाळा व महाविद्यालयांचे नवीन शैक्षणिक सत्र सुरू होत असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न गंभीर बनला आहे.

बस सेवा बंद असल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना दररोज लांब अंतराची पायपीट करावी लागत आहे. काही जणांना खाजगी वाहनांचा आधार घ्यावा लागत असून त्यासाठी अतिरिक्त खर्च सहन करावा लागत आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ही समस्या अधिकच तीव्र झाली आहे. अनेक ठिकाणी रस्त्यांची अवस्था खराब असून चिखल, खड्डे आणि अपूर्ण कामांमुळे प्रवास धोकादायक ठरत आहे.

ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, कामगार आणि चाकरमान्यांनाही बस सेवा बंद असल्याचा फटका बसत आहे. दैनंदिन कामांसाठी तालुका व जिल्हा मुख्यालयाशी संपर्क साधणे कठीण झाले आहे.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान



टाळण्यासाठी आणि ग्रामीण भागातील जनतेची गैरसोय दूर करण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाने वर्धा-येळाकेळी-सुरगाव व्हाया सेलू ही बस सेवा तातडीने पूर्ववत सुरू करावी, अशी जोरदार मागणी नागरिक, पालक व विद्यार्थी वर्गातून करण्यात येत आहे. बस सेवा सुरू झाल्यास हजारो प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# ब्रिटिशकालीन कारागृहाला अखेर आधुनिकतेची नवी दिशा

### इंझापूर येथे १२० एकर जागेवर उभारणार नवे जिल्हा कारागृह

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा जिल्ह्याच्या न्याय व सुरक्षा व्यवस्थेला बळकटी देणारा आणि अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला महत्त्वाचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. ब्रिटिशकालीन जिल्हा कारागृहाच्या जागी अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज नवीन जिल्हा कारागृह उभारण्याचा मार्ग मोकळा झाला असून, महाराष्ट्र शासनाने मौजा इंझापूर येथील सुमारे १२० एकर जमीन या प्रकल्पासाठी मंजूर केली आहे. या निर्णयामुळे वर्धा जिल्ह्याच्या विकासाला नवी गती मिळणार असून कारागृह व्यवस्थापनातही आमूलाग्र बदल घडणार आहेत.



महसूल व वन विभागाने १७ जून २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार मौजा इंझापूर येथील सर्वे क्रमांक ८२ मधील ४८.२३ हेक्टर क्षेत्र नवीन जिल्हा कारागृहासाठी हस्तांतरित करण्यात आले आहे. या निर्णयामागे राज्याचे गृह राज्यमंत्री तथा वर्ध्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केलेला सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि शासनस्तरावरील प्रयत्न निर्णायक ठरल्याचे मानले जात आहे.

सध्या वर्ध्यातील जिल्हा कारागृह ब्रिटिशकालीन इमारतीत कार्यरत असून त्याची क्षमता आणि सुविधा काळाच्या गरजांनुसार अपुऱ्या ठरत होत्या. पुरुष कैद्यांची क्षमता सुमारे ३२५ तर महिला कैद्यांची क्षमता अवघी १० इतकी आहे. मात्र गेल्या काही वर्षांत गुन्हेगारीचे वाढते प्रमाण, न्यायालयीन कोठडीतील कैद्यांची वाढती संख्या आणि सुरक्षेच्या वाढलेल्या गरजा यामुळे विद्यमान कारागृहावर मोठा ताण निर्माण झाला होता. परिणामी आधुनिक, विस्तीर्ण आणि सुरक्षित कारागृह उभारण्याची मागणी सातत्याने होत होती.

या पार्श्वभूमीवर पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी हा विषय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर सातत्याने मांडला. मुख्यमंत्री तसेच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सहकार्यामुळे अखेर या महत्त्वपूर्ण प्रकल्पाला मंजुरी मिळाली.

### फॉरेन्सिक लॅब आणि प्रशिक्षण केंद्रालाही मंजुरी

वर्धा जिल्ह्याच्या पोलिस यंत्रणेचे आधुनिकीकरण करण्यासाठी डॉ. भोयर यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. गुन्ह्यांच्या तपासाला गती मिळावी आणि रासायनिक विश्लेषण अहवाल तातडीने उपलब्ध व्हावेत यासाठी न्यायवैद्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा (फॉरेन्सिक लॅब) तसेच सुसज्ज निवासी प्रशिक्षण केंद्रालाही मंजुरी मिळाली आहे. याशिवाय पोलिसांवरील वाढता प्रशासकीय ताण कमी करण्यासाठी सेलू येथे उपविभागीय पोलिस कार्यालय उभारण्याचाही प्रस्ताव पुढे सरकत आहे.

वर्धा जिल्ह्यासाठी नवे कारागृह, फॉरेन्सिक प्रयोगशाळा आणि प्रशिक्षण केंद्र यांसारख्या सुविधा मंजूर झाल्याने न्याय, सुरक्षा आणि प्रशासकीय व्यवस्थेच्या बळकटीकरणाकडे जिल्ह्याने एक महत्त्वाचे पाऊल टाकल्याचे मानले जात आहे. नवीन कारागृहाच्या उभारणीमुळे कैद्यांच्या निवास, सुरक्षा, पुनर्वसन आणि प्रशासनाच्या कार्यक्षमतेत मोठी सुधारणा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# दारू तस्कराला सावंगी मेघे पोलिसांचा दणका; ९८ हजारांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा जनमाध्यम :** अवैध दारू वाहतुकी विरोधात सावंगी (मेघे) पोलिसांनी धडक कारवाई करत एका तरुणाला अटक केली असून ९८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे दारू तस्करांचे धाबे दणाणले आहेत.

पोलीस स्टेशन सावंगी (मेघे) चे पथक परिसरात गस्त घालत असताना शिवम किशोर कुहीकर (वय २५, रा. नागसेन नगर, नालवाडी, वर्धा) हा दुचाकीवरून गावठी मोहाची दारू घेऊन येणार



असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी कारला-साटोडा मार्गावरील मानकर यांच्या शेताजवळ नाकाबंदी केली. काही वेळात संशयिताची निळ्या रंगाची सुझुकी ॲक्सेस (एमएच-३२-एटी-७७३०) दुचाकी येताना दिसताच पोलिसांनी शिताफीने त्याला ताब्यात घेतले. झडतीदरम्यान दुचाकीमध्ये दोन प्लास्टिकच्या पिशव्यांत सुमारे ४० लिटर गावठी मोहाची दारू आढळून आली.

जप्त करण्यात आलेल्या मालामध्ये ९० हजार रुपये किमतीची दुचाकी व ८ हजार रुपये किमतीची दारू असा एकूण ९८ हजार रुपयांचा मुद्देमाल आहे.

या प्रकरणी शिवम कुहीकर विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अप्पर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे व उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विनोद गिरी यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली.

# जिल्ह्यातील युवा शेतकरी प्रतिभा महाजन आणि उपकृषी अधिकारी मनोज गायधने यांची पुरस्कारासाठी निवड

**वर्धा जनमाध्यम :** महाराष्ट्र शासनाच्या कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागामार्फत सन २०२३ च्या विविध राज्यस्तरीय कृषी पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे.



यामध्ये नागपूर विभागांतर्गत वर्धा जिल्ह्यातील युवा महिला शेतकरी प्रतिभा महाजन आणि शासकीय श्रेणीतील पुरस्कारासाठी उप कृषि अधिकारी मनोज गायधने यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. कृषी आणि संलग्न क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय व मार्गदर्शक कार्य करणाऱ्या राज्यातील प्रयोगशील शेतकरी व कृषी अधिकाऱ्यांना दरवर्षी विविध श्रेणींमध्ये पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. सन २०२३ करिताचे हे पुरस्कार प्रदान करण्यासाठी कृषी मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली विशेष निवड बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीत निश्चित केलेल्या नावांना शासनाने अंतिम मंजुरी दिली असून लवकरच पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे.जिल्ह्यातील पवनी येथील युवा प्रयोगशील महिला शेतकरी प्रतिभा महाजन यांची युवा शेतकरी पुरस्कारासाठी निवड झाली आहे. त्यांनी शेतीमध्ये राबविलेले नाविन्यपूर्ण प्रयोग आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्याबाबत पुरस्कारासाठी तर गिरड येथे कार्यरत असलेले उपकृषी अधिकारी मनोज झिबलराव गायधने यांची नागपूर विभागातून शासकीय श्रेणीतील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषि सेवारत्न पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. या दोन्ही पुरस्काराच्या निवडीबद्दल जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय तसेच जिल्ह्यातील शेतकरी वर्ग, कृषी विभागाचे अधिकारी आणि नागरिकांमधून कौतुकाचा वर्षाव होत आहे. या पुरस्कारांमुळे जिल्ह्यातील इतर युवा शेतकऱ्यांना तसेच कृषी क्षेत्रातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळणार आहे, असा विश्वास अरविंद उपरीकर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी व्यक्त केला आहे.


**NAME IN CHARGE**

My Old Name as per 10th marksheet diploma certificate and diploma leaving is ATHARVA GAJANAN INGOLE and My New Name as per Aadhar, Voter id, driving licence and other doc is ATHARV GAJANAN INGOLE

Address: post panwadi tah Arvi Pimpalgaon Wardha Maharashtra 442106



**जिल्हा परिषद,वर्धा**
**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग**
**जाहीर निविदा सुचना**

भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, जिल्हा परिषद, वर्धा विभागा अंतर्गत असलेल्या विंधण विहीरीवरील लघु नळ पाणी पुरवठा योजनेचे सबमर्सिबल विद्युतपंप दुरुस्ती करिता वर्धा स्थानिक विद्युत पंप दुरुस्तीचा अनुभव असणा-या कंत्राटदाराकडून दिनांक ०१/०८/२०२६ ते ३०/०७/२०२७ या कालावधी करिता विद्युतपंप दुरुस्तीचे दर निर्धारित करण्यासाठी खालील प्रमाणे दर्शविण्यांत आलेल्या तपशिलानुसार ०२ लिफापा पध्दतीने मोहोरबंद निविदा मागविण्यांत येत आहे.

| अ. क्र. | विवरण | बयाना रक्कम | निविदा विक्रीचा कालावधी | निविदा स्विकारण्यांची तारीख व वेळ | कोरी निविदा किंमत |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | विंधण विहीरी वरील लघु नळ पाणी पुरवठा योजनेचे सबमर्सिबल विद्युतपंप दुरुस्तीचे दर निर्धारित करणे. | ५,५००/- | दिनांक २३/६/२०२६ ते दिनांक २/७/२०२६ सुटीचे दिवस वगळुन | दिनांक ३/७/२०२६ वेळ दुपारी ४.०० वाजेपर्यत | १,१००/- |

निविदाचे कोरे फॉर्म, अटी व शर्ती सह उपअभियंता (यांत्रिकी),भुजल सर्वेक्षण, आणि विकास यंत्रणा, जिल्हा परिषद, वर्धा यांचे कार्यालयात नगदी १,१००/- रुपये भरुन कार्यालयीन वेळेत प्राप्त करता येईल.

मोहोरबंद निविदा उपअभियंता (यांत्रिकी),भुजल सर्वेक्षण, आणि विकास यंत्रणा, जिल्हा परिषद, वर्धा यांचे कार्यालयात दिनांक ३/७/२०२६ रोजी दुपारी ०४.०० वाजेपर्यत किंवा त्यापूर्वी पोहोचतील या बेताने सादर करावेत. मोहरबंद निविदा शक्य झाल्यास त्याच दिवशी उघडण्यांत येतील.

निविदा सादर करतांना दोन लिफाफा पध्दतीचा वापर करावा. लिफाफा क्रमांक ०१ मध्ये बयाना रक्कम भरल्याची चलानची प्रत व इतर आवश्यक कागदपत्रे व लिफाफा क्रमांक ०२ मध्ये फक्त टेंडर फॉर्म असावा. व दोन्ही लिफाफे मोहोरबंद करुन तिस-या स्वतंत्र पाकीटात घालून ते ही मोहोरबंद करावे.

कोणतेही कारण न देता निविदा स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार सक्षम प्राधीकरणाने राखुन ठेवले आहेत.

सही/-
कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग
जिल्हा परिषद,वर्धा

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

### अंजनगाव सुर्जी येथे धक्कादायक प्रकार

# व्हॉल्ट ॲपमध्ये आक्षेपार्ह व्हिडिओ, एकाला अटक

## पोलीस उपविभागीय अधिकारी स्वतः फिर्यादी

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशन हद्दीत एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मोबाईलमधील हिडन 'व्हॉल्ट' ॲपमध्ये आक्षेपार्ह व्हिडिओ सापडल्याप्रकरणी पोलिसांनी २३ वर्षीय तरुणाला अटक केली आहे.या प्रकरणात उपविभागीय पोलीस अधिकारी मनिष ठाकरे यांनी स्वतः फिर्यादी होऊन गुन्हा दाखल केला असून, महाराष्ट्रातील ही कदाचित पहिलीच घटना असावी. त्यांच्या बारकाईने केलेल्या तपासाची तालुक्यात चर्चा होत आहे.

९ जून २०२६ रोजी अंजनगाव पोलीस स्टेशनला एका ३४ वर्षीय महिलेने दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा क्र. ३१५/२०२६ दाखल करण्यात आला. भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ७४, ७५(१), ७८(१), ३५१(१), ३५२ तसेच पोक्सो कायद्याच्या कलम १२ अन्वये हा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.तपास अधिकारी महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशाली दादाराव काळे यांच्या माहितीनुसार, संशयित आरोपी मोहम्मद युनुस मोहम्मद युसुफ (वय २३,रा. मदिना मशीद जवळ, काझीपुरा) याला सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून ताब्यात घेण्यात आले.सध्या आरोपी पोलीस कोठडीत असून मोबाईल फॉरेन्सिक तपासणीसाठी पाठवण्यात आला आहे. व्हिडिओमधील पीडितांची ओळख पटवणे व व्हिडिओचा प्रसार झाला आहे का, याचा तपास मसपोनि काळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. उपविभागीय अधिकारी ठाकरे स्वतः या तपासावर देखरेख ठेवून आहेत. सायबर गुन्हेगारी व महिलांच्या सुरक्षेसंदर्भात कोणालाही अशा प्रकारचा व्हिडिओ आढळल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा, असे आवाहन अंजनगाव सुर्जी पोलिसांनी केले आहे. व्हॉल्ट ॲपसारख्या हिडन ॲपचा गैरवापर करणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल, असा इशाराही पोलिसांनी दिला आहे.

### 'अलार्म'च्या नावाखाली व्हॉल्ट ॲप, त्यात आक्षेपार्ह व्हिडिओ

अटकेच्या वेळी आरोपीचा मोबाईल जप्त करून तपासणी केली असता, 'अलार्म' नावाने दिसणारे परंतु प्रत्यक्षात 'व्हॉल्ट ॲप' असलेले हिडन ॲप्लिकेशन आढळले. पोलिसांनी ते उघडून पाहिले असता, त्यात एक अत्यंत आक्षेपार्ह व्हिडिओ मिळाला. शासकीय पंचांसमक्ष केलेल्या पाहणीत या व्हिडिओमध्ये एक मुलगा आणि एक मुलगी एकांतात शारीरिक संबंध करीत असून हा व्हिडिओ संबंधित व्यक्तींच्या परवानगीशिवाय, लपून चित्रीकरण केल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट झाले आहे. पोलिसांनी सविस्तर पंचनामा करून मोबाईल जप्त केला असून मसपोनि प्रशाली काळे पुढील सखोल तपास करत आहेत.

## उपविभागीय पोलीस अधिकारी ठाकरे यांची तत्परता



या संपूर्ण प्रकरणात उपविभागीय पोलीस अधिकारी मनिष ठाकरे (वय ५५) यांनी विशेष लक्ष घातले. घटनेचे गांभीर्य ओळखून त्यांनी बारकाईने तपासाच्या सूचना दिल्या. तपासादरम्यान मिळालेल्या पुराव्यांच्या आधारे ठाकरे यांनी स्वतः फिर्यादी होत गुन्हा दाखल केला.पोलीस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्याने स्वतः फिर्यादी होण्याची ही महाराष्ट्रातील कदाचित पहिलीच घटना असावी, अशी चर्चा आहे. महिलांच्या सुरक्षेसंबंधीच्या गुन्ह्यांमध्ये वरिष्ठ अधिकारी थेट जबाबदारी घेत असल्याने पोलिसांच्या तत्परतेबद्दल नागरिकांतून समाधान व्यक्त होत आहे. अशा गुन्ह्यांना आळा बसावा यासाठी श्री. ठाकरे यांनी घेतलेला पुढाकार महत्त्वाचा मानला जात आहे.

### अमरावतीत माकडांचा वाढता उपद्रव

# महानगरपालिकेची तातडीची कारवाई, माकडांचे सुरक्षित स्थलांतर



**अमरावती/का.प्र.**

शहरातील गोसावी कॉलनी, सुतगिरणी रोड, न्यू प्रभात कॉलनी ग्राउंड व हनुमान मंदिर परिसरात माकडांचा उपद्रव मोठ्या प्रमाणात वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. परिसरातील माकडे अत्यंत आक्रमक बनल्याने रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांवर विनाकारण हल्ले करण्याच्या घटना वारंवार घडत होत्या. माकडांच्या हल्ल्यांमध्ये आतापर्यंत १० हून अधिक नागरिक जखमी झाले आहेत. एका व्यक्तीला गंभीर दुखापत झाल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून दोन वृद्ध महिलांनाही माकडांनी ढकलून जखमी केले आहे. तसेच एका वृद्ध व्यक्तीच्या डोक्यावर माकडाने नखांनी वार केल्याने त्यांना गंभीर दुखापत झाली आहे.

याशिवाय माकडे घरांमध्ये घुसून अन्नपदार्थ व इतर वस्तूंचे नुकसान करत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या होत्या. या प्रकारामुळे लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून त्यांच्या दैनंदिन जीवनावरही त्याचा परिणाम होत होता. या गंभीर समस्येबाबत स्थानिक नागरिकांच्या तक्रारीनंतर गटनेता तथा सन्माननीय नगरसेवक डॉ. राजेंद्र तायडे यांनी महानगरपालिका प्रशासन, पशुवैद्यकीय विभाग यांच्यात समन्वय साधून तातडीने कारवाईसाठी पाठपुरावा केला. त्यांच्या पुढाकारामुळे या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेण्यात आली. महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांच्या निर्देशानुसार तसेच अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख आणि उपायुक्त नरेंद्र वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली पशुवैद्यकीय विभागामार्फत माकडांना पकडून सुरक्षति ठिकाणी स्थलांतरित करण्याची मोहीम राबविली.कारवाईदरम्यान पशुवैद्यकीय विभागाचे निरीक्षक पंकज कल्याणकर, आरएफओ धनदार अमोल गावणेर तसेच संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# ११ वी प्रवेशाची चौथी फेरी २७ नंतर

**अमरावती-** अमरावती प्रवेशाची तिसरी फेरी शनिवारी २० जून रोजी पूर्णत्वास गेली. गेया तीन दिवसांपासून प्रवेशाचे पोर्टल सतत व्यग्र असल्याचा अनुभव अनेक विद्यार्थ्यांनी बोलून दाखविला. या फेरीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना आगामी २५ जूनच्या सायंकाळी ६ वाजेपर्यंत प्रवेश घेण्याची मुभा देण्यात आली आहे. या फेरीचे प्रवेश पूर्ण झाल्यानंतर आगामी शनिवार २७ जूनपासून चौथ्या फेरीचे प्रक्रिया सुरू केली जाणार आहे.

गुरुवार, १८ जूनपासून तिसरी फेरी सुरू झाली होती. आज मध्यरात्री त्यावर शेवटची नोंद झाली. यावर्षी अकरावीच्या सर्व शाखांचे प्रवेश केंद्रीय पध्दतीने केले जात आहेत. त्यामुळे थेट महाविद्यालयात जाऊन कुणालाही प्रवेश घेता येत नाही. ऑनलाईन पध्दतीनेच अर्ज दाखल केल्यानंतर संबंधित यंत्रणेने अलॉट केलेल्या महाविद्यालया तच प्रवेश घ्यावा लागत आहे. शिक्षण संचालना लयाच्या माहिती नुसार या तीन दिवसांत नवीन विद्यार्थ्यांची नोंदणी तसेच यापूर्वी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना भाग-१ आणि भाग-२ मध्ये बदल सूचविण्याची संधी देण्यात आली होती. एवढेच नव्हे तर महाविद्यालयांचा पसंतीक्रम दर्शविण्या बाबतच्या भाग दोन मध्येही आवश्यक ते बदल करून विद्यार्थ्यांनी त्यांचे लॉगीन पूर्ण केले आहे. ज्या विद्यार्थ्यां नी तिसऱ्या फेरीत भाग घेतला, विद्यार्थ्यांची यादी पोर्टलवर जारी केली आहे.

## उत्तमराव बेलसरे यांचे निधन

**तळेगाव ठाकूर/वार्ताहर**



येथील ज्येष्ठ प्रगतशील शेतकरी उत्तमराव नारायण बेलसरे (वय ७८ वर्षे) यांचे सोमवार २२ जून २०२६ रोजी पहाटे ५ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले.त्याचा पश्चात मुले, सुना, नातवंडे तसेच मोठा आप्तपरिवार आहे.शांत, संयमी व मनमिळावू स्वभावाने ते सर्वांना परिचित होते. निधना बद्दल सर्वत्र हळहळ व्यकत केल्या जात आहे.

## २५ वर्षीय तरूणीचा विनयभंग

**बेलोरा/वार्ताहर**

चांदूरबाजार पोलीस स्टेशन अंतर्गत माधान येथील २५ वर्षीय तरूणीला मोबाईलमध्ये असलेले आक्षेपार्ह फोटो व्हायरल करण्याची धमकी देत पैशाची मागणी करणा-याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून अटक केली आहे. माधान येथील तरूणीच्या भावाशी आरोपी युवकाची ओळख होती. त्यामुळे युवकाचे तिच्या घरी येणे-जाणे होते. सदर तरूणी आरोपीत प्रेमसंबंध निर्माण झाले.याचाच फायदा घेत सदर आरोपीने व्हाट्सॲप कॉलिंग वरून फोटो तयार केले. त्यावरून फिर्यादीला पैशाची मागणी केली. फिर्यादीने आरोपीला १५००० दिले.काही दिवसानंतर शारीरिक संबंधाची मागणी केली. त्यामुळे फिर्यादीने ही गोष्ट आपल्या भावाला आई-वडिलांना सांगितले व चांदूरबाजार पोलीस स्टेशनला तक्रार देण्यात आली, फिर्यादीच्या तक्रारीवरून ठाणेदार अशोक जाधव यांनी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास एपीआय प्रेम कुमार केदार, हेड कॉन्स्टेबल रोशन चव्हाण करीत आहे.आरोपीला अटक करण्यात आली

# संक्षिप्त

## उद्या 'प्रशासन जगाव' धरणे

**अमरावती-** कनिष्ठ महाविद्यालयाची ऑनलाईन संचमान्येतेमध्ये प्रचलित निकष न पाळण्याच्या विरोधात विज्युक्टा व महासंघाने नागपूर विधिमंडळावर, शिक्षण आयुक्त कार्यालय पुणे, शिक्षण उपसंचालक कार्यालय अशी राज्यभर प्रचंड आंदोलने केली. प्रचलित निकष पाळल्या जात नसल्याने शिक्षकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झालेला आहे.शिक्षण आणि शिक्षकांबाबत प्रशासनाच्या या नकारात्मक भूमिकेच्या विरोधात 'प्रशासन जगाव धरणे आंदोलन' संपूर्ण राज्यभर शिक्षण उपसंचालक कार्यालयासमोर टप्प्यांने केले जाणार. २४ जून २०२६ ला सकाळी ११ वाजता अमरावती येथे शिक्षण उपसंचालक कार्यालयासमोर आंदोलन होणार आहे.संच मान्यता करतांना तात्पुरत्या काही दुरुस्त्या झाल्या असल्या तरी अजुनही संचमान्यता समस्याग्रस्त आणि सुटसुटीत नसल्या मुळे बरेच शिक्षक सीएचबी, अर्ध पगारी झाले आहेत. हजारो शिक्षक अतिरिक्त होण्याची सुद्धा भीती निर्माण झाली आहे.विषय क्लब करताना त्या विषयातील पदव्युत्तर पदवी नसल्यास नवीन समस्या निर्माण होत आहेत. प्रात्यक्षिक व स्वाध्याय याची विद्यार्थी संख्या वाढवल्याने शिक्षकांचा कार्यभार कमी होत आहे. मुलींची संख्या तसेच शिक्षार्थ कपात ही प्रावधान असतांना न पाळल्याने तुकड्या अनुदानाला अपात्र होतील. कला व वाणिज्य शाखेला पटसंख्येची गंभीर समस्या, प्रवेशित सर्व विद्यार्थी ग्राह्य न धरल्यामुळे किमान पटाची समस्या निर्माण झाली आहे, अतिरिक्त शिक्षक समायोजित न झाल्यास नियमित वेतनाची समस्या निर्माण होत आहे या प्रश्नासह इतर प्रश्नाला न्याय मिळवण्याकरिता आंदोलनामध्ये जिल्ह्यातील शिक्षकांनी प्रचंड संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन विज्युक्टा पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## सानिका सोलव हिचा आंतरराष्ट्रीय आट्या पाट्या स्पर्धेत सहभाग



**अमरावती -** स्थानिक अस्मिता शिक्षण मंडळ द्वारा संचालित महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयातील बी. ए. भाग २, ला प्रवेशित असलेली विद्यार्थीनी सानिका सोलव हिची भूतान झालेल्या आंतरराष्ट्रीय आट्या पाट्या स्पर्धे करीता भारताचे प्रतिनिधित्व करण्याकरीता निवड झालेली होती. या अगोदर सानिका ने राष्ट्रीय स्तरावर सुद्धा आट्या पाट्या खेळात महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व केलेले आहे. आट्या पाट्या खेळासोबतच सानिका ही खो खो ची सुद्धा उत्कृष्ट खेळाडू आहे. तिने २०२४-२५ व २०२५-२६ दोन्ही वर्षी संत गाडगे बाबा अमरावती चे आंतरविद्यापीठ स्तरावर प्रतिनिधित्व केलेले आहे.अस्मिता शिक्षण मंडळाच्या अध्यक्ष व महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. मीनल भोंडे, संस्थेचे सचिव प्रा.डॉ.मुकुल भोंडे, अस्मिता शिक्षण मंडळ कार्यकारिणीचे सर्व सन्माननीय सदस्य, प्रा.डॉ.श्रीधर धाकुलकर, संचालक, शारिरिक शिक्षण विभाग व महाविद्यालयातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सानिकाचे अभिनंदन केले.ती आपल्या यशाचे श्रेय आपले पालक, प्राचार्य डॉ.मीनल भोंडे, मार्गदर्शक डॉ.श्रीधर धाकुलकर आणि समस्त गुरुजनांना देत आहे.

## शेताजवळ कुजलेल्या अवस्थेत मृतदेह आढळला

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

तालुक्यातील धानोरा (म्हाली) रोडवरील कॅनल परिसरातील एका शेताजवळ रविवारी सकाळी एका व्यक्तीचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली.मृत व्यक्तीची ओळख वसंता बिसन वानखेडे (वय ५५, रा. मिलिंद नगर, चांदूर रेल्वे) अशी झाली आहे. वसंता वानखेडे हे मागील चार ते पाच दिवसांपासून बेपत्ता होते.



त्यांच्या कुटुंबीयांकडून त्यांचा शोध सुरू असतांनाच रविवारी सकाळी हा मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती मिळताच चांदूर रेल्वे पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. त्यानंतर मृतदेहाची ओळख पटविण्यासाठी कुटुंबीयांना घटनास्थळी बोलाविण्यात आले. कुटुंबीयांनी सदर मृतदेह वसंता वानखेडे यांचाच असल्याचे निश्चित केले. त्यानंतर मृतदेह कुजलेल्या अवस्थेत असल्याने शवविच्छेदनाची प्रक्रिया घटनास्थळीच करण्यात आली. त्यानंतर मृतदेह अंत्यसंस्कारासाठी कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आला. रविवारी सायंकाळी सुमारे सात वाजता त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. प्राथमिक माहितीनुसार, मृतदेह अत्यंत कुजलेल्या अवस्थेत असल्याने मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतरच मृत्यूचे खरे कारण समोर येणार असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली. या प्रकरणाचा पुढील तपास चांदूर रेल्वे पोलीस करीत आहेत.

# फार्मर कप स्पर्धा शेतकऱ्यांची जोरदार तयारी सुरू



**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

पाणी फाउंडेशन, कृषी विभाग आणि उमेद या तीन यंत्रणाच्या समन्वयातून शेतकऱ्यांसाठी फार्मर कप स्पर्धा २०२६ सुरू झाली आहे. या फार्मर कप स्पर्धेमध्ये तालुक्यातील ४० गावांतून एकूण ४८ शेतकरी गट निर्माण झाले आहे. या गटाच्या माध्यमातून एकात्मिक पीक व्यवस्थापनाच्या सर्व बाबी शेतकरी आपल्या शेतात राबवित आहे. गटाच्या माध्यमातून सामूहिक स्वरूपात बियाणे, खते, बीज प्रक्रियेसाठी कीटकनाशके व बुरशीनाशके खरेदी करून खर्चात बचत केली आहे. सर्व गटातील सदस्यांच्या माध्यमातून समन्वयाने आपल्या शेतात ज्या आवश्यक बाबी आहे त्या कमी खर्चात राबवित आहे.

गटागटांमध्ये चर्चा करणे, चर्चेच्या माध्यमातून प्रश्न सोडवणे, टप्प्याटप्प्यावर शास्त्रज्ञांचा कृषी तज्ञांचा सल्ला घेणे व त्या सल्ल्याप्रमाणे आपल्या शेतात त्या गोष्टी राबवणे यामुळे शेतीचा योग्य सल्ला मिळून प्रत्येक टप्प्यावर खर्चात बचत होत आहे. प्रत्येक गटाने शेतातील माती तपासणी करून घेतली आहे, जमिनीनुसार सोयाबीन, तूर आणि कपाशी पिकाच्या वाणांची निवड केली आहे.सोयाबीन, कपाशी, तूर पेरण्यापूर्वी बियाण्याची उगवण क्षमता तपासून घेतली आहे. सोयाबीन व तुरीला बीज प्रक्रिया करून घेतली असून आपले बियाणे पेरणीसाठी तयार करून ठेवलेले आहेत. सुधारित पीक पद्धतीसाठी कपाशी साठी सरी वरंबा पद्धत करून ठेवली आहे.तुरीसाठी बेड पाडून ठेवलेले आहेत.

निंबोळ्या जमा करून ५% निंबोळी अर्क घरच्या घरी तयार करणार आहे.

हूमणी अळीचा मागच्या वर्षी मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाला होता त्यामुळे शेतकरी बांधवांनी गटाच्या माध्यमातून हुमणी अळीचे भुंगे पकडण्यासाठी लाईट ट्रॅप आपापल्या शेतात लावलेले आहे.सेंद्रिय खते, शेण खत, कंपोस्ट खत, गांडूळ खत हे गटाने तयार करून किंवा खत गावातुन खरेदी करून आपले शेतीचे उत्पादन कसे वाढेल यासाठी सर्व गट प्रयत्नशील आहेत.

दर आठवड्याला या शेतकरी गटांना पाणी फाउंडेशनचे जयकुमार सोनुले व रेणूका पोहोकार कृषी विभागाचे मेंटर अमोल चौकडे तसेच उमेदच्या मेंटर मोनिका मुनघाटे मार्गदर्शन करीत आहे.या गटशेतीचा निश्चितच चांगला परिणाम शेतीमध्ये दिसून येईल आणि गटागटामध्ये चांगली चर्चा होऊन गावातील शेतकऱ्यांना एक आदर्श निर्माण होण्याच्या परिस्थितीकडे तालुक्यातील शेतकऱ्यांची वाटचाल सुरू आहे.

## जागतिक संगीत दिवस साजरा



**तिवसा-** गुरुसिद्धी संगीत विद्यालय येथे जागतिक संगीत दिनाचे औचित्य साधून विविध प्रकारचे वाद्य वाजवून संगीत दिन उत्साहात साजरा केला. त्यावेळी सर्वप्रथम श्री गुरुदेव कलामंच गुरुदेव नगर येथील सचिव किरण खंडारे यांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.त्यानंतर खंजिरी राम पत्रे, तबला मिरा किरपाणे, चैतन्य पत्रे, नैतिक वानखेडे, गिटार दीपांशु वानखेडे, बासरी हिमांशु वानखेडे, गायन संदीप पत्रे, विजय किरपाने, क्लारनेट बलदेव इंगोले, सॅक्सफोन प्रा. सुनिल इंगोले हार्मोनियम धार्मिक इंगोले अशाप्रकारे अनेकांनी आपला सहभाग नोंदवला होता. कार्यक्रमाचे शेवटी उपदेश इंगोले यांनी भैरवी रागाने कार्यक्रमाची सांगता केली.

# पाऊसगाण्यांतून बरसल्या सूरांच्या सरी



## 'जरा जम के बरसो' ने दिला रसिकमनाला आल्हादक गारवा

**अमरावती/का.प्र.**

श्रावणात घन निळा बरसला, वारा गाई गाणे...नभ उतरू आलं, मी डोलकर दर्याचा राजा, भिजुन गेला वारा, मेघा रे मेघा रे, ये रात भीगी भीगी, रिमझिम गिरे सावन, ओ साजना बरखा बहार आयी सारखी बहुश्रुत गाणी... तयार गळ्याच्या गायकांनी त्या गाण्यांना दिलेला न्याय... सुरेल वाद्यवृंद आणि त्यावर कळस म्हणजे कानसेनांनी तुडुंब भरलेलं सभागृह...असा सुरेल संगम रविवारी संध्याकाळी श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या स्व. सोमेश्वर पुसतकर सभागृहात साधला गेला.


निमित्त होते 'जरा जम के बरसो' या सांगीतिक मैफिलीचे. पावसावर आधारित मराठी, हिंदी गाण्यांचा हा भावरम्य प्रवास अमरावतीकरांनी आपल्या रसिकतेची दमदार दाद देत केला.

आशुतोष देशपांडे, शीतल भट, केतकी मोहदरकर- देशपांडे आणि आदित्य खारोकर यांनी नवी-जुनी पाऊसगाणी हुकुमी सादर करत रसिकांच्या मनावर गारुड केले. निवेदक नितीन भट यांचे सुश्राव्य निवेदन ही कार्यक्रमाची जमेची बाजू ठरले. वाद्यवृंदात सिंथसायझरवर रामेश्वर काळे, तबल्यावर विशाल पांडे, ढोलकवर मनीष आत्राम ऑक्टोपॅडवर वीरेंद्र गावंडे, बासरीवर जानराव देहाळे आणि गिटारवर अभिजित भावे यांनी भरगच्च संगत केली. प्रास्ताविकातून हेमंत थेटे यांनी आयोजनामागील भूमिका विषद केली.

साहस वैदर्भी आणि मैत्र जिवांचे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'जरा जमके बरसो' कार्यक्रमाला स्वरा शास्त्रीय संगीत वर्ग, सरोदे ऑप्टिकल्स, ज्योती केम्पोरियम आणि जोशी व्हेक्टर ॲकॅडमी यांचे भरीव योगदान लाभले.

आयोजनाच्या यशस्वीतेसाठी सुनील सरोदे, अमित कोल्हटकर, चिन्मय जोशी, केदार जोशी, अंजली थेटे, प्रवीण चापोरकर, सुनील सरोदे, प्रवीण केवले, अविनाश शुक्ल, उदय पर्वतकर, दीपक जोशी, सुबोध क्षीरसागर, अविनाश मोहरील, पद्मश्री देशपांडे, प्रशांत बखले, स्मिता जोशी, अपर्णा काटे, अनंत जोशी, संजय जोशी, प्रदीप कन्नूरकर, जयंत कन्नूरकर, मनीषा कन्नूरकर, प्रमोद कन्नूरकर, अजित जोशी, कल्याणी जोशी, शिरीष तेलंग, रश्मी तेलंग, वसंत मस्करे, राधा चितळे, अबोली कन्नूरकर, सुनील पाठक, सूरमणी डॉ. कमलताई भोंडे आणि मुरलीधर भोंडे यांचे पाठबळ लाभले. प्रकाश आणि ध्वनी व्यवस्थेची जबाबदारी गोपाल बंग यांनी सांभाळली तर दृकश्राव्य आणि प्रसारणात संस्कृती स्टुडिओच्या सचिन वाठोडकर यांनी सहकार्य केले.

## शिबिरात विविध आजारांची तपासणी



**तिवसा-** शहरातील भवानीचौक येथे नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेऊन मोफत आरोग्य तपासणी शिबीर उत्साहात झाले.या शिबिरात दमा (अस्थमा), श्वसनविकार, डोळे, कान, नाक व घसा यासंबंधित विविध आजारांची तपासणी करण्यात आली. तसेच डोळ्यांची सर्वसाधारण तपासणी, मोतीबिंदू तपासणी, कान-नाक-घसा तपासणी आणि श्वसनविकारांची तपासणी करण्यात आली. याशिवाय संगणक यंत्राद्वारे फुफ्फुसांची तपासणी करण्यात आली असून आवश्यक औषधांचेही मोफत वितरण करण्यात आले.शिबिरात श्वसनविकार तज्ज्ञ डॉ. परीक्षित ठाकरे, नेत्रविकार तज्ज्ञ डॉ. दिशा ठाकरे तसेच कान, नाक व घसा तज्ज्ञ डॉ. तेजल सोलार (लाखेकर) यांनी उपस्थित रुग्णांची तपासणी करून आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन केले.शिबिरासाठी अंकुश देशमुख, श्रेयश देशमुख, डॉ. रितेश गोरे (फिजिओथेरपिस्ट), सूरज तवर, मयूर वानखडे, विजय बांते, भूषण मुंदाणे, सुमित अनासने, रुतिक देशमुख, भाग्येश गौरखेडे, अक्षय रोडगे, रोहन वानखडे, सूरज गौरखेडे, दिनेश लोहकरे, प्रथमेश गौरखेडे, यश गौरखेडे, कुणाल गौरखेडे, अक्षय तायवाडे, अंश शिकरे, आकाश कोसे व विक्रांत ठाकरे यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## अंमलबजावणी गरजेची

आरोग्याशी संबंधित सामान्य समस्यांसाठी डॉक्टरांकडे न जाता 'मेडिकल'मध्ये जाऊन औषध खरेदी करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. विविध अहवालांनुसार भारतात हे प्रमाण ५३ ते ६४ टक्के आहे. विशेष म्हणजे, उच्चशिक्षित लोकांमध्ये ही प्रवृत्ती जास्त आहे. डोकेदुखी, सर्दी, खोकला आणि ताप यांसारख्या आजारांना लोक गंभीर मानत नाहीत. अशावेळी डॉक्टरांकडे जाणे त्यांना वेळेचा अपव्यय वाटते. डॉक्टरांची फी आणि तपासणीचा खर्च हा देखील महत्त्वाचा पैलू असून पैसे वाचवण्यासाठी लोक औषध विक्रेत्याला प्राधान्य देतात, हे कटू असले तरी सत्य आहे. पूर्वी ताप, सर्दी, डोकेदुखी यांवरची गोळी घेण्यापर्यंत या सवयी मर्यादित होत्या; पण गेल्या काही वर्षांत औषधनिर्मिती क्षेत्रात 'सिरप संस्कृती'चा प्रसार-प्रचार मोठ्या प्रमाणावर झाला. लहान मुलांना खोकल्याच्या गोळ्या देण्यातील अडचणी आणि त्यांचा कडूजारपणा यावर औषध कंपन्यांनी कफ सिरप नावाचे जादुई द्रव्य बाजारात आणले आणि पाहता पाहता एखाद्या एनर्जी ड्रिंकप्रमाणे त्याची 'लोकप्रियता' वाढत गेली; परंतु केंद्र सरकारने मोठा निर्णय घेत कफ सिरप उत्पादनावरील आणि विक्रीवरील काही सवलती रद्द केल्या.यासाठी केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने एका राजपत्रित अधिसूचनेद्वारे औषध नियमावलीच्या 'शेड्यूल के'मधून 'सिरप' हा शब्द पूर्णपणे वगळला. या बदलामुळे १००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या लहान गावांमधील किराणा किंवा जनरल स्टोअर्समध्ये खोकल्याची औषधे विकण्याची विशेष सवलत संपुष्टात आली. यापूर्वी अशा दुर्गम भागांत ही औषधे विकण्याची मुभा होती; परंतु आता केवळ परवानाधारक मेडिकल स्टोअर्सवर आणि तिथे फार्मासिस्ट उपस्थित असतानाच कफ सिरपची विक्री करता येईल आणि डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय ती खरेदी करता येणार नाहीत. अलीकडील काळात कफ सिरपची गुणवत्ता आणि अनिर्बंध वापर याबाबत अत्यंत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. ऑक्टोबर २०२२ मध्ये जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) इशारा जारी केला. पश्चिम आफ्रिकेतील गाम्बिया या देशात भारतीय कंपनीने बनवलेली चार कफ सिरप प्यायल्याने ७० मुलांचा मृत्यू झाला होता. डब्ल्यूएचओच्या प्रयोगशाळा तपासणीत या औषधांमध्ये 'डायइथिलिन ग्लायकॉल' आणि इथिलीन ग्लायकॉलची अत्यंत घातक पातळी आढळून आली.यामुळे भारताच्या औषध निर्यातीला आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठा फटका बसला. भारतीय औषधांची गुणवत्ता आणि त्यांच्यावर देखरेख ठेवणाऱ्या यंत्रणेवर जागतिक पातळीवर मोठी टीका झाली. गतवर्षी मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये दूषित कफ सिरपच्या सेवनामुळे २७ निष्पाप बालकांचे प्राण गेले. चौकशीदरम्यान काही कफ सिरपमध्ये अत्यंत विषारी रसायने आढळून आली. त्यानंतर राज्य सरकारांनी संबंधित उत्पादनांवर बंदी घातली. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने घेतलेला निर्णय महत्त्वाचा आहे. २०२० मध्ये जम्मू-काश्मीरच्या उधमपूर जिल्ह्यात कफ सिरप प्यायल्याने १२ लहान मुलांचा किडनी निकामी होऊन मृत्यू झाला. त्यावेळी या सिरपमध्ये डायइथिलिन ग्लायकॉल हा घातक घटक आढळला होता. मानवी जीवनाची सुरक्षा आणि औषधांचा गैरवापर रोखण्यासाठी हा तात्पुरता त्रास सहन करणे आवश्यक असल्याचे केंद्र सरकारचे मत आहे. यापूर्वीही सरकारने अनेक औषधांच्या विक्रीबाबत कडक कायदे केले; परंतु स्थानिक पातळीवर औषध विक्रेत्यांशी असलेल्या ओळखीमुळे, सहानुभूतीमुळे, संवेदनशीलपणामुळे किंवा दबावामुळे अनेकदा चिठ्ठीशिवाय औषधे विकली जातात. 'शेड्यूल के'चा मुख्य उद्देश ग्रामीण आणि दुर्गम भागातील नागरिकांना औषधे सहज उपलब्ध करून देण्याचा होता. ज्या भागांमध्ये परवानाधारक औषध दुकाने किंवा वैद्यकीय सुविधा कमी होत्या, तेथे काही विशिष्ट औषधांच्या विक्रीला सवलत दिली होती.काळाच्या ओघात ही सवलतच नियामक व्यवस्थेतील एक मोठी पोकळी ठरली. अनेक प्रकारचे सिरप सहज उपलब्ध होऊ लागल्याने स्वमर्जीने औषधे घेण्याची प्रवृत्ती वाढली आणि त्याचे आरोग्यावर दुष्परिणाम दिसू लागले. खोकला अनेक गंभीर आजारांचे लक्षण असू शकतो. विषाणूजन्य संसर्ग, लर्जी, दमा, न्यूमोनिया, क्षयरोग किंवा फुफ्फुसांच्या इतर विकारांमुळे खोकला उद्भवू शकतो. केवळ कफ सिरप घेऊन लक्षणे दडपली गेली, तर मूळ आजाराचे निदान उशिरा होण्याची शक्यता असते. त्यामुळे डॉक्टरांचा सल्ला घेऊनच उपचार करणे आवश्यक असते. प्रिस्क्रिप्शन आधारित विक्रीमुळे योग्य तपासणी, अचूक निदान आणि सुरक्षित औषधोपचाराला चालना मिळेल.कफ सिरपमध्ये कोडीन किंवा डेक्स्ट्रोमेथॉर्फनसारखे घटक असतात. जास्त प्रमाणात घेतल्यास ते व्यसनाधीनता निर्माण करू शकतात. किशोरवयीन आणि तरुणांमध्ये काही कफ सिरपचा नशेसाठी वापर होत आहे. कोडीन हा ओपिऑईड गटातील घटक असून जास्त प्रमाणात घेतल्यास त्याचा परिणाम मॉर्फिनसारखा होऊ शकतो. काही सिरपमधील संयुगांमुळे मतिभ्रमासारखी लक्षणेही निर्माण होऊ शकतात. लहान मुलांना शांत झोप लागावी म्हणून अँटिहिस्टामीनयुक्त कफ सिरप सर्रास दिले जाते. नव्या नियमांमुळे याला आळा बसण्याची अपेक्षा आहे. सरकारने विक्रीवर नियंत्रण आणले, तरी उत्पादन प्रक्रियेतील त्रुटींवर थेट उपाय केलेला नाही. गाम्बिया, उझबेकिस्तान किंवा मध्य प्रदेशातील घटनांचे मूळ कारण वितरण नव्हते, तर कच्च्या मालातील भेसळ आणि गुणवत्ता नियंत्रणातील अपयश होते. त्यामुळे केवळ प्रिस्क्रिप्शनची अट घालून समस्या सुटणार नाही.औषध कंपन्यांसाठी अधिक कठोर गुणवत्ता मानके, कच्च्या मालाची स्वतंत्र तपासणी, नियमित लेखापरीक्षण आणि दोषी कंपन्यांवर कठोर कारवाई यांचीही गरज आहे. या संपूर्ण निर्णयाचे यशापयश औषध विक्रेत्यांवर अवलंबून आहे. औषध विक्री ही किराणा मालासारखी नाही. त्याचा डोस, औषधांचे परस्पर परिणाम आणि सुरक्षितता यांबाबत डॉक्टरांचा सल्ला अत्यावश्यक असतो. फार्मासिस्टशिवाय औषध विक्री रुग्णांच्या जीवाशी खेळण्यासारखे ठरते. महाराष्ट्रात महेश झगडे एफडीएचे आयुक्त असताना त्यांनी प्रिस्क्रिप्शनच्या सक्तीबरोबरच बिल देणे सक्तीचे असावे, असाही नियम लागू केला होता. कारण, एखाद्या औषधाच्या बॅचमध्ये दोष आढळला किंवा ती परत मागवण्याची वेळ आली, तर बिलांच्या नोंदीमुळे संबंधित औषधांचा मागोवा घेणे शक्य होते. २०२३ च्या अखेरीस औषध नियंत्रक समितीने केलेल्या तपासणीत अनेक कंपन्यांचे कफ सिरप दर्जाच्या निकषांवर निकृष्ट ठरले होते. नागरिकांच्या जीवाशी सुरू असलेला हा खेळ थांबावा, हाच सरकारचा मुख्य उद्देश आहे. औषध विक्रेते, डॉक्टर आणि समाजाने सुजाणपणा दाखवून या निर्णयाची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.



# शेतकऱ्यांना हवी उत्पन्नाची हमी

**एकीकडे 'एल निनो'मुळे दुष्काळाचे सावट, तर दुसरीकडे शेतीमालाच्या भावातील अनिश्चितता; अशा दुहेरी कात्रीत शेतकरी सापडला आहे. बदलत्या हवामानामुळे शेतीतील उत्पन्नाची अनिश्चितता वाढत असताना, शेतकऱ्यांना केवळ पीकविमा किंवा तात्पुरत्या भरपाईवर देऊन चालणार नाही. तर किमान उत्पन्नाची कायदेशीर आणि शाश्वत हमी देण्याची वेळ आता आली आहे.**

'एल निनो' मुळे कमी पावसाचे सावट असल्याने सलग दुसऱ्या वर्षी खरिपावर संकट आहे. रब्बीचेही भवितव्य अंधारात आहे. अशा परिस्थितीत शेतकरी तगण्यासाठी सरकारकडून किमान उत्पन्नाची हमी आवश्यक आहे. अमेरिका आपल्या शेतकऱ्यांना बाजारभाव आणि एकरी उत्पन्नाची हमी देऊन संकटात सावरते. त्यामुळे जागतिक शेतीमाल बाजारात अमेरिकेचा दबदबा निर्माण होऊ शकला. केवळ एल निनोच्या संकटात नाही, तर आयातीमुळे शेतीमालाचे भाव पडून निर्माण होणाऱ्या संकटातही आपल्या शेतकऱ्यांना उत्पन्नाची हमी क्रमप्राप्त ठरली आहे.

बदलत्या वातावरणामुळे शेती बेभरवशाची होत आहे. हे संकट केवळ एखाद दुसऱ्या देशापुरते मर्यादित नाही, तर जगातील सर्वच देशांमधील शेतकऱ्यांचे अर्थकारण अस्थिर झाले आहे. आपलेच उदाहरण घ्यायचे झाले, तर २०२५ च्या मॉन्सून हंगामात सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला. पण हा पाऊस खरीप पिकांसाठी मारक ठरला. देशात लाखो हेक्टरवरील पिकाचे नुकसान झाले होते. महाराष्ट्रातच ९५ लाख हेक्टरवरील पिकांना अतिवृष्टीचा फटका बसला होता. गेल्या वर्षी अतिवृष्टीमुळे खरीप वाया गेला तर यंदा एल निनोमुळे कमी पावसाचे सावट आहे. सलग दुसरा खरीप संकटाच्या छायेत आहे. गेल्या वर्षीच्या अतिवृष्टीमुळे रब्बीचा हंगाम तरी साधता आला. पण यंदा कमी पावसाच्या शक्यतेमुळे रब्बीचे काय होणार? याविषयी आताच चिंता आहे.

हा प्रश्न केवळ भारतातील शेतकऱ्यांपुढेच आहे, असे नाही. आशिया, ऑस्ट्रेलिया आणि आफ्रिकेतील देश, तसेच अमेरिकेतील काही शेतकऱ्यांपुढे हा प्रश्न आहे. कमी पाऊस आणि दुष्काळामुळे या देशांतील शेतकरी अडचणीत येणार आहेत. शेतकरी कुटुंबांचे उत्पन्न कमी होणार आहे. पीक नुकसान, रोजगाराचा अभाव, पशुधन हानी, महागाई ही संकटे ग्रामीण भागात उद्भवणार आहेत. अशी संकटे कमी अधिक प्रमाणात आता दर वर्षीच पाहायला मिळत आहेत. शेती पिकातून उत्पन्नाची हमी राहिलेली नाही. त्यातच भारतासारख्या देशात सरकारी धोरणांची कुऱ्हाड शेतकऱ्यांच्याच आर्थिक हितावर घाव घालते.

काही देश आपल्या शेतकऱ्यांना संकटाच्या काळात आधार देण्यासाठी काही योजना राबवितात. भारताने शेतीमाल आयात करावा यासाठी दबाव आणणारा अमेरिका देश आपल्या शेतकऱ्यांना बाजारभावाची आणि उत्पन्नाची हमी देतो. या देशातील शेतकऱ्यांना वेगवेगळ्या माध्यमातून अनुदान दिले जाते. यामुळे बाजारभाव पडले तरी अमेरिकेतील शेतकऱ्यांना सरकारी अनुदानामुळे एका निश्चित उत्पन्नाची हमी असते. पण भारतात उलटे होते. सरकार स्वस्त आयात करून भाव पाडते आणि शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडते. देशातील शेतकरी मागील काही वर्षातील शेतीमालाचे कमी भाव, सरकारचे आयातजीवी धोरण, नैसर्गिक संकटे आणि वाढती महागाई यामुळे अडचणीत आले आहेत. त्यामुळे भारत सरकारनेही अमेरिकेप्रमाणे शेतकऱ्यांच्या किमान उत्पन्नाचा विचार करण्याची गरज आहे.

### बाजारभाव संरक्षण योजना

अमेरिकेचे सरकार आपल्या शेतकऱ्यांसाठी बाजारभाव घसरण संरक्षण योजना राबवते. या योजनेत अमेरिकेचे सरकार पिकाची प्रभावी संदर्भ किंमत (इफेक्टिव रेफरन्स प्राइस) ठरवते. जर त्या पिकाचा विपणन वर्षातील भाव प्रभावी संदर्भकिमतीपेक्षा कमी झाला, तर शेतकऱ्यांना आर्थिक मदत दिली जाते. थोडक्यात, ही योजना पिकांच्या बाजारभावात मोठी घसरण झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देणारी किंमत-आधारित मदत योजना आहे. या योजनेत अमेरिकेने कापूस, सोयाबीनसह तेलबिया पीके, मका, गहू, ज्वारी, तांदुळ, काही कडधान्य पिके, बारली, ओट्स आणि भुईमूग या पिकांचा समावेश केलेला आहे. अमेरिकेने पिकांच्या संदर्भ किमतीत २०२५ मध्ये वाढ केली आहे. उदा. २०१८ मध्ये सोयाबीनची प्रभावी संदर्भ किंमत ८.४० डॉलर प्रति बुशेल्स होती, ती २०२५ मध्ये १० डॉलर (प्रति क्विंटल ३४६२ रुपये) करण्यात आली आहे. तर कापसाची संदर्भकिंमत ३६ सेंट प्रति पाउंडवरून ४२ सेंट प्रति पाउंड (प्रति क्विंटल ८७१७ रुपये) करण्यात आली आहे. मक्याची संदर्भ किंमत ४.१० डॉलर प्रति बुशेल्स (प्रति क्विंटल १५२२ रुपये), गव्हाची ६.३५ डॉलर प्रति बुशेल्स (प्रति क्विंटल २२०० रुपये) आणि ज्वारीची संदर्भ किंमत ४.४० डॉलर प्रति बुशेल्स (प्रति क्विंटल १६३४ रुपये) करण्यात आली आहे. तर वाळलेल्या वाटाण्याचा भाव २३.७५ डॉलर प्रति हंड्रेडवेट (प्रति क्विंटल ४८७६ रुपये) संदर्भकिंमत ठरविण्यात आली आहे. या महत्त्वाच्या पिकांसह २२ पिकांची संदर्भ किंमत ठरविण्यात येते. आपल्याकडेही २२ पिकांचे हमीभाव ठरवले जातात. पण हमीभावापेक्षा कमी भावात शेतीमाल विकावा लागला तर आर्थिक मदत मिळत नाही. म्हणजेच सरकारने खरेदी केल्याशिवाय हमीभावाला काही अर्थ उरत नाही. पण अमेरिकेत सरकार खरेदी करत नाही. तर सरकारने ठरवलेल्या प्रभावी संदर्भ किमतीपेक्षा भाव कमी मिळाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक मदत दिली जाते. त्यामुळे कमी बाजारभाव मिळालेल्या शेतकऱ्यांना मदत मिळते. आपल्याकडे हमीभावापेक्षा कमी भाव मिळाल्यास सरकारची कोणतीही मदत मिळत नाही.म्हणजेच अमेरिकेच्या या योजनेचा १०० टक्के शेतकऱ्यांना फायदा मिळतो. तर आपल्याकडे हमीभावाचा केवळ १० ते १२ टक्के शेतकऱ्यांना लाभ मिळतो. उरलेल्या शेतकऱ्यांना कमी भावात आपला माल विकावा लागतो. म्हणजेच आपल्या शेतकऱ्यांसाठी हमीभाव ठरवला जातो, पण त्याचा फार काही फायदा होत नाही. पण अमेरिकेत सरकारने ठरविलेल्या संदर्भ किमतीचे भावाला संरक्षण आहे. बाजारभाव कितीही कमी झाले तरी अमेरिकेतील शेतकऱ्यांना या किमतीची शाश्वती राहते. त्यामुळेच अमेरिकेतील शेतकरी कमी भावात आपल्या मालाची निर्यात करतात आणि जागतिक बाजारावर निर्माण करतात. तुम्हाला आठवत असेल अमेरिकेचे डोनाल्ड ट्रम्प यांनी टॅरिफ वॉर सुरू केल्यानंतर अमेरिकेच्या सोयाबीनचे भाव पडले होते. किमती प्रभावी संदर्भ किमतीच्या थोड्या खाली आल्या होत्या. त्यामुळे अमेरिकेच्या सरकारने शेतकऱ्यांना बाजारभाव घसरण संरक्षण योजनेत बुशेल्स ४१ सेंट्स (प्रति क्विंटल १४३ रुपये) आर्थिक मदत दिली होती. तर २०२४ मध्ये अमेरिकेने आपल्या कापूस उत्पादकांना प्रति क्विंटल ५५८ रुपये आर्थिक मदत होती. आपल्या शेतकऱ्यांना बाजारभाव पडलेल्या काळात कोणतीही मदत मिळत नाही.

### शेती उत्पन्न जोखीम संरक्षण

अमेरिका आपल्या शेतकऱ्यांना एकरी पीक उत्पादनातून मिळणाऱ्या उत्पन्नाचेही संरक्षण देते. शेतकरी एकतर जिल्हा पातळीवर किंवा वैयक्तिक पातळीवर या योजनेत सहभागी होऊ शकतात. जिल्हा पातळीवर शेतकऱ्यांनी उत्पन्नाचे संरक्षण घेतले, तर संबंधित जिल्ह्यातील एक एकर पिकातून मिळणारे उत्पन्न त्या जिल्ह्याच्या संरक्षित उत्पन्नांपेक्षा कमी आले, तर शेतकऱ्याला आर्थिक मदत मिळते. शेतक-यांना संरक्षण घेतले असल्यास संबंधित शेतकऱ्याचे पिकातून मिळालेले उत्पत्र घेतलेल्या संरक्षित कमी असेल, तर आर्थिक मदत मिळते. शेतक-यांना गेल्या ५ वर्षात एक एकरमधून मिळालेल्या उत्पत्राच्या ८५ ते ९० टक्क्यांपर्यंत संरक्षण घेता येते. म्हणजेच शेतक-यांना एक एकर मधुन मिळणा-या उत्पन्नालाही संरक्षण आहे. उत्पन्न जोखीम संरक्षण आणि बाजारभाव घसरण संरक्षण या दोन्ही योजनेत सहभागी होण्यासाठी भराव्या लागणाऱ्या हप्त्यात सरकारचा वाटाही मोठा असतो. पण संरक्षण घेतलेल्या पातळीपेक्षा भाव किंवा उत्पन्न कमी झाल्यास शेतक-यांना आर्थिक मदतीची हमी असते. म्हणजेच अमेरिकेच्या शेतकऱ्यांना उत्पनाची हमी आहे. अमेरिकेने आपल्या सोयाबीन उत्पादकांना २०२५ मध्ये सोयाबीन बाजारभाव घसरण संरक्षण योजना आणि एकरी उत्पन्न योजनेतून १४० कोटी डॉलर (१३ हजार ३०० कोटी रुपये) आर्थिक मदत दिली होती. तर कापूस उत्पादकांना या दोन्ही योजनांमधून १०० कोटी डॉलरची मदत दिली होती. सर्व प्रकारचे अनुदान, घेट आर्थिक मदत, नैसर्गिक आपत्तीतील मदत या सर्वांचा विचार केल्यास अमेरिकेतील शेतकऱ्यांना सरकारकडून वर्षाला ३० ते ४० हजार डॉलर म्हणजेच रुपयात २९ ते ३८ लाख रुपये मिळतात. वेगवेगळ्या पिकांसाठी एकरी १५ ते २० हजार रुपये मिळतात. त्यामुळे बाजारभाव कमी झाले तरी अमेरिकेतील शेतकरी तगून जातो.

### भारताचा शेतकरी कसा तगणार?

भारत आणि अमेरिकेच्या व्यापार कराराच्या वाटाघाटी सुरू आहेत. भारताने कापूस, सोयाबीन, मका ही पिके घ्यावीत यासाठी अमेरिका दबाव आणत आहे. भारताने पशुखाद्यासाठी ज्वारी घेण्याचे मान्य केलेच आहे. पण अमेरिका आपल्या शेतकऱ्यांना एवढ्या प्रमाणात आर्थिक मदत करते. म्हणून अमेरिकेतील शेतकरी आपल्यापेक्षा निम्म्या किमतीतही सोयाबीन, कापूस, मका आणि इतर शेतीमाल निर्यात करु शकतात. पण आपल्या शेतकऱ्यांना सरकारकडून अशी मदत मिळत नाही. त्यामुळेच अमेरिकेतून शेतीमाल आयातीला विरोध आहे. केंद्र सरकार अमेरिकेच्या शेतकऱ्यांचेही गोडवे गाते. पण अमेरिकेचे सरकार त्यांच्या शेतकऱ्यांना किती आधार देते, याचा बोध सरकार घेताना दिसत नाही.

यंदा भारतात दुष्काळी परिस्थिती राहण्याची शक्यता आहे. अमेरिकेत अनेक भागात एल निनोच्या काळात चांगला पाऊस होत असतो. त्यामुळे अमेरिकेतील शेतकऱ्यांपुढे तेवढे आव्हान नसेल. पण सरकारच्या धोरणाने अमेरिकेचा शेतकरी अशा संकटांना तोंड देऊ शकतो. याचे शहाणपण आपल्या सरकारने घेणे गरजेचे आहे. अशा संकटाच्या काळात अमेरिकेप्रमाणे शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देणाऱ्या योजना, आवश्यक आहेत.

आपले सरकार शेतकऱ्यांना पीएम किसानमधून केवळ वर्षाला ६ हजार रुपये देते. पीकविमा योजनाही कुचकामी ठरत आहे. गेल्या खरिपात राज्यात विक्रमी ९५ लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले असतानाही केवळ १७०० कोटींच्या दरम्यान भरपाई मिळाली आहे. शेतकरी एल निनोच्या संकटाशी दोन हात करून पीक घेतीलही. पण या पिकाला भावाची शाश्वती नाही. उत्पादन कमी झाल्यास शेतकऱ्यांना आधार देण्याऐवजी सरकार आयात करून भाव आणखी पाडेल, ही शक्यता नाकारता येत नाही. भारत सरकार शेतकऱ्यांना बाजारभाव किंवा उत्पन्नाची हमी देण्याऐवजी शेतीमालाचे भाव पाडून महागाई कशी कमी ठेवता येईल, हे उद्दिष्ट बाराही महिने गाठण्याचा कसोशीने प्रयत्न करते. धोरणकर्त्यांच्या याच मानसिकतेने भारतातील शेतकऱ्यांची परिस्थिती हलाखीची होत आहे. संकटांशी दोन हात करून काबाडकष्ट करूनही शेतीमालाला भावाची शाश्वती नाही किंवा वर्षभरात आपल्या कुटुंबाला किती उत्पन्न मिळेल, याची हमी नाही. त्यामुळे आपले पंतप्रधान आणि धोरणकर्त्यांनी अमेरिकेकडून शेतकऱ्यांविषयीची धोरणे कशी असावी? याचा बोध घ्यावा. किमान हमीभावाची शाश्वती मिळाल्यास अमेरिकेतील शेतकऱ्यांप्रमाणे आपल्या शेतकऱ्यांना उत्पादन वाढवण्यास आणि शेतीत गुंतवणूक करण्यास मदत होईल. (साभार ॲग्रोमनी)

**अनिल जाधव**

# 'माझ्या आधी कसा रे गेलास भाऊराव...'

**दंतकथा वाटावी अशी ६८ वर्षांची गुरु-शिष्य परंपरा:प्रा.प.सी. काणे आणि 'भाऊराव' बी. टी. देशमुख...**

काही प्रसंग काळाच्या छातीवर असे कोरले जातात की,तिथून मानवी मूल्यांची नवी व्याख्या जन्माला येते.नुकताच अमरातीने आणि पर्यायाने संपूर्ण महाराष्ट्राने एक अत्यंत वेदनादायी, पण तितकाच अथांग मानवी नातेसंबंधांचा प्रसंग अनुभवला.

विदर्भाच्या हक्कासाठी विधिमंडळात तब्बल ३० वर्षे डरकाळी फोडणारे,'सिंचन अनुशेष निर्मूलनाचे महर्षी' आणि 'खरे ज्ञानयोगी' माजी आमदार आदरणीय प्रा.बी.टी. देशमुख सरांचे नुकतेच निधन झाले. संपूर्ण वातावरण शोकाकुल होते, डोळ्यात अश्रू होते. पण या गर्दीत एक असा प्रसंग घडला,ज्याने तिथे उपस्थित असलेल्या प्रत्येक संवेदनशील मनाला पिळवटून टाकले आणि उपस्थितांचे डोळे पाणावले

एका गुरूची आर्त हाक...

व्ही.एम. व्ही. कॉलेजचे माजी प्राचार्य, आदरणीय प्रा.प.सी. काणे सर आपल्या लाडक्या शिष्याच्या,म्हणजेच बी.टी.सरांच्या अंतिम दर्शनासाठी आले होते. वय वर्षे नव्वदी पार केलेले काणे सर जेव्हा पार्थिवाजवळ पोहोचले,तेव्हा ६८ वर्षांचा प्रदीर्घ ऋणानुबंध एका क्षणात त्यांच्या डोळ्यांसमोरून सरकून गेला असावा.


अत्यंत भावूक होऊन,थरथरत्या आवाजात त्यांच्या मुखातून शब्द बाहेर पडले:

'माझ्या आधी कसा रे गेलास भाऊराव...'

हे शब्द केवळ एका मित्राचे नव्हते,तर एका अशा गुरूचे होते ज्याने आपल्या शिष्याची उंची स्वतःपेक्षाही मोठी झालेली आनंदाने आणि अभिमानाने पाहिली होती. या एकाच वाक्याने संपूर्ण वातावरण अत्यंत धीरगंभीर आणि सुन्न होऊन गेले.

'मंजुषा,भाऊराव माझ्यामुळे नाही गं,मी भाऊरावमुळे आहे..जे काही आहे,ज्या काही नावाने मी ओळखला जातो,ते फक्त भाऊरावमुळे!'

आजच्या या अत्यंत व्यावसायिक, स्वार्थी आणि 'मी'पणाच्या अहंकारात जगणाऱ्या जगात असे उद्गार ऐकायला मिळणे ही एक दुर्मिळ घटना आहे. केवढे हे मोठे मन! स्वतः गुरु असून, शिष्याविषयी





एवढी कृतज्ञता आणि त्याची महती मानणारा गुरु आजच्या जगात शोधूनही सापडणार नाही.ज्या माणसाने स्वतः शेकडो विद्यार्थी घडवले,तो गुरु आपल्या शिष्याला आपल्या अस्तित्वाचे श्रेय देतो,तेव्हा ती गुरु-शिष्याची परंपरा एका अलौकिक शिखरावर पोहोचलेली असते.बी. टी. देशमुख सरांना हक्काने 'भाऊराव' म्हणणारे आई आई-वडिलांनंतर कदाचित काणे सर हे या पृथ्वीतलावरील एकमेव व्यक्ती असावेत.

हा प्रसंग पाहताना सहज मनात आले आजची पिढी ज्या गतीने नात्यांमधील ओलावा गमावून बसत आहे, ते पाहता आगामी पिढ्यांना ही कथा दंतकथा वाटेल का? बी टी सरांच्या घरासमोर माझे घर आहे परंतु सरांच्या घरावर कुठेही माजी आमदार असा उल्लेख असलेली पाटी नाही तरीही कॉलनी वासी मात्र आपला पत्ता आमदार बी टी देशमुख यांचे घरासमोर असाच लिहितात. पाटी नसतानाही केवळ नावाने व्यक्तीला ओळखले जाणे हल्ली दुरापास्त झाले आहे.

काणे सरांच्या बाबतीत प्रतिष्ठित संस्थेचे प्राचार्य, मुलगा नागपूर विद्यापीठाचा कुलगुरू राहिलेला तरीही अत्यंत साधी राहणी आणि जमिनीवर पाय असलेली माणसं बोटावर मोजण्या इतकी उरली.

त्याच क्षणी व्हीलचेअर वरून,नीट उभे राहता येत नसताना बीटी ना भेटायला आलेले प्रा. दि.व्य.जहागीरदार यांना बघून देखील काणे सरांनी आपल्या सहकाऱ्याच्या तोंडावरून हात फिरवत म्हंटले तब्येतीला जप बाबा.

'अशी हाडामासाची, तत्त्वावर जगणारी आणि मूल्यांसाठी एकमेकांवर जीवापाड प्रेम करणारी माणसं या पृथ्वीवर कधी काळी अस्तित्वात होती,' यावर कदाचित पुढच्या पिढीचा विश्वासही बसणार नाही.

ज्याप्रमाणे बी.टी.सरांनी शिक्षकांच्या हक्कांसाठी माध्यमातून आणि विदर्भाच्या पाणी अनुशेष याकरिता आयुष्यभर संघर्ष केला,तो जितका दैदीप्यमान होता,तितकाच त्यांचा हा गुरु-शिष्याचा ऋणानुबंधही एक आदर्श वस्तुपाठ आहे.

बी.टी.सरांचे जाणे केवळ एका लोकप्रतिनिधीची किंवा शिक्षणतज्ज्ञाची 'एक्झिट' नाही, तर ती एका मूल्याधिष्ठित कालखंडाची समाप्ती आहे.आणि काणे सरांच्या डोळ्यांतील ते अश्रू त्या संपूर्ण कालखंडाचे प्रतिनिधित्व करत होते. त्यामुळे त्यांचे जाणे एका कालखंडाची समाप्ती आहे.

व्ही एम व्ही च्या शतकपूर्ती सोहळ्यादरम्यान आयोजित माजी विद्यार्थी मेळाव्यामध्ये संस्थेच्या माजी विद्यार्थी म्हणून बी.टी. सरांना जीवनगौरव पुरस्कार काणे सरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला होता. त्याचे साक्षीदार आम्हाला होता आले.

एवढ्या मोठ्या मनाचा गुरु आणि तितकाच तत्त्वनिष्ठ शिष्य यांचे हे नाते आम्हा सर्वांना आणि शिक्षण क्षेत्रातील घटकांना जन्मभर प्रेरणा देत राहील. या 'तत्त्वांच्या विद्यापीठाला' आणि या अथांग गुरु-शिष्याच्या नात्याला कोटी कोटी प्रणाम!

**-डॉ.मंजुषा वाठ,झगडे अमरावती**

## संक्षिप्त

# संपूर्ण जिल्ह्यात योगदिन उत्साहात



### साफल्य विद्यालयात

**लेहेगाव**-साफल्य विद्यालय, सावरखेड पिंगळाई येथे सकाळी ७.३० वाजता आंतरराष्ट्रीय योगा दिनाचे आयोजन करण्यात आलेले होते. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रशांत आजनकर, विज्ञान -शिक्षक नरेंद्र सुळे, सेवानिवृत्त शारीरिक शिक्षक,एस बी खैरकर, गणित -शिक्षक श्रीराम गुंजीटे, इंग्रजी शिक्षिका कु दर्शना कातलाम. प्रयोगशाळा परिचर राजेश मालपे. शिपाई बी.ओ. ठाकूर, योगिता हिरुळकर, विद्यार्थिनी पैकी सावली म वानखडे,उन्नती काळबांड,आनंद खाते, शेखर अख्तर,सलोनी परिहार, आदित्य प्रवीण वानखडे,चतुर्भुत इत्यादी योगा दिनाच्या निमित्ताने उपस्थित होते.



### श्रीविवेकानंद कन्या विद्यालय

**लेहेगाव**-भारत सरकारच्या निर्देशनानुसार नेरपिंगळाई येथील श्री विवेकानंद कन्या विद्यालयात आंर्तरर्राष्ट्रीय योग दिवस उत्साहात मुख्याध्यापिका मंजुषा देशमुख आणि शिक्षक योगेंद्र तट्टे,प्रीती सावरकर,पल्लवी डेहनकर,विद्यार्थ्यांच्या उपस्थित साजरा झाला. याप्रसंगी मंजुषा देशमुख यांनी 'करा योगा आणि निरोगी,आनंदी सकारात्मक जीवनशैली,संतुलित जीवन जगण्याचा रामबाण इलाज योगा आहे असे मार्गदर्शन आणि योगादिनाचे महत्व त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.इयत्ता ९वी विद्यार्थिनी तनिष्का खंडारकर हिने अत्यंत प्रभावीपणे निर्धारित केलेले योगासने सामुहिक रित्या सुक्ष्म व्यायाम प्रकार ताडासन,वृक्षासन , भुजंगासन , वङ्कासन , पवनमुक्तासन प्राणायम अनुलोमविलोम ,भ्रामरी,कपालभाती यादी व्यायाम प्रकार अत्यंत प्रभावी उत्कृष्टपणे प्रात्यक्षिकरित्या विद्यार्थ्यांकिडून करवून घेतलीत. विद्यार्थीनींनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिलात.कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता शिक्षक / विद्यार्थ्यी आणि पल्लवी डेहनकर यांनी परिश्रम घेतले.विद्यार्थ्यांमिध्ये पालकांमध्ये योगाविषयी जागरुकता निर्माण व्हावी करिता निरोगी आयुष्याची हमी देणारा निरोगी जीवनशैलीचा संदेश देणारा आंर्तरर्राष्ट्रीय योगदिन अत्यंत उत्साहात साजरा झाला. समारोप मिठाई वाटून करण्यात आला.



### जि. प. शाळा खल्लार

**खल्लार**-नजिकच्या वडूरा येथिल जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. शाळेचे मुख्याध्यापक विजय मकेश्वर व तसेच सहाय्यक शिक्षिका मनिषा लोणकर यांनी योग दिवसाचे महत्त्व तसेच योग विषयी मार्गदर्शन करुन 'करा योग रहा निरोग 'चा नारा देण्यात आला.यावेळी उपस्थित असलेले विद्यार्थी व पालकांकडून योगचे प्रात्यक्षिक करून घेण्यात आले. योग कार्यक्रमाला गावातील उमेश पंडित, नामदेव चव्हाण, राजू भानगे, शिवकुमार पेढेकर, प्रतिक्षा हरणे, तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य उपस्थित होते.शेवटी वंदे मातरम् गीत गाऊन योग दिनाच्या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



### बी.डी.एस. हायस्कूल चांदूर रेल्वे

**चांदूर रेल्वे**-श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती द्वारा संचालित बापूसाहेब देशमुख शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, चांदूर रेल्वे येथे रविवारी आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक डॉ. अतुल ठाकरे उपस्थित होते. तर प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ शिक्षिका एस.बी. देशमुख तसेच कराटे कोच संदीप देशमुख उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या पुतळ्याचे पूजन व हारार्पण करण्यात आले. त्यानंतर क्रीडा शिक्षक एस. टी. तायडे यांनी उपस्थितांना योग विषयी माहिती देऊन विविध आसनांचा व प्राणायाम यांचा सराव करून घेतला. या योग दिन कार्यक्रमाला सर्व शिक्षक,शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.



### मूकबधिर विद्यालय आसेगाव

आसेगाव पूर्णा- सत्यशोधक बहुउद्देशीय शिक्षण संस्थेद्वारे संचालित निवासी मूकबधिर विद्यालयात जागतिक योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये तसेच शिक्षक-कर्मचाऱ्यांमध्ये योगाबाबत जागरूकता निर्माण करून निरोगी जीवनशैलीचा संदेश देण्याच्या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यालयाचे क्रीडा शिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली विविध योगासने व प्राणायामाची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. शाळेतील शिक्षक, शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत योगाभ्यास केला.दररोज योगाभ्यास केल्यास शारीरिक, मानसिक व बौद्धिक आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होते, असा संदेश यावेळी देण्यात आला. कार्यक्रमास विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# निरोगी व सुदृढ राहण्यासाठी योगाची आवश्यकता

## महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयामध्ये योग दिनासह संगीत दिवस




**अमरावती** -स्थानिक अस्मिता शिक्षण मंडळ द्वारा संचालित महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयांमध्ये शारीरिक शिक्षण आणि संगीत विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिवस व संगीत दिवस नुकताच झाला. याप्रसंगी योगप्रशिक्षक आणि तज्ञ मार्गदर्शक जयश्री काटोले, अमरावती आणि अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. मीनल भोंडे या उपस्थित होत्या. योग प्रशिक्षक जयश्री काटोले यांनी मानवी जीवनातील योग आणि व्यायामाचे महत्व विशद करून निरोगी आणि सुदृढ राहण्यासाठी नियमित योग करण्याचे आवाहन केले. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ मीनल भोंडे यांनी अध्यक्षीय मनोगतातून आज आंतरराष्ट्रीय स्तरावर साजरा होणारा योग दिवस जगाला समृद्ध भारतीय संस्कृतीचे महत्व पटल्याची ग्वाही देत असल्याचे विचार मांडले. प्रशिक्षक जयश्री काटोले यांनी महाविद्यालयातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांना योग प्रशिक्षण दिले त्यासाठी सादरीकरण त्यांचे सुपुत्र परतिश काटोले यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन, संचालन आणि उपस्थितांचे आभार प्रा.डॉ श्रीधर धाकुलकर यांनी मानले. प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी उत्साहात प्रशिक्षण पूर्ण केले.



# सिपना अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयांमध्ये योग दिन

**अमरावती**-सिपना अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयांमध्ये योग दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये योग शिक्षक उज्वला भोकरे व वंदना दिग्रसकर ह्यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले. सर्वप्रथम त्यांनी योगाचे प्रकार व त्यापासून होणारे फायदे याबद्दल माहिती दिली. त्यानंतर विविध योगासनाचे प्रात्यक्षिक करून दाखविले व उपस्थित सर्वांनी ती आसने करुन पाहिले.
या कार्यक्रमाचे संचालन विध्यार्थी अधिष्ठाता डॉ. प्रविण मळसने ह्यांनी केले. ह्या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना पथकाने केले. ह्या कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष जगदीश गुप्ता व प्राचार्य डॉ. संजय खेरडे ह्यांच्या देखरेखेखाली झाले. या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील रासेयो अधिकारी डॉ. योगेश गुल्हाने, प्रा. अश्विनी घाटोळ तसेच सर्व डीन, डीपीसी, विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# योग, ध्यान आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश

**अमरावती**- आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आरोग्यम् प्राकृतिक चिकित्सा व योग केंद्र,आणि जी.डी. पब्लिक स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने मंगलधाम कॉलनी, दस्तूरनगर येथील आरोग्यम् योग केंद्राच्या प्रांगणात योग, ध्यान, आरोग्य जागरूकता आणि सकारात्मक जीवनमूल्यांचा संदेश देणारा विशेष कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात झाला.

सकाळी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाच्या अध्यक्षस्थानी जी.डी. पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका शितल देशमुख होत्या. प्रमुख मार्गदर्शक म्हणून वैशाली बोरकर उपस्थित होत्या, तर कार्यक्रमाचे नियोजन व संयोजन आरोग्यम प्राकृतिक चिकित्सा व योग्य केंद्राच्या योग प्रशिक्षिका जया ठाकरे (कडू) यांनी केले.

कार्यक्रमाची सुरुवात श्री गणेश मूर्ती तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. त्यानंतर श्री गुरुदेव सेवा मंडळाचे ध्यान व भजन सादर करण्यात आले. स्वागत नृत्याने उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

प्रास्ताविकात जया ठाकरे यांनी योगाची प्राचीन भारतीय परंपरा, त्याचे जागतिक महत्त्व आणि आंतरराष्ट्रीय योग दिनाचा इतिहास यावर प्रकाश टाकला. भारताने जगाला दिलेल्या या अमूल्य ज्ञानपरंपरेचा आज १९० हून अधिक देश लाभ घेत असून निरोगी समाजनिर्मितीसाठी योगाचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी सांगितले.



मंगलधाम कॉलनीत जागतिक योग दिन

तसेच केंद्रामार्फत महिलांना नियमित योग प्रशिक्षण दिले जात असल्याची माहितीही त्यांनी दिली.वैशाली बोरकर यांनी सुजोक थेरपी आणि ओरिजिन स्माईल मुद्रा मेडिटेशन यांविषयी मार्गदर्शन करत शरीर व मन यांच्यातील संतुलन, मानसिक स्वास्थ्य आणि सकारात्मक ऊर्जेचे महत्त्व विशद केले. ध्यान, मुद्रा साधना आणि आत्मनियंत्रणाच्या माध्यमातून जीवनशैलीत सकारात्मक बदल घडवून आणता येतात, असे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय भाषणात शितल देशमुख यांनी योग ही केवळ व्यायामपद्धती नसून सर्वांगीण जीवनशैली असल्याचे सांगितले. नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक सुदृढता, मानसिक स्थैर्य आणि आध्यात्मिक समतोल साधता येतो. आधुनिक तणावपूर्ण जीवनात आनंदी, निरोगी आणि सकारात्मक राहण्यासाठी योग आवश्यक असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. यावेळी त्यांनी 'ताईची स्माईल मुद्रा'चे प्रात्यक्षिक सादर करून उपस्थितांकडून त्याचा सराव करून घेतला. कार्यक्रमाचे संचालन सौम्या पाटील आणि प्रज्ञा बागडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन जया ठाकरे यांनी केले.या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी शीला इंगळे, योगिता श्रीरामे, तन्वी श्रीरामे, मीनाक्षी पडोळे, किरण ढेवले, मंदा येते, मीनाक्षी तनमले, ज्योती खरड, राधा राठोड, वैशाली विजयकर, अरुणा धंदर, जयश्री ठाकरे, विद्या लांजेवार, पुष्पा पाटील, छाया डोंगरे, अनुराधा अव्हाडकर, ईशान कडू, अतुल ठाकरे, सारिका कोठेकर, सारिका टाले, स्नेहा जुमडे, शिल्पा देशमुख, वेदिका देशमुख, सर्वज्ञ देशमुख, आदर्श बागडे, निसर्गा देशमुख आणि स्वागता देशमुख यांनी विशेष परिश्रम घेतले. योग, ध्यान, नैसर्गिक आरोग्य संवर्धन आणि सकारात्मक जीवनशैलीचा प्रभावी संदेश देणाऱ्या या कार्यक्रमाला परिसरातील महिलांसह नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# श्री गुरुदेव सैनिकी इंग्लिश स्कूलमध्ये योगदिनानिमित्त प्राणायाम व मैदानी खेळांचे प्रशिक्षण

**नांदगाव पेठ**-आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त देवरा येथील श्री गुरुदेव सैनिकी इंग्लिश स्कूलच्या प्रांगणात उत्साहपूर्ण वातावरणात योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांसह उपस्थित मान्यवरांनी योगासन, प्राणायाम तसेच विविध मैदानी खेळांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण घेत निरोगी आरोग्याचा संदेश दिला. या कार्यक्रमाला भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष विवेक गुल्हाने, वीरेंद्र लंगडे, ऋषिकेश चांगोले, अतुल केतकर, पंकज राणे, संतोष घुले यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच योगशिक्षक योगेश पालीवाल यांनी उपस्थितांना विविध योगासनांचे महत्त्व, प्राणायामाची पद्धत आणि नियमित योगाभ्यासामुळे होणारे शारीरिक व मानसिक फायदे याबाबत मार्गदर्शन केले. योग दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी व उपस्थित पाहुण्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध योगप्रकार सादर केले. शिस्त, एकाग्रता आणि निरोगी जीवनशैलीसाठी योगाचे महत्त्व अधोरेखित करत हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला.कार्यक्रमाच्या माध्यमातून 'निरोगी शरीर आणि सकारात्मक विचारांसाठी योग हा जीवनाचा अविभाज्य भाग बनवा' असा संदेश देण्यात आला.





### मा.जिजाऊ झुंबा योगा ग्रुप

**मोर्शी** - येथील मा.जिजाऊ झुंबा योगा ग्रुप यांनी जागतिक योगा दिवस मोठ्या उत्साहाने साजरा केला.मा. जिजाऊ ग्रुप मागील तीन वर्षापासून सतत मोर्शी येथे वेगवेगळे कार्यक्रम महिलांकरिता आयोजित करीत असतो. महिलांच्या इच्छेप्रमाणे महिलांचे गेट-टुगेदर, पिकनिक, त्याचबरोबर वेगवेगळ्या जयंती तसेच स्वास्थ्यवर्धक माहिती देण्यात येते. रोज झुंबा, योगा व प्राणायाम, हे तीनही क्लास सकाळी पाच ते साडेसहा वाजता जिजाऊ पार्क मोर्शी येथे रूपाली ढोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात येतो. आजचा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता रूपाली ढोंगे,ॲड. मंजूशा खांडेक,सविता गुंजाळ, मेघा जाणे, अंजली सोनलकर, गीता शर्मा, नूतन जवंजाळ, हिरेक, मीना केमेक, दिपाली ठाकरे, संध्या वानरे, कांचन वठोके, संगीता चव्हाण, सोनाली यावले, ज्योती ढोंगे, प्रतिभा काळ, संध्या वानखडे,काजल सोलव व इतर बऱ्याच जणांनी सहकार्य केले.

# नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक आरोग्य सुधारते

**अंजनगाव बारी**- जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अंजनगाव बारी येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात शाळेचे मुख्याध्यापक गजेंद्र अवघड यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. योगशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली ताडासन, भ्रामरी, सूर्यनमस्कार यांसह विविध योगासने व प्राणायाम करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक गजेंद्र अवघड यांनी योगाचे महत्त्व विशद करताना नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक आरोग्य सुधारते, मन शांत राहते तसेच तणावमुक्त जीवन जगण्यास मदत होते, असे सांगितले.योग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रम उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांमध्ये व कर्मचाऱ्यांमध्ये योगाबाबत जनजागृती निर्माण करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.





### श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळामध्ये जागतिक योगदिन

**अमरावती** - श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळामध्ये जागतिक योग मोठया उत्साहात पार पडला. मंडळाच्या सर्व शाळा, महाविद्यालयाच्या विभाग प्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी आणि मोठ्यासंख्येने नागरिक या जागतिक योग मध्ये सहभागी झाले होते.

# योगदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवा- सुरेश मुंधडा

**कुऱ्हा** - श्रीराम शिक्षण संस्था, धामणगाव रेल्वे द्वारा संचालित कला व विज्ञान महाविद्यालय, कुऱ्हा येथे आंतरराष्ट्रीय योग दिन निमित्त व्याख्यान व योग प्रात्यक्षिक कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात झाला. विद्यार्थ्यांमध्ये योगाविषयी जागरूकता निर्माण करणे तसेच निरोगी जीवनशैलीचा संदेश देणे हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.






कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय अभ्यंकर उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. तेजस हरमकर (ब्रिजलाल बियाणी महाविद्यालय, अमरावती) यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी योगाचे शारीरिक, मानसिक व बौद्धिक

आरोग्यासाठी असलेले महत्त्व विशद करताना नियमित योगाभ्यासामुळे ताणतणाव कमी होऊन जीवन अधिक संतुलित व आनंदी बनते, असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमास श्रीराम शिक्षण संस्थेचे संचालक सुरेश मुंधडा यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी विद्यार्थ्यांना योग हा केवळ एक दिवस साजरा करण्याचा उपक्रम नसून तो दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनविण्याचे आवाहन केले. यानंतर योग प्रात्यक्षिक सत्रात विविध योगासने, प्राणायाम तसेच ध्यान यांचे मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून योगाभ्यास केला.कार्यक्रमामुळे उपस्थितांमध्ये आरोग्यदायी जीवनशैलीबाबत सकारात्मक जागरूकता निर्माण झाली.कार्यक्रमाचे आयोजन डॉ. उमेश राठी (शारीरिक शिक्षण संचालक) व डॉ. निशा जोशी (रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी) यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच परिसरातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. उपस्थितांनी योग दिनाच्या उपक्रमाचे कौतुक करत भविष्यातही अशा आरोग्यवर्धक कार्यक्रमांचे आयोजन करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालयात योग दिन

# योग-आरोग्याची गुरुकिल्ली- प्राचार्य डॉ.अनिल खांडेकर



**परतवाडा**- स्थानिक भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालयात जागतिक योग दिन प्राचार्य डॉ.अनिल खांडेकर यांच्या मार्गदर्शनात उत्साहपूर्ण वातावरण साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाचे अध्यक्षीयस्थान अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.अंकुश तुरखडे तसेच प्रमुख वक्ते म्हणून योगशास्त्र विभाग प्रमुख प्रा. दीपक जयस्वाल यांनी भूषविले. प्रमुख वक्ते प्रा.दीपक जयस्वाल यांनी यावेळी मार्गदर्शन करतांना सांगितले की दररोज योगाभ्यास केल्यास शारिरीक, मानसिक व बौद्धिक आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होते.
प्रा. डॉ.अंकुश तुरखडे यांनी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना योग करा, तंदुरुस्त रहा असा विचार व्यक्त केला.या प्रसंगी योग प्रात्यक्षिके सादर करण्यात आली तसेच प्राणायामाचा अभ्यास करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख प्रा.डॉ.सतिश भागवत यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवच

अकोला
जिल्हा विशेष

# शिवसेनेचा भव्य शेतकरी आक्रोश मोर्चा

## सरकारची तिरडी काढून तीव्र निषेध



■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने शेतकरी कर्जमुक्ती व हक्काचा पीकविमा या प्रमुख मागण्यांसाठी आज तेल्हारा येथे भव्य शेतकरी आक्रोश मोर्चा काढण्यात आला. पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशाने तसेच आमदार नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली हा मोर्चा पार पडला.

जिल्हाप्रमुख गोपाल दातकर, उपजिल्हाप्रमुख मुकेश मुरूमकर, दिलीप बोचे यांच्यासह शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तालुका प्रमुख सौरभ वाघोडे यांच्या नेतृत्वात शेकडो शेतकरी व शिवसैनिकांनी मोर्चामध्ये सहभाग घेतला.

टॉवर चौक येथून मोर्चाला सुरुवात झाली. तुकाराम चौक येथे सरकारच्या निष्क्रिय धोरणांचा निषेध म्हणून प्रतीकात्मक सरकारची तिरडी काढण्यात आली व कर्जमाफीच्या शासन निर्णयाचे दहन करण्यात आले.त्यानंतर तहसील कार्यालयावर मोर्चा धडकला. यावेळी शेतकरी कर्जमाफी, थकीत पीकविमा, शेतीमालाला हमीभाव, बी-बियाणे व खतांचा काळाबाजार रोखणे यांसह विविध मागण्यांचे निवेदन तहसीलदारांना देण्यात आले.

यावेळी उपस्थितांनी सरकारविरोधी जोरदार घोषणाबाजी करत शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तात्काळ निर्णय घेण्याची मागणी केली.

गेल्या काही वर्षांतील अतिवृष्टी, दुष्काळ, गारपीट, अवकाळी पाऊस यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून शासनाने त्वरित मदत करावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. पुरुषोत्तम गावंडे, बाळासाहेब निमकर्डे, गणेश काळे,पप्पुशेठ सोनटक्के, अजय गावंडे,किरण अवताडे, शहाबुद्दीन जमदार, शरद खेडकर,गजानन मोरखडे, आझाद खा, अमित घोडेस्वार, शेख सलीम, रहेमान शाह, वनिता वाकोडे, ओम असमोल, आदित्य उमाळे, उद्धव पाथ्रीकर, जावेद मेंबर, अनिकेत वाघोडे, शेख रईस, सलमान बेग, इरफान भाई,सुमित भागवत, शोहेब खा, दिलावर खा, मो. मुंसिफ, अशरफ जमदार, सुयश वाघोडे, जय बोर्डे,शेख वकील, अब्दुल आहेजाज, विजय शेंडे, एजाज बेग,बंटी राऊत, अरुण पाथ्रीकर सादिक खा, अब्दुल अशपाक, कार्तिक बनेतकर, इम्रान हुसेन, अनंत बोर्डेशरीख अहमद, अशोक रेवस्कर असे असंख्य शेतकरी, शिवसैनिक, महिला व युवक या मोर्च्यात सहभागी झाले होते.

# संत गजानन महाराज पालखी आगमनाची जय्यत तयारी



■ प्रतिनिधी | अकोला ■

श्री संत गजानन महाराजांच्या पालखीचे २३ जून रोजी अकोला शहरात आगमन होणार असल्याने भाविकांच्या सोयीसाठी आणि पालखी सोहळा सुरळीत पार पडावा यासाठी अकोला महानगरपालिकेने तयारीला वेग दिला आहे. महापौर तथा शहराच्या प्रथम नागरिक सौ. शारदा रणजित खेडकर यांनी संबंधित विभागांचा आढावा घेत आवश्यक सुविधा वेळेत उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले.

पालखी आगमनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित आढावा बैठकीत महापौरांनी पालखी मार्गावरील स्वच्छता, रस्त्यांची स्थिती, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, प्रकाशयोजना तसेच भाविकांसाठी आवश्यक मूलभूत सुविधांचा सविस्तर आढावा घेतला. विशेषतः पालखी रात्रीच्या मुक्कामासाठी थांबणाऱ्या ठिकाणी मोबाईल शौचालये, पिण्याचे पाणी आणि इतर सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला.



**महापौरांकडून मनपा यंत्रणेला उपाययोजना करण्याच्या सूचना**

भाविकांची मोठी गर्दी लक्षात घेता कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश महापौरांनी दिले. पालखी आगमनापूर्वी सर्व व्यवस्था पूर्ण करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले असून मनपा प्रशासनाने तयारी अंतिम टप्प्यात आणली आहे. दरम्यान, संत गजानन महाराजांच्या पालखीचे शहरात आगमन होत असल्याने भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून पालखी मार्गावर विविध ठिकाणी स्वागताची तयारी सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे. प्रशासन आणि महानगरपालिका यंत्रणा पालखी सोहळा सुरक्षित, शिस्तबद्ध आणि भक्तिमय वातावरणात पार पाडण्यासाठी सज्ज झाल्याचे या आढावा बैठकीतून स्पष्ट झाले.

# अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी मूर्तीजापुरात शेतकऱ्यांचा 'अन्नत्याग' आंदोलनाचा निर्धार



■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

राज्य विधिमंडळाचे अधिवेशन सुरू होत असतानाच शेतकरी प्रश्नांवर पुन्हा एकदा संघर्षाची भूमिका घेण्यात आली आहे. पीकविमा, कर्जमाफी, प्रोत्साहनपर अनुदान आणि खतांच्या उपलब्धतेसंदर्भातील विविध मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मूर्तीजापूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी 'अन्नत्याग जनआंदोलन' करण्याचा निर्णय घेतला आहे.

शेतकरी प्रतिनिधींच्या बैठकीत शासनाने हेक्टरी १७,५०० रुपये पीकविमा देण्याबाबत केलेल्या आश्वासनाची पूर्तता अद्याप झालेली नसल्याची बाब उपस्थित करण्यात आली. या आश्वासनाची आठवण करून देण्यासाठी आंदोलन उभारण्यात येणार असल्याचे बैठकीत ठरविण्यात आले.

२०२५-२६ च्या पीकविमा योजनेतील 'तीन ट्रिगर'ची अट वगळून केवळ उपग्रहाधारित पाहणीवर आधारित निकष लागू करण्यात आल्याने अनेक शेतकरी विमा लाभापासून वंचित राहिल्याचा आरोप करण्यात आला. तालुक्यातील सहा महसूल मंडळांतील शेतकऱ्यांना याचा फटका बसल्याचे सांगण्यात आले. काही शेतकऱ्यांना अत्यल्प विमा रक्कम मिळाल्याने या धोरणाविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याची तयारी सुरू असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

सरसकट कर्जमाफी, शेतकऱ्यांचे सातबारा कोरे करून नव्याने पीककर्ज उपलब्ध करून देणे, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या खात्यात ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान तातडीने जमा करणे तसेच खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर युरिया व डीएपी खतांचा पुरेसा आणि विनाअट पुरवठा करणे, या प्रमुख मागण्याही बैठकीत मांडण्यात आल्या. 'हा लढा केवळ काही व्यक्तींचा नसून संपूर्ण शेतकरी समाजाच्या अस्तित्वाशी संबंधित आहे. त्यामुळे सर्व शेतकरी बांधवांनी आंदोलनात सहभागी व्हावे,' असे आवाहन उपस्थितांनी केले. या बैठकीस प्रगती शेतकरी मंडळाचे अध्यक्ष राजूभाऊ वानखडे, जनमंचचे अध्यक्ष प्रा. सुधाकर गौळखेडे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कैलास साबळे, मुना नाईक नवरे, अरुण बोंडे, श्रीकृष्णभाऊ गुल्हाने, अजबराव वहिले, नंदकिशोर भवानीया, प्रफुल मालदुरे, अनंत शेटे, प्रवीण किरकर, दिगंबर टाले, सुभाष मोरे, प्रकाश राठोड, रमेश गोपकर, दिगंबर बंगाले, किशोर गावंडे, योगेश सोळंके, प्रमोद खेडकर, मिलिंद वानखडे, अरुण गावंडे, श्रीकांत टापरे, सुरेशराव तिवारे, गजानन महल्ले, अनिल देवगीकर, प्रमोद राजुंदेकर, डॉ. वडुळकर, कृष्णा नसले, विलास गाडेकर, अनिल गावंडे पाटील, उमेश वळणकर, किशोर मुगल, मंगलसिंग मुगुना, प्रमोद सपकाळ, पुरुषोत्तम सरदार, प्रवीण चौरे, वैभव वानखडे, संजय खरबडकर, प्रभाकर सोनेकर यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. अधिवेशनाच्या प्रारंभीच शेतकरी प्रश्नांवर दबाव वाढविण्याच्या उद्देशाने हाती घेण्यात आलेल्या या आंदोलनाकडे कृषी क्षेत्रासह राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## आज माहेश्वरी समाजाची भव्य शोभायात्रा

**अकोला :** सकल माहेश्वरी समाजाचा वंशोत्पती दिवस म्हणून आज दि २३ जून हा दिन माहेश्वरी समाज महेश नवमीच्या रूपाने साजरा करीत आहे.त्या अनुषंगाने स्थानीयमाहेश्वरी भवन येथे आयोजित भव्य महेश नवमी उत्सव साजरा करण्यात येत आहे.या उत्सवात प्रमुख पाहुणे म्हणून जालना येथील ख्यातनाम उद्योगपती व जेंष्ठ समाजसेवी द्वारकाप्रसाद सोनी यांची उपस्थिती लाभणार आहे.

# अत्याचार प्रतिबंधक कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करा

## पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांचे निर्देश

■ प्रतिनिधी | अकोला ■

नागरी हक्क संरक्षण कायदा तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याची तंतोतंत अंमलबजावणी करून पीडितांना तातडीने न्याय मिळवून देण्यासाठी पोलिसांनी संवेदनशीलतेने व जबाबदारीने काम करावे, असे निर्देश पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी दिले.

नागरी हक्क संरक्षण पथक, अकोला यांच्या वतीने सोमवारी (दि. २२) डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या कमिटी हॉलमध्ये आयोजित एकदिवसीय पोलीस कार्यशाळेत ते बोलत होते. नागरी हक्क संरक्षण कायदा व ॲट्रॉसिटी ॲक्टच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी निखिल पाटील, गजानन



पडघन, वैशाली मुळे, सुदर्शन पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांच्यासह विविध पोलीस ठाण्यांतील अधिकारी, अंमलदार, वाचक फौजदार, लेखनिक व मदतनीस उपस्थित होते. जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांमधून मोठ्या संख्येने कर्मचाऱ्यांनी कार्यशाळेत सहभाग नोंदविला. कार्यशाळेत मार्गदर्शक म्हणून नागरी हक्क संरक्षण, अमरावती परिक्षेत्राच्या पोलीस अधीक्षक अनिता पाटील, समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त मारोती वाठ, बार्टीचे जिल्हा प्रकल्प अधिकारी विजय बेदरकर, सरकारी अभियोक्ता ॲड. राजेश अकोटकर व ॲड. देवानंद गवई यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी नागरी हक्क संरक्षण कायदा व अत्याचार प्रतिबंधक कायद्यातील महत्त्वाच्या तरतुदी, गुन्ह्यांच्या तपासाची प्रक्रिया, न्यायालयीन बाबी तसेच पीडितांच्या पुनर्वसनासंदर्भातील विविध मुद्द्यांवर सविस्तर माहिती दिली. नागरी हक्क संरक्षण, अकोला घटक प्रमुख पोलीस निरीक्षक शुभांगी कोरडे यांनी प्रास्ताविकातून कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पोलिसांची भूमिका स्पष्ट केली. कार्यशाळेच्या शेवटी आभार प्रदर्शन करण्यात आले.

**कायद्याचे ज्ञान वाढविण्यावर भर**

नागरी हक्क संरक्षण व अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत नोंद होणाऱ्या गुन्ह्यांचा तपास अधिक परिणामकारक व दोषारोपपत्रांची गुणवत्ता वाढावी, यासाठी या कार्यशाळेत विशेष मार्गदर्शन करण्यात आले. पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी कायदेशीर प्रक्रियेचे काटेकोर पालन करण्यावर वक्त्यांनी भर दिला.

**Change In Name**

I Have Changed My Name From MERAJ BANO SHEKH RAJJAK -TO- MERAJBI SHEKH IRFAN My Residential Address in:- AT POST, RAIL, TQ. AKOT, Rel, Akola 444111

**Change In Name**

I have Change My Name Form KAIF KHAN MOHIB UR REHMAN KHAN -TO- KAIF KHAN MOHIBUR REHMAN KHAN My residential Address in Gorakshan road, Adarsh colony Akola 444001.

**Change In Name**

I have Change My Name Form RANI NAUSHABA PARVIN -TO- RANI NAUSHABA PARVEEN MOHIBUR REHMAN KHAN My residential Address in Gorakshan road, Adarsh colony Akola 444001.

**Change In Name**

I Have Changed My Name From KRISHNA VARMA -TO- KRISHNA SUNIL VARMA Passport No :- Z3791011 My Residential Address in:- Jagannath Villa, 1st Galli, Behind Jain Lawn, Tapadiya Nagar Akola 444005

**Change In Name**

I Have Changed My Name From SUNILKUMAR JAGANNATH VARMA -TO- SUNIL JAGANNATH VARMA Passport No :- Z3791011 My Residential Address in:- Jagannath Villa, 1st Galli, Behind Jain Lawn, Tapadiya Nagar Akola 444005

# डायल ११२च्या तत्परतेने हरविलेली पत्नी व चिमुकली मुलगी सुखरूप सापडली



■ प्रतिनिधी | अकोट ■

डायल ११२वर प्राप्त झालेल्या एका कॉलची तात्काळ दखल घेत अकोट शहर पोलिसांनी हरविलेल्या महिलेसह दोन वर्षांच्या चिमुकलीचा काही वेळातच शोध घेऊन त्यांना सुखरूप कुटुंबीयांच्या स्वाधीन केले. पोलिसांच्या तत्परतेमुळे एका कुटुंबाला दिलासा मिळाला आहे.

दि. २० जून रोजी सायंकाळी सुमारे ५.५१ वाजता अनिल परशराम जावरकर (वय २९, रा. धारणी, जि. अमरावती) यांनी डायल ११२वर संपर्क साधून पत्नी शर्मिला जावरकर (वय २५) व दोन वर्षांची मुलगी पायल या अकोट बसस्थानक परिसरातून हरवल्याची माहिती दिली. कॉल प्राप्त होताच डायल ११२ कर्तव्यावरील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक हिंमत दंदी व पोलीस कॉन्स्टेबल स्वप्निल आढे यांनी तातडीने वरिष्ठांना माहिती दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे व डायल ११२चे प्रभारी पोलीस उपनिरीक्षक अविनाश मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली शोधमोहीम सुरू करण्यात आली. पोलिसांनी अनिल जावरकर यांच्याकडून सविस्तर माहिती घेत बसस्थानक परिसर, रेल्वे स्टेशन परिसर, सिंधी कॅम्प तसेच हिवरखेड रोड परिसरात शोध सुरू केला. अथक शोधादरम्यान रेल्वे स्टेशन परिसरात शर्मिला जावरकर व चिमुकली पायल आढळून आल्या. पोलिसांनी त्यांना सुरक्षित ताब्यात घेत अनिल जावरकर यांच्या स्वाधीन केले. आई व मुलीचा वेळेत शोध लागल्याने कुटुंबीयांनी पोलिसांचे आभार मानत समाधान व्यक्त केले. डायल ११२ ही आपत्कालीन सेवा नागरिकांसाठी किती उपयुक्त आणि महत्त्वाची आहे, याची पुन्हा एकदा प्रचिती या घटनेतून आली. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, सहायक पोलीस अधीक्षक निखील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे, पोलीस उपनिरीक्षक अविनाश मोहिते, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक हिंमत दंदी आणि पोलीस कॉन्स्टेबल स्वप्निल आढे यांनी केली.

## जाहीर सूचना

माझे पक्षकार यांनी दिलेल्या महिती वरून सर्व नागरिकांना तसेच वित्तीय संस्था व बँक यांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते कि, माझे पक्षकार श्री. मोहनराव सुधाकरराव रोकडे, रा. हातगाव, ता. आणि जि. अकोला यांच्या मालकी व ताब्यातील मालमत्ता मौजा/कसबे हातगाव, ता. आणि जि. अकोला येथील सर्वे नं. १४७, अकृषक लेआऊट प्लॉट ज्यास नगर भू. क्र. ३/११, नझुल शिट नं. २३, नझुल प्लॉट नं. ३/११, एकूण क्षेत्रफळ १७२.५० चौ.मी., मालमत्ता क्र. १४६५ हा प्लॉट त्यांनी र.द.क्र. ६१; दि. १३/०१/२०२० ने खरेदीकेली असून सदर मालमत्तेची जुने मूळ नोंदणीकृत खरेदीखात ज्याचे र.द.क्र. १४९२; दि. २६/०५/२०१०, र.द.क्र. ६७६; दि. ०७/०३/२०१२ आणि र.द.क्र. ३४६९, दि. १६/१२/२०१३ हि गहाळ झाली आहेत, जर कोणलाही ती मिळाल्यास खाली संपर्क साधावा. तसेच माझे पक्षकार सदर मालमत्तेवर Cholamandalam Investment and Finance Ltd. कडून कर्ज घेत असून त्याकरिता वरील नमूद मालमत्ता गहाण देत आहेत.

तरी जाहीर नोटीस द्वारे, आपणास कळविण्यात येते कि, सदर मालमत्तेवर कोणाचाही कुठल्याही प्रकारचा हिस्सा, अधिकार किंवा गहाण, दान, बक्षीस, तोंडी करार केला असल्यास, तथा ताबा असल्यास, किंव्हा कुठलाही दिवाणी अथवा फौजदारी दावा प्रलंबित व निकाली असल्यास, संबंधित व्यक्तीने नोटीस वृत्तपत्रात जाहीर झाला तारखे पासून ७ दिवसांच्या आत संपर्क साधावा; तसे न केल्यास सदर मालमत्तेवर कोणाचाही कुठल्याही प्रकारे काहीहि ऐक हक्क, अधिकार, हित-संबंध आणि आक्षेप नसल्याचे समजले जाईल. तसेच भविष्यात सदर गहाळ दस्त विचारात घेऊन कुठलाही व्यवहार जसेकी खरेदी, गहाण, दान, बक्षीस, तोंडी करार केलेले आढळल्यास त्यास सर्वस्वी लिहून घेणार/देणार जबाबदार राहील.

अकोला
दिनकः- २२/०६/२०२६

**ॲड. गौरव शि. देशमुख**
आळशी प्लॉट, गजानन महाराज फोटो जवळ,
दक्षता नगर चौक, ता. जि. अकोला.
मो. नं. ९०२८२३२२४६

## गट ग्रामपंचायत कार्यालय दिवठाणा (वाई)

**पंचायत समिती आकोट जि. अकोला**

**वाचा :** १) भारतातील मालविक्री अधिनियम १९३० कलम ६४
२) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ कलम ५५

**जाहीर लिलाव सुचना**

जनतेला याद्वारे कळविण्यता येते की, गट ग्रामपंचायत कार्यालय दिवठाणा (वाई) ता. आकोट जि. अकोला यांचा मालकी हक्कातील करमणूक केंद्र साहित्याचा लिलाव दि. २५/०६/२०२६ रोजी ठिक ११ वाजता मौजे वाई येथे जूनी करमणूक केंद्राजवळ करण्यात येणार आहे.

**'जसे आहे जेथे आहे' आणि ' असे आहे तसे आहे' या तत्वानुसार करण्यात येणार आहे.**

| अ.क्र. | तपशिल | शासकीय किंमत | अनामत रक्कम | वस्तुच्या निरक्षणाचा दिनांक व वेळ | लिलाव तारिख व वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | करमणूक केंद्र इग्लिश, कवेलू, बतवा, विटा फरशा व इतर साहित्य | ८३४० | ५०० | २३/६/२०२६ मौजे वाई करमणूक केंद्राजवळ | दि. २४/६/२०२६ रोजी सकाळी ११ वाजता |

**लिलावच्या अटी व शर्ती ग्रामपंचायत नोटीस बोर्डावर लावण्यात आले आहे.**

**सरपंच**

**ग्राम पंचायत अधिकारी**
गट ग्रामपंचायत, दिवठाणा
अकोट जि. अकोला

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १९६**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

## जाहीर नोटीस

**दिवाणी न्यायालय क. स्तर बाळापूर**
**दयानंद मारूती वाघमारे यांचे न्यायालयात**
**सह दिवाणी न्यायाधिश क स्तर बाळापुर बालापुर, अकोला.**

दिवाणी किरकोळ अर्ज/६२/२०२६
सुधाकर मोतीराम डंडे वि. कोणीही नाही
पुढिल तारिख : २२-०४-२०२६

**अर्जदार :** १. सुधाकर मोतीराम हंडे वय अं ७४वर्ष धंदा शेती २. ज्योती संजय घाटोळ वय अं४६ वर्ष धंदा घरकाम ३. दिपक सुधाकर हंडे वय अं४३वर्ष धंदा शेती सर्व रा. वाडेगांव ता. बाळापूर जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII १८२७ अंतर्गत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. मयत रुखमिना सुधाकर हंडे या दिनांक ०५.१२.२०२५ रोजी मौजे वाडेगांव ता.बाळापूर जि. अकोला येथे मरण पावल्या. वरील नमूद अर्जदार यांना मयत रुखमिना सुधाकर हंडे यांचे एकमेव वारस असल्यामुळे त्यांना शासकीय, निमशासकीय व ईतर लाभाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक २२.०४.२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक २४.०२.२०२६ रोजी माझे सहीने व कोटांच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का

**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय, क स्तर, बाळापुर

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७७३/२०२६ — प्रोसेस नं.७३७०/२०२६
चौ.ता. २७/०७/२०२६ — दिनांक : ०९/०६/२०२६

**अर्जदार :** १. सगुणाबाई प्रल्हाद उबाळे रा. सुनिल काळे यांचे घरा समोर, मलकापुर, अकोला. ता. जि. अकोला. २. दिपाली विलास उबाळे ३. विराज विलास उबाळे तर्फ अ. पा. क. आई दिपाली विलास उबाळे अर्जदार क. २ व ३ रा. माउली कृपा बिल्डिंग, धायरी फाटा जवळ, वडगाव बु, पुणे शहर, पुणे.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : विलास प्रल्हाद उबाळे
**पत्ता :-** रा. सुनिल काळे यांचे घरा समोर, मलकापुर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत विलास प्रल्हाद उबाळे यांचे दि. २५/०१/२०२६ रोजी भारती हॉस्पीटल, धनकवाडी, पुणे येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २७/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ८७३/२०२६ — प्रोसेस नं. ७६५६/२०२६
चौ.ता. २९/०७/२०२६ — दिनांक : १७/०६/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती अरुणादेवी मधुसुदनजी कागलीवाल रा. मदन महलच्या मागे, राधे नगर, अकोला. ता. जि. अकोला. २. ज्योती अशोक अग्रवाल रा. भाटीया वाडी जवळ, न्यु राधाकिसन प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला. ३. जयश्री महेंद्रकुमार अग्रवाल रा. ए२ए १०२, एलआयसी स्टाफ क्वार्टर, कांदरपाडा, दहिसर वेस्ट, मुंबई ४. राजश्री अतुल सिंघानिया रा. लक्ष्मी विला, एमएसइबी ऑफिस जवळ, रतनलाल प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला. ५. पंकज मधुसूदन कागलीवाल रा. मदन महल मागे, राधे नगर, अकोला, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : मधुसूदन रामेश्वर कागलीवाल
**पत्ता :-** रा. मदन महलच्या मागे, राधे नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मधुसूदन रामेश्वर कागलीवाल यांचे दि. ०९/०१/२०२६ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २९/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## संक्षिप्त

### दुचाकीच्या धडकेत वडील-मुलगी जखमी

**आर्वी -** मांडला फाट्याजवळ झालेल्या दुचाकी अपघातात वडील आणि मुलगी गंभीर जखमी झाल्याची घटना समोर आली आहे. मोरेश्वर मसराम (५३) हे मुलगी शिवानी मसराम हिला घेऊन दुचाकीने गावाकडे जात होते. दरम्यान, मागून भरधाव वेगाने आलेल्या एका दुचाकीस्वाराने त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी होती की दोघेही रस्त्यावर फेकले गेले व त्यांना गंभीर दुखापत झाली. स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदत करून जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. अपघातानंतर परिसरात काही काळ वाहतुकीची कोंडी निर्माण झाली होती. निष्काळजीपणे वाहन चालविल्यामुळे हा अपघात घडल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. याप्रकरणी आर्वी पोलिसांनी तक्रारीवरून गुन्हा नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

### बसस्थानकातून वाहकाची बॅग लांबविली

**तळेगाव (शा.पंत) -** तळेगाव बसस्थानकात अज्ञात चोरट्याने एसटी वाहकाची कागदपत्रे व रोकड असलेली बॅग लंपास केल्याची घटना घडली. वाहक आशिक बानक (३८) व चालक राजेंद्र भेंडारकर हे बसने मोझरी-तिवसा मार्गे तळेगाव येथे पोहोचले होते. प्रवाशांची ये-जा सुरू असताना वाहकाने आपली बॅग बसच्या कॅरीयरमध्ये ठेवली होती. काही वेळाने बॅग तपासली असता ती जागेवरून गायब झाल्याचे आढळले. बॅगमध्ये आधार कार्ड, वाहक ओळखपत्र, बँक पासबुक तसेच साडेपाच हजार रुपयांची रोकड होती. घटनेमुळे बसस्थानक परिसरात खळबळ उडाली. सीसीटीव्हीच्या आधारे संशयिताचा शोध घेण्याचे काम सुरू असून तक्रारीवरून तळेगाव पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध चोरीचा गुन्हा नोंद करून तपास सुरू केला आहे.

### ट्रॅव्हल्सच्या धडकेत १२ वर्षीय मुलगा जखमी

**तळेगाव (शा. पंत) -** वर्धमनेरी येथे भरधाव ट्रॅव्हल्स आणि दुचाकीच्या अपघातात १२ वर्षीय मुलगा गंभीर जखमी झाला. रुद्राक्ष पचारे हा आपल्या मावस भावासोबत दुचाकीने प्रवास करत होता. वर्धमनेरी येथून जळगावकडे जाण्यासाठी रस्ता ओलांडत असताना आर्वीकडून वेगाने येणाऱ्या ट्रॅव्हल्सने दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेमुळे रुद्राक्ष रस्त्यावर फेकला जाऊन गंभीर जखमी झाला. स्थानिकांनी तातडीने त्याला उपचारासाठी रुग्णालयात हलविले. अपघातानंतर परिसरात नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. निष्काळजी वाहनचालकामुळे अपघात झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. याप्रकरणी संबंधित वाहनचालकाविरुद्ध पोलिसांनी गुन्हा नोंद केला असून अपघाताच्या कारणांचा तपास सुरू आहे.

### अवैध वाहतुकीतून पाच जनावरांची सुटका

**आर्वी -** कत्तलखान्याकडे नेण्यात येणाऱ्या पाच जनावरांची पोलिसांनी सुटका करत वाहनासह साडेसहा लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. जनावरांची अवैध वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार आर्वी-हरदोली मार्गावर सापळा रचून मालवाहू वाहनाची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान वाहनात पाच जनावरे कोंबून नेण्यात येत असल्याचे आढळून आले. चालकाकडे जनावरे वाहतुकीसाठी आवश्यक परवाना किंवा कागदपत्रे नसल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी तातडीने कारवाई करून जनावरांची सुटका केली आणि वाहन जप्त केले. या प्रकरणी राजू इंगळे, स्वप्नील कांबळे आणि शेख फिरोज शेख इमाम यांच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### आजारपणाला कंटाळून वृद्धेची आत्महत्या

**खरांगणा -** दीर्घकाळाच्या आजारपणाला कंटाळून एका वृद्ध महिलेने विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना तरोडा येथे घडली. जिजा कोटजावरे (६५) असे मृत महिलेचे नाव आहे. त्या काही दिवसांपासून आजारी असल्याने मानसिक तणावात होत्या, अशी माहिती पोलिसांनी दिली. घरातून बाहेर गेल्यानंतर त्या परत न आल्याने नातेवाईकांनी शोधाशोध सुरू केली. दरम्यान, गावाजवळील विहिरीत त्यांचा मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला आहे. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त होत असून तक्रारीवरून खरांगणा पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

### छप्पर उडाले, आशेचा किरणही हरपला

# रियाजच्या मदतीने विधवा भगिनीच्या घरावर पुन्हा उभी राहिली 'छत्रछाया'

### जनमाध्यमच्या वृत्ताची दखल; दहा हजारांची मदत, टिनपत्र्यांमुळे पावसाळ्यापूर्वी मिळाला दिलासा

**जामणी/जनमाध्यम**

वादळी वाऱ्याच्या तडाख्यात घरावरील संपूर्ण छत उडून गेल्याने नैराश्याच्या गर्तेत सापडलेल्या जामणी येथील विधवा माया रामाजी श्रीनाथ यांच्या कुटुंबाला अखेर मदतीचा हात मिळाला आहे. १७ जून रोजी जनमाध्यममध्ये प्रसिद्ध झालेल्या वृत्ताची दखल घेत ठाणे येथील समाजसेवक रियाज अली सय्यद यांनी पुढाकार घेत या कुटुंबासाठी टिनपत्र्यांची व्यवस्था करून दिली.

वादळामुळे घराचे छत उडाल्याने माया श्रीनाथ या आपल्या तीन मुली व वृद्ध सासूसह अत्यंत कठीण परिस्थितीत जीवन जगत होत्या. ऐन पावसाळा तोंडावर असताना निवाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला होता. या परिस्थितीवर प्रकाश टाकणारे वृत्त जनमाध्यमचे प्रतिनिधी दिलीप पिंपळे यांनी प्रकाशित केले. बातमी सोशल मीडियावर व्हायरल होताच रियाज अली सय्यद यांनी तत्काळ संपर्क साधून मदतीची तयारी दर्शविली.



रियाज यांनी दिलीप पिंपळे यांच्या खात्यावर दहा हजार रुपये पाठवून तातडीने टिनपत्रे खरेदी करण्याची विनंती केली. त्यानुसार टिनपत्रे खरेदी करण्यात आली असून लवकरच माया श्रीनाथ यांच्या घरावर नव्या छताचे काम पूर्ण होणार आहे. त्यामुळे पावसाळ्यापूर्वी या कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे.

संकटाच्या काळात मदतीचा हात पुढे करणाऱ्या रियाज अली सय्यद यांच्याबद्दल ग्रामस्थांमधून कौतुक व्यक्त होत आहे. तसेच जनमाध्यमने वृत्त प्रकाशित करून मदतीचा सेतू उभारल्याबद्दल माया श्रीनाथ व त्यांच्या कुटुंबीयांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे.अडचणीत असलेल्या माणसाला दिलासा देणे हाच खरा धर्म आहे, असा संदेश या मदतीतून पुन्हा अधोरेखित झाला आहे.

## राष्ट्रीय नृत्य स्पर्धेत यश

### सान्वी वंजारेचा नवोदय विद्यालयात गौरव

**वर्धा/जनमाध्यम**



राष्ट्रीय नृत्य स्पर्धेत निमशास्त्रीय गटात तृतीय क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या पी.एम. श्री. जवाहर नवोदय विद्यालय, सेलू (काटे) येथील इयत्ता सातवी 'अ'ची विद्यार्थीनी सान्वी किरण पंकज वंजारे हिचा विद्यालयात विशेष सत्कार करण्यात आला.

विद्यालयाचे प्राचार्य शैलेश नागदेवते, उपप्राचार्य प्रिया गजभिये तसेच रंजना वानखेडे यांच्या हस्ते सान्वीचा सन्मान करण्यात आला. यावेळी प्राचार्य नागदेवते यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, नवोदय विद्यालय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच सांस्कृतिक आणि कलागुणांच्या विकासासाठीही विविध संधी उपलब्ध करून देते. या संधींचा लाभ घेत विद्यार्थ्यांनी सर्वांगीण विकास साधत उत्तम नागरिक म्हणून घडावे, असे आवाहन त्यांनी केले.

राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत मिळविलेल्या यशाबद्दल विद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी सान्वीचे अभिनंदन केले. तिच्या या यशामुळे विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. सान्वीने आपल्या यशाचे श्रेय नृत्य शिक्षक सचिन डंभारे आणि पूजा पोद्दार यांना दिले.सान्वीच्या या यशामुळे विद्यालयात आनंदाचे वातावरण असून तिच्यावर सर्व स्तरांतून कौतुकाचा वर्षाव होत आहे. तिच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

## योगातून निरोगी जीवनाचा संदेश

**आर्वी/जनमाध्यम**



आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आर्वी येथे योगाभ्यास व जनजागृती कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमात महिला, नागरिक आणि योगप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून योगाबद्दलची जागरूकता व्यक्त केली.

यावेळी योग क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अर्चना शिरभाते आणि छाया राजूरकर यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यांच्या योगसेवेचा व समाजहितासाठी केलेल्या योगदानाचा उपस्थितांनी गौरव केला.कार्यक्रमादरम्यान दामले यांनी योगाचे आरोग्यदायी महत्त्व, नियमित योगाभ्यासाचे शारीरिक व मानसिक फायदे तसेच निरोगी जीवनशैलीसाठी योगाची आवश्यकता याविषयी मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रेरणादायी विचारांमुळे उपस्थितांना दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करण्याची प्रेरणा मिळाली.योग हा केवळ व्यायाम नसून निरोगी, संतुलित आणि आनंदी जीवनाचा आधार आहे, हा संदेश कार्यक्रमातून देण्यात आला. नागरिक, महिला व योगसाधकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रम यशस्वी ठरला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आयोजकांनी आभार मानले.

### आश्वासनांची पेरणी, फसवणुकीची कापणी

# भाजप सरकारचे बारा वर्षातले बारा नाही, एक तरी वचन पूर्ण करा

### खा.अमर काळे यांचा सरकारवर हल्लाबोल

**वर्धा/जनमाध्यम**

मतदारसंघ दौऱ्यावर असताना शेतकरी आणि बेरोजगारांच्या प्रश्नांवर भाष्य करत खासदार अमर काळे यांनी केंद्रातील भाजपा सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, सत्तेच्या बारा वर्षांनंतरही शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारित भाव तर दूरच, अनेक पिकांना हमीभावही मिळत नसल्याचा आरोप त्यांनी केला.



भाजपाने २०१४ मध्ये दिलेल्या अनेक आश्वासनांपैकी किमान एक तरी आश्वासन पूर्ण करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा,अशी मागणी काळे यांनी केली. पी.एम. किसानसारख्या योजनांचा उल्लेख करत त्यांनी ही मदत अपुरी असल्याचे सांगितले. वर्षभरासाठी केवळ १२ हजार रुपयांची मदत देऊन शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नसल्याचे त्यांनी नमूद केले. कर्जमाफीच्या घोषणा आणि तात्पुरत्या योजनांऐवजी शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित योग्य भाव मिळणे हेच शेतकऱ्यांसाठी खरे समाधान असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बेरोजगारीच्या मुद्द्यावरही त्यांनी सरकारला लक्ष्य केले. २०१४ मध्ये दरवर्षी दोन कोटी रोजगार निर्मितीचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र आजही लाखो युवक रोजगाराच्या प्रतीक्षेत आहेत. अनेक तरुणांना स्वतःचे छोटे-मोठे व्यवसाय टिकवणेही कठीण झाले असून रोजगाराअभावी संपूर्ण एक पिढी भरडली गेल्याचा आरोप त्यांनी केला. युवकांनी सरकारच्या आश्वासनांची वस्तुस्थिती ओळखून सजग राहण्याची गरज असल्याचेही ते म्हणाले.

दरम्यान, वरुड तालुक्यात घोषित करण्यात आलेल्या महेंद्री अभयारण्याबाबत बोलताना काळे यांनी संतुलित भूमिका मांडली. काही शेतकऱ्यांनी अभयारण्याला पाठिंबा दिला असून काहींनी आक्षेप नोंदविले आहेत. दोन्ही बाजूंची मते ऐकून सामंजस्याचा मार्ग काढण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. यासंदर्भात वनमंत्री गणेश नाईक यांना पत्रही दिल्याची माहिती त्यांनी दिली

# पोलीस हजर, महसूल गायब; शेतकऱ्यांची दिवसभर प्रतिक्षा

### ७,२३४ रुपयांचे चलन भरूनही वहिवाट रस्त्याची मोजणी रखडली

**विरुळ (आकाजी)/ जनमाध्यम**

महसूल प्रशासनाकडून आदेश, पोलीस बंदोबस्ताची व्यवस्था आणि शेतकऱ्यांनी भरलेले हजारो रुपयांचे चलन; मात्र प्रत्यक्ष मोजणीच्या दिवशी भूमी अभिलेख विभागाचा एकही कर्मचारी न पोहोचल्याने पिंपळगाव येथील शेतकऱ्यांना मनस्ताप सहन करावा लागला. परिणामी वहिवाट रस्त्याची मोजणी पुन्हा एकदा रखडल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे

मौजा पिंपळगाव येथील सर्वे क्रमांक १७९ व १७८ या शेतजमिनींच्या वहिवाटीसाठी गैरअर्जदारांच्या सर्वे क्रमांक १८० व १७६ च्या बांधाने जाणाऱ्या रस्त्याची मोजणी करण्याचे आदेश नायब तहसीलदार, आर्वी यांनी दिले होते. त्यानुसार अर्जदार तथा पिंपळगावच्या सरपंच सुचिता जाधव यांनी पोलीस संरक्षणासाठी ७ हजार २३४ रुपयांचे चलन भरले. आदेशानुसार पोलीस कर्मचारी सकाळपासून घटनास्थळी उपस्थित होते. मात्र दिवसभर प्रतीक्षा करूनही भूमी अभिलेख विभागाचा एकही कर्मचारी मोजणीसाठी न आल्याने शेतकऱ्यांचा संताप वाढला.

सध्या खरीप हंगाम तोंडावर असून शेतमालाची लागवड सुरू आहे. अशा परिस्थितीत वहिवाटीचा प्रश्न मार्गी न लागल्यास शेतीच्या कामांवर थेट परिणाम होण्याची भीती शेतकरी व्यक्त करीत आहेत. प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

याबाबत नायब तहसीलदारांनी संबंधित दिवशी इतर तीन पांदण रस्त्यांच्या मोजण्या नियोजित असल्याने कर्मचाऱ्यांना वेळ मिळाला नसल्याचे सांगितले. पुढील चार ते पाच दिवसांत मोजणी करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, प्रशासनाच्या सूचनेनुसार शुल्क भरले, पोलीसही उपस्थित होते; मात्र मोजणीसाठी कर्मचारीच आले नाहीत. वहिवाटीचा प्रश्न कायम राहिल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार असा प्रश्न सरपंच सुचिता जाधव यांनी उपस्थित केला आहे.महसूल प्रशासनाच्या या ढिसाळ कारभारामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण असून, तातडीने मोजणी करून वहिवाटीचा प्रश्न निकाली काढावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

### ठाणेदार ढाकणे 'ॲक्शन मोड'वर


# अवैध दारू व्यवसायाला बसला लगाम

### लाखोंचा मुद्देमाल जप्त, नागरिकांकडून कारवाईचे स्वागत

**विरूळ (आकाजी)/ जनमाध्यम**

पुलगाव पोलीस ठाण्याचे नवनियुक्त पोलीस निरीक्षक सदाशिव ढाकणे यांनी पदभार स्वीकारताच अवैध दारू व्यवसायाविरोधात आक्रमक भूमिका घेतल्याने परिसरातील दारू विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत. विरूळ, रोहणा, रसुलाबाद, वायफड, सोरटा तसेच आदिवासी बहुल भागात अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या अवैध दारू विक्रीवर पोलिसांनी धडक कारवाई सुरू केली आहे.

ढाकणे यांच्या नेतृत्वाखाली डीबी पथकाने विविध ठिकाणी छापे टाकून लाखो रुपयांचा अवैध दारूसाठा जप्त केला. विशेषतः दारू विक्रीसाठी कुप्रसिद्ध असलेल्या वायफड परिसरात झालेल्या कारवाईची नागरिकांमध्ये मोठी चर्चा आहे. पोलिसांच्या धाडसत्रानंतर अवैध दारू विक्री पूर्णपणे बंद झाली नसली तरी तिच्यावर मोठ्या प्रमाणात आळा बसल्याचे चित्र दिसून येत आहे.पोलिसांच्या



वाढत्या दबावामुळे आता दारू विक्रेते उघडपणे विक्री करण्याऐवजी पिशव्यांमध्ये दारू भरून लपूनछपून व्यवहार करत असल्याचे सांगितले जात आहे. बाहेरून आणल्या जाणाऱ्या निकृष्ट व विषारी दारूमुळे यावर्षी अनेक तरुणांना जीव गमवावा लागल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे. त्यामुळे संपूर्ण परिसरात प्रभावी दारूबंदीची मागणी पुन्हा जोर धरू लागली आहे

यापूर्वी पोलीस गावात आले की काही काळ विक्री बंद होत असे, मात्र पोलिसांची गाडी निघताच पुन्हा अवैध व्यवसाय सुरू होत होता. त्यामुळे महिला व नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. मात्र सध्या सुरू असलेल्या सातत्यपूर्ण कारवाईमुळे परिस्थितीत बदल होत असल्याची भावना ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत.दरम्यान, विरूळसह अनेक गावांत सट्टा बाजारही खुलेआम सुरू असल्याचा आरोप नागरिकांनी केला असून याविरोधातही कठोर कारवाईची मागणी केली आहे. तसेच अनेक वर्षांपासून बंद असलेली रोहणा पोलीस चौकी पुन्हा सुरू करून कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## राज्यस्तरीय बुद्ध-भीम गीत गायन स्पर्धा

**वर्धा/जनमाध्यम**

स्थानिक अश्वघोष सांस्कृतिक कला मंच, वर्धा यांच्या वतीने २६ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता स. बजाज सार्वजनिक वाचनालय, वर्धा येथे भव्य राज्यस्तरीय बुद्ध-भीम गीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. संस्थेच्या या उपक्रमाचे हे सलग चौथे वर्ष असून लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यासाठी हा विशेष सांगीतिक सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

विचारांची क्रांती सुरांच्या माध्यमातून हा संदेश घेऊन आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत महाराष्ट्रभरातील नामवंत तसेच उदयोन्मुख गायक-गायिका सहभागी होणार आहेत. बुद्ध, भीम आणि शाहू महाराज यांच्या विचारांना संगीताच्या माध्यमातून अभिवादन करताना स्पर्धकांमध्ये अटीतटीची चुरस पाहायला मिळणार आहे.राजर्षी शाहू महाराजांचा सामाजिक न्यायाचा वारसा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समतावादी विचार गीतांच्या माध्यमातून अनुभवण्याची संधी या कार्यक्रमातून उपलब्ध होणार आहे. या भव्य स्पर्धेला वर्धा शहर व जिल्ह्यातील नागरिक, रसिकप्रेमी तसेच भीमबंधू-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# नदी खोलीकरण की मातीचा खेळ तारासावंगावर पुराचे संकट गडद

### ग्रामस्थांचा बोगस कामाचा आरोप

**आष्टी शहीद/जनमाध्यम**

तारासावंगा गावालगतच्या कळ नदीच्या खोलीकरणाच्या कामावर ग्रामस्थांनी गंभीर आक्षेप घेतला असून नदीपात्र खोल करण्याऐवजी नदीकाठावरच मातीचा भराव टाकून शासनाच्या निधीची उधळपट्टी केली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या कामामुळे पुराचा धोका कमी होण्याऐवजी वाढण्याची शक्यता असल्याने गावकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.



दरवर्षी पावसाळ्यात कळ नदी दुथडी भरून वाहत असल्याने तारासावंगा गावाला पुराचा फटका बसतो. यावर उपाय म्हणून जलसंधारण विभागाने नदी खोलीकरणासाठी निधी मंजूर केला. मात्र प्रत्यक्षात खोलीकरणाऐवजी नदीच्या काठावर मोठ्या प्रमाणात मातीचा भराव टाकण्यात येत असल्याचे ग्रामस्थांच्या निदर्शनास आले. हे काम बोगस पद्धतीने होत असल्याचा संशय निर्माण होताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत कामाची पाहणी केली.कंत्राटदार खर्च वाचविण्यासाठी निकृष्ट दर्जाचे व नियमबाह्य काम करीत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. यामुळे पावसाळ्यात नदीच्या पाण्याचा नैसर्गिक प्रवाह बाधित होऊन गावाला अधिक मोठ्या पुराचा सामना करावा लागू शकतो, अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे.

संतप्त ग्रामस्थांनी काम तातडीने थांबवून जलसंधारण विभागाच्या अधिकाऱ्यांना घटनास्थळी बोलावण्याची मागणी केली. यासाठी संबंधित ससाणे यांच्याशी संपर्क साधण्यात आला. मात्र वारंवार संपर्क करूनही अधिकारी घटनास्थळी न आल्याने ग्रामस्थांचा संताप आणखी वाढला. प्रशासनाच्या या भूमिकेमुळे कामाच्या गुणवत्तेबाबत आणि पारदर्शकतेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.नदी खोलीकरणाचे काम नियमानुसार, तांत्रिक निकषांनुसार व दर्जेदार पद्धतीने झाले पाहिजे. अन्यथा भविष्यात उद्भवणाऱ्या पुरस्थितीस जबाबदार कोण असा प्रश्न ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.यावेळी रवी ढोमणे, माजी पंचायत समिती उपसभापती गोविंदा खंडाळे, गणेश भोगे, महेंद्र घयार, राजू गावंडे, आशिष कडू, रुपेश वंजारी, राहुल ठोंबरे, सतीश माकोडे, विजय बालपांडे, धीरज गावंडे, श्रावण नेहारे, चेतन खोडे यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते. ग्रामस्थांनी कामाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २०६**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# रुख्मिणी मातेच्या पालखीचे अंबानगरीत जल्लोषात स्वागत
## -ॲड. यशोमती ठाकूर व खासदार वानखडे यांच्या हस्ते स्वागत

**अमरावती/ प्रतिनिधीः-** श्रीक्षेत्र कौंडण्यपूर येथून श्रीक्षेत्र पंढरपूरकडे आषाढी एकादशी सोहळ्यासाठी प्रस्थान करणाऱ्या माता रुख्मिणीच्या पवित्र पालखीचे अंबानगरीतील बियाणी चौकात माजी आमदार ॲड. यशोमती ठाकूर तसेच खासदार बळवंत वानखडे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने स्वागत करण्यात आले. सर्वधर्मीय नागरिक, वारकरी, भाविक आणि मान्यवरांच्या उपस्थितीमुळे हा स्वागत सोहळा सामाजिक एकात्मतेचा आणि समतेचा संदेश देणारा ठरला.






श्रीक्षेत्र कौंडण्यपूर येथून श्रीक्षेत्र पंढरपूर येथे आषाढी वारीसाठी जाणाऱ्या रुख्मिणी मातेच्या पालखीची यंदाची ४३२ वी परंपरागत वारी भक्तिमय वातावरणात पार पडत आहे. अनेक शतकांपासून अखंड सुरू असलेली ही परंपरा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वैभवाचे प्रतीक मानली जाते.

रुख्मिणी मातेच्या पालखीला श्रीक्षेत्र पंढरपूर येथे मानाचे स्थान प्राप्त व्हावे तसेच शासकीय पूजनाचा सन्मान मिळावा यासाठी माजी आमदार ॲड. यशोमती ठाकूर यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळून आज रुख्मिणी मातेच्या पालखीला पंढरपूर येथे मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. त्याचप्रमाणे अमरावती शहरात पालखी आगमनानंतर बियाणी चौकात स्वागत करण्याची परंपराही त्यांनीच सुरू केली असून ती आजही अविरतपणे सुरू आहे.

**बियाणी चौकात भक्तीरसाला उधाण-**

सायंकाळी पालखीचे बियाणी चौकात आगमन होताच टाळ-मृदंगाच्या गजरात, 'ज्ञानोबा-तुकाराम' आणि 'जय जय रुख्मिणी माते' च्या जयघोषात संपूर्ण परिसर भक्तिमय झाला. पालखीचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. वारकऱ्यांच्या मुखी विठ्ठलनाम आणि वातावरणात भक्तीचा दरवळ असा मंगलमय सोहळा अनुभवण्यास मिळाला.

पालखी स्वागत सोहळ्यानंतर माजी आमदार ॲड. यशोमती ठाकूर यांनी वारकऱ्यांसोबत फुगडी खेळत भक्तिरसात सहभागी होत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. यावेळी त्यांनी काही अंतरापर्यंत पालखी खांद्यावर घेत वारकरी परंपरेप्रती असलेली आपली निष्ठा आणि श्रद्धा व्यक्त केली.

**सर्वधर्मसमभावाचे दर्शन घडविणारा सोहळा-**

तिवसा विधानसभा मतदारसंघातील तसेच अमरावती शहर व ग्रामीण भागातील विविध समाजघटकांचे नागरिक, वारकरी, प्रतिष्ठित व्यक्ती आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व धर्म, पंथ आणि समाजातील नागरिकांच्या सहभागामुळे हा सोहळा सामाजिक ऐक्य, बंधुभाव आणि सर्वधर्मसमभावाचा संदेश देणारा ठरला.

डोळ्यांचे पारणे फेडणाऱ्या या स्वागत सोहळ्याला खासदार बळवंत वानखडे, अमरावती काँग्रेस जिल्हाध्यक्ष बबलु देशमुख , माजी आमदार वीरेंद्र जगताप, शहर पोलीस आयुक्त राकेश ओला, निवासी जिल्हाधिकारी संतोष काकडे, उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, अमरावती पोलिस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव, अमरावती कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती हरिष मोरे, माजी महापौर विलास इंगोले, बबलू शेखावत, अनिल अग्रवाल, सुरेश रतावा, संजय शिरभाते, जयंतराव देशमुख, अभय देशमुख, श्याम बेलसरे, श्रीकांत बोंडे, गजानन देशमुख, मुकद्दर पठान, दिलीप सोनोने, नाना नागमोते, अविनाश भडांगे, महेश राऊत, विनोद वानखडे, शरद वानखडे, मुकुंद पुणसे, पंकज देशमुख,संदीप आमले, संजय चौधरी, अभिजीत बोके, जितेंद्र ठाकूर, शैलेष काळबांडे, प्रतिभा गौरखेडे, अनिकेत देशमुख, वैभव वानखडे, रितेश पांडव, वीरेंद्र भट, किशोर चांगोले, सतीश पोजगे, रवी हांडे, संजय मार्डीकर, संजय कळसकर, सचिन ठोके, सुनील जुनघरे, प्रणव गौरखेडे, नरू विघ्ने, अंजली ठाकरे आदी मान्यवर सहकुटुंब उपस्थित होते. तसेच शहरातील भाविकही मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# महेश नवमी निमित्त मोक्षधाम परिसरात स्वच्छता अभियान

**धामणगाव रेल्वे/ प्रतिनिधीः-** धामणगाव रेल्वे येथे महेश नवमी उत्सवानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत मोक्षधाम परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या उपक्रमात धामणगाव नगरपरिषदेचे उपाध्यक्ष तथा नगरसेवक बंडू मुंदडा यांच्या प्रमुख उपस्थितीत नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.





महेश नवमीच्या पार्श्वभूमीवर मोक्षधाम परिसर स्वच्छ, सुंदर व पर्यावरणपूरक ठेवण्याच्या उद्देशाने साफसफाई करण्यात आली. यावेळी परिसरातील कचरा हटविणे, झाडाझुडपांची स्वच्छता करणे तसेच परिसर सुशोभित करण्याचे काम करण्यात आले. उपस्थित नागरिकांनी स्वतः हातात झाडू घेऊन श्रमदान केले व स्वच्छतेचा संदेश दिला.

उपाध्यक्ष बंडू मुंदडा यांनी यावेळी सांगितले की, धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांबरोबरच स्वच्छतेचे महत्त्व समाजापर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज आहे. सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असून अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक संदेश जातो. या स्वच्छता अभियानात स्थानिक नागरिक, समाजबांधव आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी सहभाग नोंदविला. महेश नवमीच्या निमित्ताने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# मोहननगरात विदेशी दारूचा मोठा साठा जप्त

**अमरावती/ प्रतिनिधीः-** शहरात अवैधरित्या विदेशी दारूची साठवणूक करून विक्री करणाऱ्यांविरोधात अमरावती शहर गुन्हे शाखेने धडक कारवाई करत मोहननगर परिसरातून मोठा दारूसाठा जप्त केला. या कारवाईत एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याकडून ३७ हजार ५०० रुपयांचा विदेशी मद्यसाठा हस्तगत करण्यात आला आहे. पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या निर्देशानुसार शहरातील अवैध दारूविक्री व साठवणुकीविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर यांच्या नेतृत्वाखालील पथकाने २२ जून रोजी ही कारवाई केली. गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंग करीत असताना गुप्त माहितीदारामार्फत मोहननगर, नवसारी येथील विपीन रमेश बुंदेले (वय ३८) हा आपल्या घरात मोठ्या प्रमाणात विदेशी दारूचा साठा करून ठेवत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने तात्काळ छापा टाकला. झडतीदरम्यान घरात ठेवलेल्या २४ कॅरेट तेलाच्या पाच लिटरच्या डब्यांमध्ये लपवून ठेवलेल्या रॉयल स्टॅग कंपनीच्या १८० मिलीच्या १५० बाटल्या आढळून आल्या. पोलिसांनी हा संपूर्ण साठा जप्त केला. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची किंमत ३७ हजार ५०० रुपये असल्याचे सांगण्यात आले.

# दुचाकीचालकांना हारार्पण करून हेल्मेट घालण्याची दिली समज
## -तिवसा पोलिसांचा जनजागृतीपर उपक्रम

**तिवसा/ प्रतिनिधीः-** दिवसेंदिवस अपघाताचे प्रमाण वाढत चालले आहे,हे प्रमाण रोखण्यासाठी अमरावती जिल्हा पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी २२ जून पासून सर्वत्र जिल्हाभर हेल्मेट सक्ती केली असून याचे दुचाकीधारकांनी पालन करावे,म्हणून तिवसा पोलीसानी आज प्राथमिक स्वरूपात अनोखी मोहीम राबवून दुचाकी चालकांचे हार घालून हेल्मेट सक्ती बाबत सूचना दिल्या.

या अभिनव मोहिमेचा उद्देश नागरिकांमध्ये वाहतूक नियमांविषयी जनजागृती निर्माण करणे आणि सकारात्मक पद्धतीने रस्ते सुरक्षेचा संदेश पोहोचविणे हा होता. हेल्मेटशिवाय प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना थांबवून अधिकाऱ्यांनी त्यांच्याशी संवाद साधला.



अपघाताच्या वेळी डोक्याचे गंभीर दुखापतींपासून संरक्षण करण्यासाठी हेल्मेट किती आवश्यक आहे, याची माहिती देत भविष्यात नियमित हेल्मेट वापरण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी अधिकाऱ्यांनी वाहतूक नियमांचे पालन करणे ही प्रत्येक नागरिकाची सामाजिक जबाबदारी असल्याचे सांगितले. दंडापेक्षा जनजागृती अधिक प्रभावी ठरू शकते, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.सामान्यतः वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली जाते.

मात्र तिवसा येथे हार घालून स्वागत करण्याच्या आगळ्यावेगळ्या पद्धतीमुळे वाहनचालकांमध्ये आश्चर्य व्यक्त करण्यात आले. अनेकांनी या उपक्रमाचे स्वागत करत यापुढे हेल्मेटचा नियमित वापर करण्याचा संकल्प केला.

तिवसा पोलीस तर्फे पंचवटी चौकात झालेल्या या अभिनव जनजागृती मोहिमेमुळे रस्ते सुरक्षेचा प्रभावी संदेश नागरिकांपर्यंत पोहोचला असून तिवसा पोलिस प्रशासनाच्या या लोकाभिमुख उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.यावेळी पोलीस निरीक्षक गोपाल उपाध्याय, वाहतूक पोलीस शरद खेडकर, सागर डोंगरे आदी उपस्थित होते.

## नावात बदल

**मी आयुष प्रमोद बडवाईक घोषणा करतो की, माझे जुने नांव 'आयुष बडवाईक' ऐवजी नविन नाव 'आयुष प्रमोद बडवाईक' आहे व माझ्या वडिलांचे जुने नांव 'प्रमोदराव' ऐवजी नविन नाव 'प्रमोद विश्वनाथ बडवाईक' आहे.**

**पत्ता : रंगारवासणी,पो.असदपूर, ता.अचलपूर, जि. अमरावती**

**मो.नं.: ८७९९८२२३८१**

**ॲफेडेव्हीट नं.-**

**२६५०३४००९१२६८२०२२६५४०५**

## SRM e-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (SRM E-Tender ) from registered contractors /agencies on Mahatransco SRM E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following works.

| Sr. No. | Tender No. & description of works | Estimated cost of Tender (Rs) | EMD for Tender (Rs) | Tender fee (Rs) |
|---|---|---|---|---|
| 1 | **Tender No. EE/Civil/Amt/eT-02/ 2026-27** Annual maintenance for civil assets of colony & sub stations under the jurisdiction of Sub Division II Amravati Dist. Amravati (Year 2026-27) **Time limit: 12 Months. RFX No.: 7000040404** | Rs. 24,75,487/- (including GST) | Rs. 24,754.87 | 500/- + prevailing GST |
| 2 | **Tender No. EE/Civil/Amt/eT-03/ 2026-27** Annual maintenance for civil assets of colony & sub stations under the jurisdiction of Sub Division I Amravati Dist. Amravati (Year 2026-27) **Time limit: 12 Months. RFX No.: 7000040403** | Rs. 25,74,293/- (including GST) | Rs. 25,742.93 | 500/- + prevailing GST |

| Download of Tender documents Date | Due date of Submission of Tender | Technical Bid opening date | Commercial Bid opening date |
|---|---|---|---|
| 23.06.2026 11.00 hrs. to 08.07.2026 11.00 hrs | 08.07.2026 – up to 11.00 Hrs | 08.07.2026 – 11.10 Hrs (if possible) | 08.07.2026 – 15.00Hrs. (if possible) |

**Contact Person :** The Executive Engineer (Civil) Tel. No. 0721-2669159. For further details visit our **website http://mahatransco.in/**

Sd/-
**Executive Engineer (C),**
**EHV CCCM Division, MSETCL Amravati**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहितीकरिता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिध्द करणेत येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** जिल्हा अमरावती ता.अंजनगाव सुर्जी मौजे मु-हा बु येथील भुमापन गट क्रमांक १०० याचे एकूण क्षेत्र ०० हे ८२ आर यापैकी लिहून देणार १) विनोद महादेव पांडे यांचे मालकीचे क्षेत्र ०० हे ८२ आर ही या नोटिसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरिता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देऊन आमचे अशीलांना सदर मिळकत भाडेपटटा/ योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल केलेले आहे. तसेच सदर नोटीस प्रसारित करणेसाठी संमती लिहून दिले आहे. सबब मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटी बाबत कोणाही बॅंक, पंतसस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था, इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोझा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसाहक्क, इजमेंट, शेजा-याशी वाद, भाडेपटटा, वहिवाट, पोटगी, कुळ, ॲक्विजीशन, रिक्वीशिजन, न्यायालयीन वाद, कोर्ट डिक्री इ. संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असलेस किंवा हरकत असेलस, तक्रार असलेस त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ दिवसाचे आंत खाली दिलेल्या पत्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येवून हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कजी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आलेस ती सदर मिळकतींवर, आमचे अशीलांचे वर त्यांचे कायदेशिर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.

**अमरावती**
**दिनांक २३/०६/२०२६**

**उपरोक्त अशिलांतर्फे**
**ॲड.के.डी.शिराळे**
पत्ता- ऑफिस नं.डी-३, दुसरा मजला
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२/१क/२
शाहु ब्लॅड बॅंकेजवळ, कोल्हापूर
**संपर्क नं.- ०२३१-२६६८८४७**

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 278/2026 कलम २२
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री.जनकल्याण सेवा संस्था, अमरावती, ता.जि.अमरावती एफ-१२७७३/अमरावती**
बाबत अर्जदार - **गोविंद जनार्दन जोग, रा.हेडगेवार हॉस्पीटल, अमरावती**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९/२२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत (वर्णन) - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - अमरावती शहर येथील नझुल शिट नं.६५, प्लॉट नं.५/१, एकुण क्षेत्रफळ २७,५५२.९० चौ.मीटर पैकी ६६९ चौ.मीटर जागा, ह्याचा प्लॉट नं.५/१-ब, त्यावर असलेल्या बांधकामासहीत, ज्याची चतुःसिमा--
पुर्वेस - आदित्य अपार्टमेंट व त्यामागे रेल्वे लाईन
पश्चिमेस - अमरावती-बडनेरा रस्ता
उत्तरेस - प्लॉट नं.५/१-अ
दक्षिणेस - श्री.पाटील यांचे घर

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२४.०४.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

## तहसिलदार मोर्शी यांचे कार्यालय

रा.मा.क्र./२५६/एमआरसी-८१/पाळा/२०२५-२०२६

## जाहीरनामा

या कार्यालयाचे ज्ञापनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **शबाना बानो शेख गणी ,रा.पाळा, ता.मोर्शी** यांनी त्यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत **पाळा** ला करण्यास आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. त्यांनी अर्जासोबत ग्रामपंचायत निबंधक, ग्रा.पं.**पाळा** येथील जन्म/मृत्यू नोंदवही अनुपलब्धता प्रमाणपत्र व इतर अनुषंगीक पुरावे दाखल केले आहेत. तसेच ग्रामपंचायत कार्यालय **पाळा** येथे स्वतःचे **जन्म** दिनांक १४.०२.१९७२ रोजीचे जन्माची नोंद घेण्याकरीता आदेश मिळण्याबाबत विनंती केली आहे.

त्याअर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेव वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून **१५ दिवसांचे आत** लेखी स्वरुपात आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.
दि.२२/०६/२०२६

शिक्का

**स्वा/-**
**तहसीलदार, मोर्शी**

## जाहीर नोटीस

सर्व संबंधित नागरिक, संस्था, बॅंका, वित्तीय संस्था, सहकारी संस्था, सावकार, तसेच कोणत्याही प्रकारचा हक्क, दावा, ताबा, हितसंबंध किंवा स्वारस्थ असलेल्या व्यक्तीना ही जाहीर नोटीस देण्यात येते की,

माझे पक्षकार **सौ.चंद्रभागा भाऊसाहेब डफडे, रा.महागाव, ता.महागाव, जि.यवतमाळ व श्री सुरेंद्र हिम्मतराव खानझोडे, रा.जगतपुर, पो.सालोड, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती** हे खालील वर्णनाची स्थावर मालमत्ता श्री संदीप गिरीराव मोहोड, वय ५२ वर्षे, व्यवसाय-व्यापार, रा.गायत्री नर्सरी जवळ, दत्ता कॉलनी, साई नगर, अमरावती, ता व जि.अमरावती यांचेकडून खरेदी करण्याच्या व्यवहारात आहेत.

**मालमत्तेचे वर्णन :-** मौजे अकोली, ता.व.जि.अमरावती येथील भुमापन क्रमांक ३१/१ मधील प्लॉट क्र. ३० च्या उपविभागातून तयार झालेला प्लॉट क्र.३०ए, क्षेत्रफळ ८१.०० चौ.मी. (०.८१ आर), महसुल आकारणी रुपये ९७/- फेरफार नोंद क्र.३४३६० अन्वये भुमापन क्र.३१/१/३०/ए म्हणून नोंदलेला.

या प्लॉटची चतुःसिमा
पूर्व - प्लॉट क्र.५ व ६ चा भाग, पश्चिमेस - ७.५० मीटर रुंदीचा रस्ता
उत्तरेस - प्लॉट क्र.३० बी व दक्षिण - प्लॉट क्र.२९

सदर मालमत्तेबाबत कोणत्याही व्यक्ती,संस्था अथवा बॅंकेचा मालकी हक्क,ताबा, गहाण, बोजा, तारण, विक्री करार, साठेखत, बक्षीसपत्र, वसीयत, भाडेपटा, कर्ज व्यवहार, न्यायालयीन दावा, दिवाणी फौजदारी अथवा महसुल कार्यवाही, स्थगिती आदेश, जप्ती आदेश, लिस पेंडन्स, वारसाहक्क, हिस्सा, कब्जा किंवा इतर कोणताही हितसंबंध असल्यास त्यांनी त्या संदर्भातील सर्व मूळ कागदपत्रे व पुराव्यासह ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आंत खाली नमुद केलेल्या पत्त्यावर लेखी स्वरुपात हरकत सादर करावी.

निर्धारित मुदतीत कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास माझे पक्षकार सदर मालमत्ता कोणत्याही प्रकारचा बोजा, वाद, किंवा तृतीय पक्षाच्या हक्कापासून मुक्त आहे असे समजून खरेदी व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर प्राप्त होणा-या कोणत्याही हरकतीस किंवा दाव्यास माझे पक्षकार अथवा अधो हस्ताक्षरी कोणत्याही स्वरुपात जबाबदार राहणार नाहीत.

**हरकत पाठविण्याचा पत्ता**
**अधिवक्ता**
**ॲड.निखिल पुरुषोत्तमराव देशमुख**
१२-बी, शिवप्रस्थ वृंदावन कॉलनी,
स्कुल ऑफ कॉलर्सच्या मागे, निंभोरा रोड,अमरावती

## जाहीर नोटीस

वि.दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) अचलपूर यांचे न्यायालयात
**आर.एम.जे.सी.क्र.३१२/२०२६ ने.ता.२१.०७.२०२६**

अर्जदार : १. **चंद्रा प्रकाश ढोबळे,** वय ६० वर्षे,
रा.राधाकृष्ण कॉलनी, मोर्शी, ता.मोर्शी,
जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : १. **श्रीमती वेणुबाई विठठलराव काळे,** वय ८५ वर्षे
२. **उमेश विठठलराव काळे,** वय ५४ वर्षे
दोन्ही रा.वासणी खुर्द, ता.अचलपूर, जि.अमरावती

ज्याअर्थी अर्जदार यांनी मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, **विठठ्लराव अमृतराव काळे यांचे निधन दि.१०/१२/२००६** रोजी झाले असून वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत व इतर कोणीही मय्यतास वारस नाही. अर्जदारांना सरकारी योजना करिता वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. सबब वारसा प्रमाणपत्र मिळावे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकिलांमार्फत **वि.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) अचलपूर** या न्यायालयामध्ये हजर होवून आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहित धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल हयाची नोंद घ्यावी.

आज दि.१०.०६.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहा. अधीक्षक (प्रशासन)**
दिवाणी न्यायालय (व.स्तर)
अचलपूर

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २८५**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## जाहीर नोटीस

**विद्यमान ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**
आर.एम.जे.सी.क्र.२९२/२०२६ ने.ता.२८.०७.२०२६

अर्जदार : १. **श्रीमती सुमित्रा सुखदेव पवारे,** वय ६५ वर्षे, व्यवसाय
२. **सुभाष सुखदेवराव पचारे,** वय ४४ वर्षे, व्यवसाय - शेती
३. **सुधाकर सुखदेव पचारे,** वय ४२ वर्षे, व्यवसाय - शेती
४. **सुरज सुखदेव पचारे,** वय ३७ वर्षे, व्यवसाय - शेती
अर्जदार क्र.१ ते ४ रा. तुळजापुर गढी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक सुखदेवराव महादेवराव पचारे** यांचा मृत्यू दिनांक १८/१२/२०२५ रोजी अपघाताने चांदूर बाजार ते आसेगांव रोडवर टाकरखेडा पुर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला असून ते कायमचे रा.तुळजापुर गढी, ता.चांदूर बाजार,जि.अमरावती येथे झालेला असून ते कायमचे रा. तुळजापुर गढी, ता.चांदूर बाजार,जि.अमरावती येथे झालेला आहे.

यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार मय्यतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.२९२/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.१७.०६.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,चांदूर बाजार

## जाहीर नोटीस

प्रो.नं.१४८६/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.२२.०६.२०२६

**वि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय**
**किरकोळ अर्ज क्र.२४५/२०२६ दिनांक २४.०७.२०२६**

**अर्जदार -** १. **सोनुला रामदास कुटेमाटे,** वय ७१ वर्षे, धंदा - घरकाम
२. **संतोष रामदास कुटेमाटे,** वय ५० वर्षे, धंदा - शेती
अ.क्र.१ व २ रा.शिवाजी नगर बनोसा, ता.दर्यापूर, जि.अमरावती
३. **अनिता चरणदास तरोळे,** वय ५३ वर्षे, धंदा - घरकाम
रा.जवाहर नगर अकोला, ता.जि.अकोला
४. **सविता संजय थोरात,** वय ४९ वर्षे, धंदा - घरकाम
रा.रतनलाल प्लॉट, रामनगर अकोला, ता.जि.अकोला

--- विरुध्द ---

**गैरअर्जदार- निरंक**

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **रामदास अमृतराव कुटेमाटे** हे दिनांक ३१.०१.२०१६ रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.२२.०६.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

## जाहीर नोटीस/सायटेशन

**३ रे दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) अचलपूर यांच्या न्यायालयातील**
**नियमित दिवाणी दावा क्र.८८/२०२६ ने.ता.०५.०८.२०२६**

**धिरज वासनकर वादी.....विरुध्द ......**
**महाराष्ट्र सरकार तर्फे जिल्हाधिकारी, अमरावती प्रतिवादी**

**वादी :** १. **धिरज राजेंद्र वासनकर,** वय ३७ वर्षे,
रा.शिवाजी नगर, चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार
जि. अमरावती

-- विरुध्द --

**प्रतिवादी :** **१. जिल्हाधिकारी, अमरावती**
**ता.जि.अमरावती**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, वरील वादी धिरज राजेंद्र वासनकर यांनी वरील न्यायालयामध्ये दिपाली राजेंद्र वासनकर लग्नानंतरचे नाव दिपाली सुरेशराव भातकुले हे **दि.२६.११.२०१७** पासून बेपत्ता असल्याबाबत पोलीस स्टेशन रामनगर, चंद्रपुर ता.जि.चंद्रपुर येथे तक्रार दाखल केली होती. **दिवाणी मृत्यू झाल्याची घोषणा करणेबाबत (कलम १११ भारतीय साक्ष अधिनियम २०२३)** चा दावा दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा वरील बाबत कोणास हरकत घ्यावयाची असल्यास त्यांचे दाव्याचे सुनावणी करिता दिनांक **०५/०८/२०२६** रोजी सकाळी **१०.३०** वा.वरील न्यायालयामध्ये स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर राहावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदहू दाव्याची एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज दि.**१७.०६.२०२६** रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीसाठी दिला असे.

शिक्का

आदेशानुसार,
**सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय (व.स्तर)**
**अचलपूर**

मंगळवार, दि. २३ जून २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

# टक्केवारीच्या नादात सिमेंट रोडच्या कामाचे तीन तेरा

## प्रभाग क्रं.१५ मधील तीस लाखाचे काम निकृष्ट दर्जाचे, सा.बां.विभागाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष.!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. २२ : नगरपरिषद अंतर्गत येत असलेल्या प्रभाग क्रमांक १५ मध्ये वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून होत असलेले ३० लाखाचे आर.सी.सी. सिमेंट कॉंक्रेट रोडचे काम जे.ई.यांच्या आर्थिक टक्केवारीमुळे अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे परिसरातील नागरिकाकडून आरोप करण्यात येत आहे.**





मिळालेल्या माहितीच्या आधारे नवीन पुसद येथिल स्टेट बँकेच्या मागील भागात असलेला रोड गादेवार यांच्या घरापासून ते मंदाडे यांच्या घरापर्यंत होत असलेला सिमेंट रोड हा सन २०२३-२४ मध्ये ३० लाख रुपये मंजूर झाला आहे,या कामाचे टेंडर एका मजूर कामगार सोसायटीला दिले असून या सोसायटीच्या नावावर इतर व्यक्ती ठेकेदार हा काम करत आहे. सदर काम इस्टिमेट प्रमाणे न करता थातूरमातूर करून सदर ठेकेदार बिल उकळण्याच्या तयारीत असल्याचे परिसरातील नागरिकाकडून बोलल्या जात आहे, हे काम करण्यासाठी इस्टिमेटमध्ये असल्याप्रमाणे सर्वात खाली बेड हे ६ इंच जाडीचे असायला पाहिजे त्यावर प्लॅस्टिक पन्नी टाकून स्टील(गज) हे १२ एम.एम. चे आडवे-व उभे टाकून त्यावर १०-१२ एम.एम. गिट्टी वाळू मिक्स आठ इंच जाड कॉंक्रेट असायला पाहिजे त्यावर चांगल्या प्रकारे पाण्याची क्युरिंग होणे गरजेचे आहे. परंतु असे न करता खाली बेड ६ इंच ऐवजी फक्त ४ इंच टाकण्यात आला त्यावर पाण्याची क्युरिंग करण्यात आलेली नाही, प्लास्टिक पन्नी टाकण्यात आली नाही, वाळू ऐवजी माती मिश्रित चुरी वापरण्यात आली, १२ एम.एम. गज ऐवजी १० एम.एम.चा गज वापरण्यात आलेला आहे. आणि शेवटी वाळू मिक्स कॉंक्रेट जाडीला आठ इंच टाकण्याऐवजी सहा इंच टाकण्यात आले अशी कामामध्ये तफावत दिसून येत असल्यामुळे या कामाची क्वालिटी अत्यंत निकृष्ट दर्जाची झाल्यामुळे परिसरातील नागरिक व काही सामाजिक कार्यकर्ते यांनी आरोप केला आहे, हा रोड अनेक वर्षानंतर होत असून चांगल्या प्रकारे कॉलिटीचा होणे गरजेचे आहे परंतु सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्ष व टक्केवारीच्या धोरणामुळे या कामाचे तीन तेरा झाले असून या कामाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी अशी मागणी परिसरातील नागरिकाकडून आता जोर धरत आहे.

# काळी (दौ.) शिवारातील निलगाय शिकारीचा गुन्हा उघड

## अवैध बंदुकीसह आरोपी जेरबंद स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**महागाव, दि. २२ :** महागाव तालुक्यातील काळी (दौ.) शिवारात मार्च महिन्यात घडलेल्या वन्यजीव निलगाय शिकारीच्या प्रकरणाचा स्थानिक गुन्हे शाखेने छडा लावत अवैधरित्या देशी बनावटीची बंदूक बाळगणाऱ्या एका आरोपीला अटक केली आहे.

या कारवाईत सुमारे ५० हजार किमतीची बंदूक जप्त करण्यात आली असून वन्यजीव शिकारीच्या गुन्ह्याचा उलगडा करण्यात पोलिसांना यश आले आहे. यवतमाळ जिल्ह्यात अवैध शस्त्र बाळगणारे, गंभीर गुन्हे करणारे तसेच गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी पोलिस अधीक्षक कुमार चिंथा यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष मोहीम सुरू आहे. त्याअंतर्गत दि. २२ जून २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पुसद उपविभागात गस्त घालत असताना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार काळी (दौ.) परिसरात सापळा रचण्यात आला. पोलिसांनी संशयित सय्यद कलीम उर्फ काळ्या सय्यद हाफिज (वय ३२, रा. काळी(दौ) ता. महागाव) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून देशी बनावटीची अवैध बंदूक जप्त करण्यात आली. चौकशीदरम्यान आरोपीने आपल्या साथीदारासह मार्च महिन्यात पांढरकवडा–इंजनी शेतशिवारात निलगायची शिकार केल्याची कबुली दिली. या प्रकरणी यापूर्वीच भारतीय वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. नव्या तपासात आरोपींची भूमिका स्पष्ट झाल्याने पोलिसांनी आरोपीविरुद्ध भारतीय हत्यार कायदा कलम ३ व २५ अन्वयेही गुन्हा नोंदवून पुढील कारवाई सुरू केली आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी मोहीम ही कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंथा,अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सतीश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे केलेल्या या कारवाईमुळे वन्यजीव शिकारी व अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

# AI युगातील शिक्षणासाठी शिक्षकांचे 'अपस्किलिंग'..!

## उबुंटू इंग्लिश स्कूलचा दूरदृष्टीपूर्ण उपक्रम

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २२ :** कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) शिक्षण क्षेत्रात वेगाने पाय रोवत असताना विद्यार्थ्यांना भविष्यासाठी सक्षम करण्यासाठी शिक्षकांनाही नव्या तंत्रज्ञानाशी सुसंगत बनविण्याचा पुढाकार उबुंटू इंग्लिश स्कूलने घेतला आहे. नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी शाळेत तीन दिवसीय शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

शाळेचे कार्यकारी संचालक अनूप यादव यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या प्रशिक्षणात शिक्षकांना AI चा शैक्षणिक वापर, डिजिटल साधनांचा प्रभावी उपयोग, अध्यापन नियोजन, शैक्षणिक साहित्य निर्मिती आणि विद्यार्थीकेंद्रित अध्यापन पद्धती याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. AI वापरताना नैतिकता, सुरक्षितता आणि मानवी मूल्यांचे महत्त्वही अधोरेखित करण्यात आले. याशिवाय Growth Mindset, Google Slides, Google Forms आणि समाजमाध्यमांचा प्रभावी वापर याविषयीही प्रशिक्षण देण्यात आले. ग्रामीण व अर्धशहरी भागातील विद्यार्थ्यांनाही आधुनिक तंत्रज्ञानाच्या समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी शिक्षकांचे सातत्यपूर्ण कौशल्यविकास आवश्यक असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. AI युगातील गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी हा उपक्रम शिक्षण क्षेत्रातील एक सकारात्मक आणि दूरदृष्टीपूर्ण पाऊल मानला जात आहे.

# अवैध रेती वाहतुकीवर कारवाई

**यवतमाळ, दि. २२ :** बाभुळगाव तालुक्यातील सौजना परिसरात महसूल विभागाने अवैध रेती उपसा आणि वाहतूक करणाऱ्या दोन ट्रकांवर मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी तब्बल १० लाख ४१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. घारफळ येथील मंडल अधिकारी चंद्रकांत पांडे यांनी ही कारवाई केली. त्यांना सौजना परिसरात दोन ट्रक बेकायदेशीरपणे रेतीची वाहतूक करताना आढळून आले. अधिकारियोंनी ट्रकला थांबवण्याचा प्रयत्न केला असता, दोन्ही चालक ट्रक सोडून पळून गेले. महसूल विभागाने दोन्ही ट्रकसह ८ ब्रास अवैध रेती जप्त केली आहे. जप्त केलेल्या दोन्ही ट्रक्सची किंमत १० लाख रुपये आणि रेतीची किंमत ४१ हजार २८८ रुपये आहे. या प्रकरणी बाभुळगाव पोलीस ठाण्यात आरोपी ट्रक चालकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू आहे.

# लाखरा येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा..



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**दिग्रस, दि. २२ :** लाखरा येथे दि. २१ जून अरुणोदय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, लाखरा येथे आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन विद्यालयाचे मुख्याध्यापक सुधीर काळबोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सामूहिक योगासने, प्राणायाम व ध्यानधारणा करून योगाचे महत्त्व प्रत्यक्ष अनुभवले. योगामुळे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहते तसेच एकाग्रता, आत्मविश्वास आणि सकारात्मकता वाढण्यास मदत होते, असे मार्गदर्शन मुख्याध्यापक सुधीर काळबोंडे यांनी केले.कार्यक्रमात सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. योग दिनानिमित्त निरोगी जीवनशैलीचा संदेश देण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विशेष सहकार्य केले.

# थोडक्यात



## राजीव व सूर्यतेज उच्च माध्यमिक विद्यालयात योग दिवस साजरा

**घाटंजी :** मांडवी दि. २१ जून राजीव माध्यमिक व सूर्यतेज उच्च माध्यमिक विद्यालय, मांडवी येथे जागतिक योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

यावेळी महाविद्यालयाचे प्राध्यापक कोगुरवार सर यांनी विविध योगासनांचे प्रात्यक्षिक करून दाखविले.तसेच विद्यार्थी व शिक्षकांकडून योग्य पद्धतीने योगासने करून घेतली.सर्वांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत विविध योगासने केली. दरवर्षीप्रमाणे यंदाही योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य टोंगलवार यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व सांगत नियमित योगाभ्यास करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बोळकुंटवार,आगलावे,मुत्यालवार बल्लाळ,नुगुरवार सर,राकेश तसेच मारुती यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांसाठी दरमहा पाच हजार ..!

**मानधनासाठी ३१ जुलैपर्यंत ऑनलाइन अर्ज करा.**

**यवतमाळ :** राज्य शासनाच्या "राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार मानधन सन्मान योजना" अंतर्गत पात्र ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांना दरमहा ५ हजार रुपये मानधन देण्यात येणार असून, इच्छुकांनी १ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत आपले सरकार पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी केले आहे. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या शासन निर्णयानुसार कला व साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या १०० ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांची निवड करून त्यांना मासिक मानधन दिले जाणार आहे. अर्जासाठी मुदतवाढ दिली जाणार नसल्याने पात्र लाभार्थींनी वेळेत अर्ज करणे आवश्यक आहे. योजनेसाठी अर्जदाराचे वय ५० वर्षांपेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. दिव्यांग कलाकारांसाठी वयोमर्यादेत १० वर्षांची शिथिलता देण्यात आली असून त्यांच्यासाठी किमान वय ४० वर्षे आहे. अर्जदाराचे कला किंवा साहित्य क्षेत्रातील योगदान किमान १५ वर्षांचे असावे. तसेच कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ६० हजार रुपयांपेक्षा अधिक नसावे. विधवा, परित्यक्ता, दिव्यांग आणि वयोवृद्ध कलाकारांना प्राधान्य दिले जाणार आहे. अर्जासोबत वयाचा दाखला, आधार कार्ड, उत्पन्न व रहिवासी दाखला, प्रतिज्ञापत्र, बँक पासबुक, अपंगत्व प्रमाणपत्र, पुरस्कारांची कागदपत्रे, शिफारसपत्र आणि कलाक्षेत्रातील कार्याचे पुरावे जोडणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील पात्र साहित्यिक व कलाकारांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी विहित मुदतीत ऑनलाइन अर्ज सादर करावेत, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# पोलीस बॉईज फुटबॉल स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

✦जनमाध्यम | प्रतिनिधी




**यवतमाळ, दि. २२ :** महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना, यवतमाळच्या महिला पदाधिकारी टीमच्या वतीने आयोजित १४ ते १७ वर्षे वयोगटातील भव्य फुटबॉल स्पर्धेला खेळाडू, पालक आणि क्रीडाप्रेमी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. पळसवाडी कवायत मैदान, यवतमाळ येथे सुरू असलेल्या या स्पर्धा युवकांमध्ये शिस्त, आत्मविश्वास आणि संघभावना निर्माण करण्याचे प्रभावी व्यासपीठ ठरत आहेत.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोहारा पोलीस स्टेशनचे ठाणेदार रोहित चौधरी हे उपस्थित होते. त्यांनी युवकांनी खेळाच्या माध्यमातून आपले भविष्य घडवावे, व्यसनांपासून दूर राहून आदर्श नागरिक बनावे, असे आवाहन केले. क्रीडा क्षेत्रातील संधी, मेहनत, शिस्त आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. पोलीस मुख्यालयातील रमेश चाकाटे यांनीही खेळाडूंना प्रेरणादायी मार्गदर्शन करत अशा स्पर्धांमुळे युवकांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि संघभावना विकसित होत असल्याचे सांगितले. महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेचे जिल्हाध्यक्ष अतीक अफजल शेख, अतुल दादाराव येवले आणि अन्य पदाधिकाऱ्यांनी सर्व सहभागी संघ व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. महिला जिल्हाध्यक्षा मोनिका बळीराम शुक्ला यांच्या नेतृत्वाखाली या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, शुभांगी राठोड, लिला मेश्राम, कल्पना शेकदार, काजल पातुकर आणि कोमल मेश्राम यांनी मोलाचे सहकार्य केले.यवतमाळ पोलीस दलातील निकेश जयस्वाल यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा यशस्वीपणे पार पडत असून, युवकांना सकारात्मक दिशा देत निरोगी, शिस्तबद्ध आणि राष्ट्रसेवेची भावना जोपासणारी पिढी घडविण्याचा हा उपक्रम ठरत असल्याचे जिल्हाध्यक्ष अतीक अफजल शेख यांनी सांगितले.

# बेपत्ता युवकाचा मृतदेह बाहेर काढण्यात यवतमाळ पोलिसांना यश..!

## ९० फूट खोल विहिरीत उतरून पोलिसांची यशोगाथा!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २२ :** महागाव तालुक्यातील मौजा घाना येथील भगवान भाकरे (वय ३५) हे बेपत्ता असल्याची माहिती मिळताच यवतमाळ जिल्हा शोध व बचाव पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. रात्रीचा अंधार, प्रतिकूल वातावरण आणि जीव धोक्यात घालणारी परिस्थिती असतानाही पोलिस कर्मचाऱ्यांनी दाखविलेल्या धैर्यामुळे सुमारे ९० फूट खोल विहिरीतून मृतदेह बाहेर काढण्यात यश मिळाले.

तहसीलदार, महागाव यांनी भगवान भाकरे बेपत्ता असल्याची माहिती जिल्हाधिकारी विकास मीना यांना दिल्यानंतर त्यांनी आपत्ती व्यवस्थापन विभागाला पोलीस विभागाच्या समन्वयाने तातडीने शोधमोहीम राबविण्याचे निर्देश दिले. त्यानुसार जिल्हा शोध व बचाव पथकाने रात्री सुमारे ९.१५ वाजता घटनास्थळी पोहोचून आवश्यक सुरक्षा उपायांचा अवलंब करत विहिरीत उतरून शोधकार्य सुरू केले. अत्यंत जोखमीच्या परिस्थितीत पोलिसांनी जीवाची पर्वा न करता विहिरीत उतरून मृतदेह बाहेर काढला. त्यामुळे पंचनामा आणि पुढील कायदेशीर प्रक्रिया वेळेत पूर्ण करणे शक्य झाले. या संपूर्ण कारवाईत पोलिसांची तत्परता, शिस्त आणि कर्तव्यनिष्ठा पुन्हा एकदा अधोरेखित झाली. ही शोध व बचाव मोहीम किशोर भगत, अमर भवरे, नितीन पन्नासे आणि नितीन बुरे यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीरित्या पार पडली. यवतमाळ पोलिसांनी संकटाच्या क्षणी दाखविलेल्या धाडस आणि सेवाभावाबद्दल नागरिकांकडून त्यांचे सर्वत्र कौतुक होत असून, ही कामगिरी पोलिस दलाच्या जनसेवेच्या बांधिलकीचे प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे.

# पावसाळ्यात अतिक्रमण धारकांवर बुलडोझर नको!

## नेताजी मार्केट बचावासाठी क्रांती राऊत(धोटे) यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २२ :** पावसाळ्याच्या तोंडावर नेताजी मार्केटमधील फुटपाथ व लघु व्यावसायिकांवर अतिक्रमण हटविण्याची कारवाई करू नये, पुनर्वसना शिवाय दुकाने हटविणे म्हणजे गरीबांच्या पोटावर पाय देण्यासारखे आहे, असा ठाम इशारा देत विदर्भ वीर जामुवंतराव धोटे यांच्या कन्या तथा राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) प्रदेश उपाध्यक्षा आणि सामाजिक कार्यकर्त्या क्रांती सागर राऊत (धोटे) यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी नेताजी चौकातून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करून नेताजी मार्केटमधील अतिक्रमण हटाव मोहिमेला तत्काळ स्थगिती देण्याची मागणी करण्यात आली.

निवेदनात नमूद करण्यात आले की, नेताजी मार्केटमध्ये गेल्या ४० ते ५० वर्षांपासून सुमारे १८० ते २०० लघुदुकाने असून हजारो कुटुंबांची उपजीविका या व्यवसायावर अवलंबून आहे. याशिवाय सुमारे ३०० बेरोजगार युवक येथे काम करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहेत. मोर्चेकऱ्यांनी प्रशासनाला सुनावले की, या बाजारपेठेमुळे वाहतूक किंवा नागरिकांना कोणताही त्रास होत नसून, शहरातील गोरगरिबांना कमी दरात चांगल्या दर्जाचा माल उपलब्ध होतो. अशा परिस्थितीत पावसाळ्याच्या दिवसांत जेसीबीद्वारे दुकाने हटविण्याची कारवाई केल्यास अनेक कुटुंबे उघड्यावर येतील आणि सामाजिक असंतोष निर्माण होऊ शकतो. क्रांती राऊत यांनी सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र एकता हॉकर्स युनियन विरुद्ध म्युनिसिपल कॉर्पोरेशन (२०१३) प्रकरणात पुनर्वसन व समस्यांचे निराकरण करण्यासाठी समिती स्थापन करूनच कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, त्या आदेशांकडे दुर्लक्ष करून नगर परिषद यवतमाळ गरीब व्यावसायिकांवर कारवाईची तलवार लटकवत आहे. पुनर्वसन होईपर्यंत दुकानदारांना त्याच ठिकाणी व्यवसाय करण्याची परवानगी द्यावी आणि पावसाळ्यात कोणतीही अतिक्रमण हटाव कारवाई करू नये, अशी मागणी मोर्चेकऱ्यांनी जिल्हा प्रशासनाकडे केली.

# योग दिनी आरोग्यदूतांचा सन्मान..! अहिल्यादेवी होळकर समितीकडून योगपटूंना मानवंदना

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २२ :** आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारक समितीने शहरातील योगपटू व योग प्रशिक्षकांचा जाहीर गौरव करून आरोग्य संवर्धनासाठी कार्य करणाऱ्यांना अनोखी मानवंदना दिली. अहिल्यादेवी होळकर जयंती महोत्सवाच्या तिसऱ्या पर्वानिमित्त रविवारी सायंकाळी आझाद मैदानासमोरील महात्मा फुले चौक येथे हा सोहळा उत्साहात पार पडला.

सामाजिक नेते रवी मुंदाने व प्रमोदिनी मुंदाने यांच्या हस्ते अहिल्यादेवींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी आयोजित आयुष्मान शिबिरात ६५ नागरिकांनी आयुष्मान कार्ड काढून घेतले. पारंपरिक जयंती साजरी करण्यापेक्षा समाजोपयोगी उपक्रम राबवत समितीने योगाच्या माध्यमातून आरोग्य जपणाऱ्या बालक, युवक व प्रशिक्षकांचा पुस्तक देऊन सन्मान केला. योग प्रशिक्षक डॉ. साहेबराव साखरे, डॉ. संतोषी साऊळकर, प्रेमदास पकडे, गणेश ढोले, अभिजित पवार, योगेश राऊत यांच्यासह अनेक योगपटूंना गौरविण्यात आले. या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे शहरभरातून कौतुक होत असून कार्यक्रमाला नागरिकांची मोठी उपस्थिती लाभली.

# शेतातून पाण्याचे पाईप चोरीस

**यवतमाळ, दि. २२ :** ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गव्हाळा शेत शिवारातून अज्ञात चोराने पाण्याचे पाईप आणि स्प्रिंकलर चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. यामुळे शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. गव्हाळा येथील रहिवासी राजू पवार यांच्या शेतात ही चोरी झाली. त्यांनी आपल्या शेतात पाणी देण्यासाठी आणलेले ८४ पाईप्स आणि ११ स्प्रिंकलर दोरीने बांधून ठेवले होते. मात्र, १९ जूनच्या रात्री अज्ञात चोरट्याने यातील ४० पाण्याचे पाईप आणि ११ स्प्रिंकलर चोरून नेले. या चोरी गेलेल्या साहित्याची एकूण किंमत ४० हजार रुपये आहे. या प्रकरणी राजू पवार यांनी दिलेल्या तक्रारीवरून यवतमाळ ग्रामीण पोलिसांनी अज्ञात चोराविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# ४८ कोटींच्या दंडवसुली प्रकरणात नवे धागेदोरे?

## महसूल यंत्रणेतील ‘इनसाईड गेम’चा शोध घेण्याची वेळ

### -फाईलवरील नोंदी, मौन आणि विलंबामुळे संशय अधिक गडद -शासनाला फटका अन् अनेकांचा फायदा?




**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** गाजीपूर येथील कथित अवैध गौण खनिज उत्खनन प्रकरणातील ४८ कोटी रुपयांच्या दंडवसुलीची फाईल आता महसूल प्रशासनासाठी डोकेदुखी ठरण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. दंडवसुलीच्या प्रक्रियेतील विलंब, मालमत्तांबाबतचा संशयास्पद गोंधळ, आदिवासी जमिनींच्या नोंदींकडे झालेले कथित दुर्लक्ष आणि निर्णय प्रक्रियेतील विसंगती यामुळे या संपूर्ण प्रकरणात केवळ दंडग्रस्त नव्हे तर प्रशासनातील निर्णयकर्तेही चौकशीच्या भोवऱ्यात अडकू शकतात, अशी चर्चा आता उघडपणे सुरू झाली आहे.

प्रश्न एवढाच नाही की ४८ कोटी रुपये वसूल झाले की नाहीत. प्रश्न हा आहे की एवढ्या मोठ्या रकमेच्या वसुलीच्या प्रकरणात शासन यंत्रणा ज्या तत्परतेने काम करायला हवी होती, ती प्रत्यक्षात दिसली का? की काही प्रभावशाली घटकांना वेळ मिळावा यासाठीच प्रशासकीय प्रक्रियेला जाणूनबुजून संथ गती देण्यात आली? की आता पुन्हा गाजीपुरचे नाव तिसऱ्यांदा विधिमंडळाच्या पटलावर येण्याची वेळ महसुलचे अधिकारी पाहत आहे का? असे अनेक प्रश्न उघडपणे उपस्थित होत आहे.

### दंड आदेशानंतर कोणाला मिळाला ‘गोल्डन पिरियड’?

महसूल विभागातील निवृत्त अधिकाऱ्यांच्या मते, एवढ्या मोठ्या दंडाची रक्कम वसूल करण्यासाठी सुरुवातीची काही महिने अत्यंत महत्त्वाची असतात. याच काळात मालमत्ता हस्तांतरण, आर्थिक फेरबदल, व्यवहारांची पुनर्रचना किंवा कायदेशीर संरक्षणाची तयारी केली जाऊ शकते. मात्र या प्रकरणात दंड आदेशानंतर प्रशासनाने नेमकी किती वेगाने पावले उचलली? संबंधितांच्या मालमत्तांवर तातडीने बोजा का चढविण्यात आला नाही? बँक व्यवहारांची तपासणी झाली का? आणि झाली असेल तर त्याचे निष्कर्ष काय होते? या प्रश्नांची उत्तरे अद्याप धूसर असल्याने दंडग्रस्तांना मौल्यवान वेळ उपलब्ध करून देण्यात आला का, अशी शंका व्यक्त केली जात आहे.

### महसूल फाईलमधील ‘मिसिंग लिंक’ कोणती?

या प्रकरणातील सर्व फाईल नोंदी सार्वजनिक झाल्यास अनेक धक्कादायक बाबी समोर येऊ शकतात, असे कायदेवर्तुळातील जाणकारांचे मत आहे. विशेषतः दंड आदेशापासून आरआरसी प्रक्रियेपर्यंतच्या कालावधीत कोणत्या अधिकाऱ्यांनी कोणते शेरा मारले, कोणत्या टप्प्यावर फाईल किती दिवस प्रलंबित राहिली, वरिष्ठांकडे कोणते अहवाल पाठविण्यात आले आणि कोणते पाठविले गेले नाहीत, याची स्वतंत्र पडताळणी झाल्यास प्रशासकीय जबाबदारी निश्चित होऊ शकते. याच कारणामुळे आता फक्त महसूल वसुली नव्हे तर संपूर्ण निर्णय प्रक्रियेचे फॉरेन्सिक ऑडिट करण्याची मागणी पुढे येत आहे.

### आदिवासी जमिनींच्या प्रकरणात जबाबदार कोण?

गाजीपूर परिसरातील आदिवासी जमिनींच्या भाडेपट्ट्यांबाबत पूर्वपरवानगी घेतली नसल्याची बाब अधिकृत नोंदींमध्ये नमूद झाल्यानंतरही पुढील कारवाईचा मागोवा स्पष्टपणे दिसत नाही. जर ही बाब इतकी गंभीर होती तर संबंधित अधिकाऱ्यांनी वरिष्ठांना तातडीने अहवाल दिला होता का? दिला असेल तर त्यावर निर्णय का झाला नाही? आणि दिला नसेल तर कोणाच्या दबावाखाली मौन बाळगण्यात आले? या प्रश्नांची उत्तरे मिळाल्याशिवाय आदिवासी जमिनींच्या प्रकरणातील जबाबदारी निश्चित होऊ शकणार नाही, असे मत व्यक्त होत आहे.

### चौकशी महसूल अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचणार?

आतापर्यंत या प्रकरणात सर्वांचे लक्ष दंडग्रस्तांकडे होते. मात्र आता परिस्थिती बदलत आहे. कारण शासनाचा ४८ कोटी रुपयांचा महसूल वसूल करण्यात आलेल्या कथित अपयशामुळे चौकशीची दिशा प्रशासनातील निर्णयकर्त्यांकडे वळू लागली आहे. कोणत्या अधिकाऱ्याने कोणता निर्णय घेतला? कोणत्या अधिकाऱ्याने कारवाई लांबवली? कोणत्या अधिकाऱ्याने कोणती नोंद टाळली? कोणत्या पातळीवर फाईल थांबली? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे शासनाच्या हिताचे रक्षण करण्यात कुठे त्रुटी राहिल्या? या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी उच्चस्तरीय स्वतंत्र चौकशीच एकमेव पर्याय असल्याचे मत आता अधिक ठळकपणे पुढे येत आहे.

### ‘क्रीम मालमत्ता’ अजूनही सुरक्षित का?

दंडवसुलीच्या प्रक्रियेत सर्वात मोठा प्रश्न म्हणजे ज्या मालमत्तांना सर्वाधिक बाजारमूल्य असल्याचे सांगितले जाते, त्या मालमत्तांवर शासनाचा दावा आजपर्यंत पूर्णपणे का नोंदविला गेला नाही? महसूल विभागाने काही मालमत्तांवर कारवाई केल्याचे सांगितले जात असताना सर्वाधिक मूल्यवान मालमत्ता मात्र अद्यापही व्यवहारक्षम असल्याची चर्चा आहे. जर ही बाब खरी असेल तर शासनाच्या हिताचे संरक्षण करण्याऐवजी निवडक कारवाई करण्यात आली का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# प्रधानमंत्री मोदिंच्या फोटोवर क्लिक करताच खात्यातून एक लाख गायब

## -रहिमापूर पोलीस ठाणे हद्दीत घटना

**अंजनगाव सुर्जी/ प्रतिनिधीः-** फेसबुकवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फोटो दिसला. त्यावर क्लिक करताच, एका महिलेच्या बँक खात्यातून तब्बल १ लाख १ हजार १५१ रुपये गायब झाल्याची घटना रहिमापूर पोलीस ठाणे हद्दीत समोर आली आहे.पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला. २० एप्रिल रोजी सायंकाळी ७:४० ते ७:४५ अशा अवघ्या पाच मिनिटांत ही ऑनलाईन फसवणूकीची घटना घडली. कापूसतळणी येथील रहिवासी नसिम यांच्या मुलीला १५ एप्रिल रोजी फेसबुकवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा एक फोटो दिसला. तिने त्या फोटोवर क्लिक केले. क्लिक होताच तिच्या बँक खात्यातून लगेच १,४९० रुपये कापले गेले. खात्यातून पैसे कट झाल्यामुळे कुटुंब चिंतित असतानाच, २० एप्रिल रोजी त्यांना एका अनोळखी नंबर वरून फोन आला. फोन करणाऱ्या भामट्याने मी एसबीआय मधून बोलतोय, तुम्ही युनो ॲपसाठी अप्लाय करताय का, अशी विचारणा केली. त्यावर फिर्यादीच्या मुलीने माझे आधीच १,४९० रुपये कट झाले आहेत, असे सांगितले. समोरील ठगाने व्हॉट्सअपवर एक रिक्वेस्ट येईल, ती स्वीकारल्यास तुमचे पैसे रिफंड होतील, अशी बतावणी केली.



साईबार भामट्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून मुलीने जशीच व्हॉट्सअप रिक्वेस्ट स्वीकारली, तसे त्यांच्या एसबीआय बँक खात्यातून एकापाठोपाठ एक ४९ हजार ९६८ रुपये आणि ४९ हजार ६९३ रुपये असे एकूण १ लाख १ हजार १५१ रुपये ऑनलाइन काढून घेण्यात आले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच नसीम परविन यांनी रहिमापूर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला. पोलिस उपनिरीक्षक चंदा पवार या तपास करत आहेत.

# विधान परिषद निवडणुकीत प्रवीण पोटेंची हॅट्रिक

## -भाजपाने रचला इतिहास -हर्षजीत देशमुखांचा फुटला भोपळा

### वंचितचे निलेश विश्वकर्मा यांना ३१ मते








**अमरावती/ प्रतिनिधीः-** विधान परिषदेच्या अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील निवडणुकीत भाजपचे उमेदवार प्रवीण पोटे यांनी विक्रमी ३९० मते मिळवत पहिल्याच फेरीत विजय नोंदवून ‘हॅटट्रिक’ साधली. काँग्रेसच्या उमेदवाराचे आजारपण आणि त्यांच्या विरोधात काँग्रेस जनाची नाराजी या गोंधळात झालेल्या निवडणुकीत पोटे यांनी बाजी मारली. प्रवीण पोटे यांच्या विजयी हॅट्रिकने भाजपाचे वर्चस्व वाढले आहे.१८ जून रोजी झालेल्या निवडणुकीनंतर आज सोमवार २२ जून रोजी सकाळी नियोजन भवन मध्ये मतमोजणी प्रक्रिया आरंभ झाली. पहिल्याच फेरीत पोटे यांना ३९० मते प्राप्त झाली. वैध मतदानाच्या ९२.६३ टक्के इतकी विक्रमी मते त्यांना प्राप्त झाली आहेत. वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार नीलेश विश्वकर्मा यांना ३१ मते मिळाली, तर काँग्रेसचे उमेदवार हर्षजीत देशमुख यांना भोपळाही फोडता आला नाही. या निवडणुकीत एकूण मतदान ४२७ इतके मतदान झाले. सहा मते अवैध ठरली. एकूण वैध मते ४२१ तर विजयासाठी २११ मतांचा कोटा निर्धारित करण्यात आला होता. प्रवीण पोटे हे गेल्या निवडणुकीत वैध मतदानाच्या ९६.४२ टक्के मते मिळवून विजयी झाले होते. काँग्रेसच्या उमेदवाराला केवळ १७ मते प्राप्त झाली होती. अमरावती स्थानिक स्वराज्य मतदारसंघात काँग्रेसचे एकूण ११९ सदस्य, शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे १८ आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे १३ सदस्य मिळून महाविकास आघाडीकडे १५० इतकी मतसंख्या होती. इतर विरोधी पक्षांच्या मदतीने काँग्रेस पक्ष लढत देऊ शकतो, असे सांगण्यात आले होते, पण समीकरणे बदलली. काँग्रेससह महाविकास आघाडीची मते मोठ्या प्रमाणात फुटल्याचे चित्र या निवडणुकीत दिसले. काँग्रेसने या निवडणुकीत तटस्थ राहण्याचा आणि मतदान ☞(पान २ वर)

# राजापेठ परिसरातील कचरा डेपोला नागरिकांचा विरोध

## -कोणार्क कंपनीच्या कार्यालयाला घेराव

### अखेर कचरा डेपो हटवण्याचे आदेश

**अमरावती/ प्रतिनिधीः-** शहरातील स्वच्छतेचा कंत्राट कोणार्क कंपनीला देण्यात आलेला आहे. कंपनीच्या निष्काळजीपणामुळे नागरिक वैतागले आहे. रोज वेगवेगळ्या क्षेत्रातून कंपनीचे विरोधातून तक्रारी येत आहे. अशात आज सोमवार २२ जून रोजी राजापेठ परिसरातील नागरिकांनी कंपनी विरुद्ध आक्रोश व्यक्त करत कंपनीच्या कार्यालयाला घेराव टाकला. नगरसेवक मिलिंद बांबल आणि लवीना हर्षे यांच्या नेतृत्वात झालेल्या आंदोलनानंतर कचरा डेपो हटवण्याचे निर्देश अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी दिले. यानंतर नागरिकांनी सुटकेचा निःश्वास घेतला. माहितीनुसार राजापेठ मनपा संकुल परिसरात हॉटेल होटल ग्रेस ईनच्या मागे कोणार्क कंपनीने कचरा डेपो बनविला आहे. येथे शहरातील गोळा केलेला कचरा खाली केला जाते. या व्यतिरिक्त तारा साहब बगीच्या परिसरातून कंपनीचा कचरा घेऊन जाणाऱ्या वाहनांमुळे परिसरात दुर्गंधी पसरली आहे. दररोज इथे ४० ते ५० गाड्या कचऱ्याच्या येतात. तिथून कचरा भरून कंपोस्ट डेपोमध्ये पाठवला जाते. यामुळे नागरिक वैतागले परिसरात मच्छरांचा प्रादुर्भाव वाढला. नागरिकांच्या आरोग्यावर याचे परिणाम होत आहे. गेल्या काही दिवसापासून हा कचरा डेपो हटवण्याची मागणी करण्यात येत होती पण प्रशासनाने याकडे लक्ष नाही दिले. ☞(पान २ वर)



# अल्पवयीन मुलीच्या विनयभंगाचा प्रयत्न

## -आरोपीने स्वतःवर केले ब्लेडने वार

**अमरावती/ प्रतिनिधीः-** अल्पवयीन मुलीचा विनयभंग करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याची घटना राजापेठ पोलीस ठाणे हद्दीत समोर आली आहे. अल्पवयीन मुलीने जेव्हा आरोपीचा विरोध केला तेव्हा आरोपीने स्वतःवर ब्लेडने वार केले. यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. पोलिसांनी आरोपी अतुल गवई (वय २७) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. माहिती नुसार अल्पवयीन मुलीची मावशी कामावर गेली होती. ती घरी एकटी होती ,त्यावेळी आरोपी अतुल गवई तिच्या घरी नस मागण्यासाठी आला. नस मागण्याच्या नावावर तो तिच्या घरी घुसला आणि तिच्याशी अश्लील व्यवहार करू लागला. तिने विरोध केला असता आरोपी तेथून पळाला. अल्पवयीनला धमकवण्यासाठी त्याने स्वतःवर ब्लेडने हल्ला केला. त्याने आपल्या हातावर गळ्यावर ब्लेड मारून स्वतःला जखमी केले. पोलिसांनी पीडितेच्या तक्रारीवरून आरोपी विरुद्ध कलम ७४,३५१(२),३५२ आणि पोक्सो कलम ८,१२ अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# हरवलेले सोने व मोबाईल मुळ मालकाला परत

## सीसीटीव्हीच्या मदतीने शोधमोहीम यशस्वी

**अमरावती/ प्रतिनिधीः-** हरवलेली पर्स, त्यामधील सोन्याचे दागिने, मोबाईल आणि महत्त्वाची कागदपत्रे शोधून राजापेठ पोलिसांनी प्रामाणिकपणा आणि तत्परतेचे दर्शन घडविले. पोलिसांच्या जलद कारवाईमुळे सुमारे १ लाख ११ हजार रुपयांचा ऐवज मुळ मालकाला सुखरूप परत करण्यात आला.



११ जून २०२६ रोजी एका महिला तक्रारदाराने राजापेठ पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली होती. संतोषी नगर ते राजापेठ बसस्थानक दरम्यान ऑटोरिक्षाने प्रवास करताना त्या आपली पर्स रिक्षात विसरल्या होत्या. पर्समध्ये ५ ग्रॅम वजनाची सोन्याची पोत, विवो कंपनीचे दोन मोबाईल, एक हजार रुपये रोख रक्कम तसेच महत्त्वाची कागदपत्रे होती. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन राजापेठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांनी तातडीने शोधमोहीम सुरू करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार पोलिसांनी संतोषी नगर ते राजापेठ बसस्थानक परिसरातील विविध सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. तांत्रिक विश्लेषण आणि शोधकार्याच्या आधारे संबंधित ऑटोरिक्षाचा शोध ☞(पान २ वर)

# देशी कट्टा व सहा जिवंत काडतुसे जप्त

## आरोपी ताब्यात, एक फरार



**अमरावती/ प्रतिनिधीः-** शहरात अवैधरित्या शस्त्र बाळगून दहशत निर्माण करणाऱ्यांविरोधात अमरावती शहर गुन्हे शाखेने विशेष मोहीम राबवत मोठी कारवाई केली. या कारवाईत एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याकडून एक देशी बनावटीचा कट्टा (पिस्टल), सहा जिवंत काडतुसे, मोबाईल आणि मोपेड वाहनासह एकूण १ लाख ५६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या आदेशानुसार शहरात अवैध शस्त्रधारकांविरोधात विशेष मोहीम सुरू आहे. त्याअंतर्गत गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर यांच्या नेतृत्वाखालील पथकाने २२ जून रोजी ही कारवाई केली.

गुन्हे शाखेला मिळालेल्या गुप्त माहितीनुसार पवन उर्फ क्षितीज सुनील लोणारे (वय २१, रा. रद्दीपुरा, चपराशीपुरा, काँग्रेसनगर रोड, अमरावती) हा देशी कट्टा बाळगून फेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील डेंटल कॉलेज ते वडाळी पूल मार्गावर संशयास्पदरीत्या फिरत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले. आरोपीची अंगझडती व त्याच्या ताब्यातील मोपेड वाहनाची तपासणी केली असता डिक्कीत एक देशी कट्टा आणि सहा जिवंत काडतुसे आढळून आली. पोलिसांनी तात्काळ ☞(पान २ वर)

# घरात घुसून तरुणावर हल्ला

## -सावरखेडा येथील घटना

**अमरावती/ प्रतिनिधीः-** घरात घुसून झोपेत असणाऱ्या एका तरुणावर चाकूने हल्ला करण्यात आल्याची घटना शिरखेड पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या सावरखेडा येथे समोर आली आहे. हिमांशू अनिल कोकणे (वय २५,सावरखेडा) असे हल्ल्यात जखमी तरुणाचे नाव आहे. त्याच्या वर सुपर स्पेशलिटी रुग्णालय येथे उपचार सुरू आहे. विठ्ठलराव काशीराम कांबळे (वय ७०) आरोपी आहे. माहितीनुसार हिमांशू कोकणे रविवारी रात्री साडेआठ वाजता



दरम्यान आपल्या घरी झोपेत होता. त्यावेळी शेजारी राहणारे आणि त्यांचे नातेवाईक विठ्ठलराव कांबळे हे त्याच्या घरात घुसले. त्यांनी जुन्या वादावरून हिमांशुला शिवीगाळ केली आणि जीवाने ठार मारण्याच्या उद्देशाने त्याच्यावर लोखंडी पाईपने हल्ला केला. त्याच्या डोक्यावर, गालावर, चेहऱ्यावर, नाकावर हल्ला करण्यात आला. हिमांशू ने आरडा ओरड केल्याने आरोपी तेथून पळाला.या हल्ल्या मध्ये हिमांशू गंभीर जखमी झाला. कुटुंबीय व नातेवाईकांनी त्याला उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. प्राथमिक उपचारानंतर त्याला अमरावती रेफर करण्यात आले. सुपर स्पेशलिटी मध्ये त्याच्यावर उपचार सुरू आहे. घटनेनंतर पोलिसांनी हिमांशूच्या आईच्या तक्रारीवरून आरोपी विठ्ठल कांबळे विरुद्ध कलम १०९(१९),३३३,३५२,३५१(१) गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# अचलपूर - परतवाडा जुळ्या शहरात हेल्मेट जनजागृती

**अचलपूर/ प्रतिनिधीः-** रस्ते अपघातांमध्ये डोक्याला गंभीर दुखापत होऊन अनेकांचा मृत्यू किंवा गंभीर इजा होत असल्याच्या पार्श्वभूमीवर हेल्मेट वापराबाबत जनजागृती करण्यासाठी अचलपूर - परतवाडा स्वतंत्र वाहतूक शाखेतर्फे विशेष मोहीम राबविली.अमरावती जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली २२ जूनपासून हेल्मेट वापरण्याचे आवाहन करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत अचलपूर - परतवाडा स्वतंत्र वाहतूक नियंत्रण शाखेचे प्रभारी निरीक्षक विजय गराड यांनी वाहनचालकांचे हार घालून स्वागत केले आणि त्यांना हेल्मेटचा नियमित वापर करण्याची ☞(पान २ वर)



# राजापेठ पोलिसांचे अवैध दारुविक्रेत्यांविरुद्ध धाडसत्र

## -तीन गुन्हे दाखल; ७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

**अमरावती/ प्रतिनिधीः-** राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध दारुविक्रीला आळा घालण्यासाठी राजापेठ पोलिसांनी सोमवारी विशेष धाडसत्र राबवत तीन ठिकाणी कारवाई केली. या कारवाईत तीन आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले असून ७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

राजापेठ पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार २२ जून रोजी विविध ठिकाणी छापे टाकण्यात आले. या कारवाईदरम्यान अनिल विठ्ठलराव घोडेस्वार (वय ५२, रा. आदर्श नगर, अमरावती) याच्याकडून अवैध दारूचा साठा जप्त करण्यात आला. त्याच्याविरुद्ध राजापेठ पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (ई) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच दिपेश नंदलाल बैस (वय ४०, रा. जुनी वस्ती, बडनेरा) याच्याविरुद्ध, तर सुभाष हरीभाऊ तिरकप्पा (वय ४८, रा. रहाटगाव) याच्याविरुद्ध गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. या तिन्ही कारवायांमध्ये एकूण ७ हजार रुपयांचा ☞(पान २ वर)

